सप्टेंबर २०२० / पाने ६० / किंमत ₹१०

लोकराज्य

ऑनलाईन शिक्षण-प्रशिक्षण

महाराष्ट्र शासन

मुंबईची स्कायलाईन आता बदलणार!

यापुढे मुंबईकर नाही राहणार मोडकळीस आलेल्या इमारतीत

गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन

- मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरू आणि रहिवासी यांना राज्य शासनाचा भक्कम दिलासा
- मुंबई शहरातील जीर्ण व धोकादायक उपकर प्राप्त इमारतीतील संबंधित सर्व भागधारकांना विहित कालावधीत पुनर्विकास करण्याची मिळणार टप्प्या-टप्प्याने संधी
- मुंबईतील उपकरप्राप्त इमारतींच्या रखडलेल्या, बंद पडलेल्या, अर्धवट सोडलेल्या पुनर्विकासाच्या योजना म्हाडा ताब्यात घेऊन आरंभ प्रमाणपत्र (सीसी) मिळाल्यापासून तीन वर्षात भाडेकरुंना /रहिवाशांना नव्या इमारतीत हक्काच्या सदनिका देणार
- म्हाडा कायद्यात दुरुस्ती करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा दूरगामी परिणाम करणारा निर्णय

भाडेकरू आणि रहिवासी यांना राज्य शासनाचा भक्कम दिलासा!

गृहनिर्माण विभागाच्या या निर्णयामुळे धोकादायक व जीर्ण अवस्थेतील उपकरप्राप्त इमारती कोसळल्यामुळे होणारी जीवित हानी रोखण्यास मदत होणार । भाडेकरू व रहिवाशांच्या जीवनमानात सुधारणा होणार । मालक व भाडेकरू यांच्या संबंधांना येणार बळकटी । दक्षिण मुंबईतील सदरहू भागाचा होणार कायापालट । मालक/ विकासक तसेच अशा प्रकल्पांशी संबंधित भागधारक यांना पुनर्विकासाच्या प्रक्रियेत अधिक लवचिकता प्रदान करण्यात येणार.

कायमच्या घरासाठी भक्कम निर्णय

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे	श्री. अजित पवार	श्री. बाळासाहेब थोरात	डॉ. जितेंद्र आव्हाड	श्री. सतेज (बंटी) डी. पाटील
मा. मुख्यमंत्री	मा. उपमुख्यमंत्री	मा. मंत्री, महसूल	मा. मंत्री, गृहनिर्माण	मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)

अंतरंग

विद्यार्थिहित सर्वतोपरी ६

कोविड-१९ महामारीमध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य महत्त्वाचे म्हणून शाळा बंद ठेवल्या आहेत. विद्यार्थी शाळेत येत नसले तरी त्यांचे शिक्षण मात्र थांबलेले नाही. राज्य शासन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहे. विद्यार्थिहित सर्वतोपरी जपून शासन शिक्षण पोहोचवत आहे.

शाळा बंद... शिक्षण सुरू ८

कोविड-१९ च्या महामारीने जगातील सर्वच व्यवहारांचे संदर्भ बदलून गेले आहेत. यात सर्वात जास्त परिणाम झाला तो शाळांवर पण या बदललेल्या परिस्थितीतही मार्ग काढले जात आहेत. राज्यात शाळा सुरू नाहीत, पण त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबलेले नाही. वेगवेळ्या तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य सुरूच आहे.

कौशल्याबरोबर रोजगारही १२

कोरोनाचे संकट संपूर्ण जगावर आले आहे. सुरुवातीच्या काळात आरोग्यविषयक वाटणारे हे संकट पुढे फक्त आरोग्यविषयक राहिले नाही, या संकटाने आता आर्थिक संकटाचेही रूप घेतले आहे. त्यामुळे येता काळ आपणा सर्वांसाठीच आव्हानात्मक आहे. लॉकडाऊनविषयक शासनाच्या नियमानुसार शैक्षणिक संस्था सुरू करण्याचा निर्णय झाल्यानंतर आयटीआयही सुरू करण्यात येतील.

दक्षता, सज्जता आणि तत्परता १९

'मिशन बिगिन अगेन'अंतर्गत कोविड-१९साठी आपल्या राज्याने वेळेआधीच खबरदारी घेत उपाययोजना केल्या. त्यामुळे आज राज्यात देशातील सर्वाधिक रुग्ण आढळत असताना आरोग्य यंत्रणा सक्षमपणे तोंड देत आहे. येणाऱ्या काळात आपण दक्ष, सज्ज आणि तत्पर असणे आवश्यक असणार आहे.

शिक्षणाच्या सुसंधी २१-३५

राज्याच्या शालेय शिक्षण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, इतर मागास बहुजन कल्याण आदी विभागांच्या माध्यमातून अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, इतर मागास वर्ग व सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. यामुळे तळागाळातील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणापासून परदेशात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

सामाजिक न्यायासाठी 'बार्टी' ३८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ही संस्था शास्त्रोक्त संशोधन, सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी योजनांचे मूल्यांकन, प्रशिक्षण, कौशल्य विकास इत्यादींद्वारे सामाजिक न्याय विभागासाठी मुख्य समन्वयाचे कार्य करते.

आरोग्य सेवा बळकट ४०

राज्यात कोरोनाचा उद्रेक होऊन सहा महिने झाले. या काळात राज्याच्या आरोग्य विभागामार्फत अनेक उपाययोजना करत कोरोनाला रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे. ग्रामीण भागाबरोबरच नागरी भागातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी पाऊल टाकले आहे.

प्रशासनाचा कणा ४२

सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी महसूल विभाग पार पाडत असतो. शासनाच्या लोकाभिमुख योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम महसूल विभाग करत असतो. महसूल विभागाचे काम २४ तास व ३६५ दिवस अविरतपणे सुरू असते.

स्वस्त व परवडणारी घरे ४४

सर्वसामान्य गोरगरीब माणसांचे घराचे स्वप्न पूर्ण करणे आणि त्याला हक्काचे घर उपलब्ध करून देणे याबरोबरच शहरे झोपडपट्टीमुक्त करणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून गृहनिर्माण विभाग कार्यरत आहे.

विद्यार्थिहित सर्वतोपरी	६	सामाजिक न्यायासाठी 'बार्टी'	३८
शाळा बंद... शिक्षण सुरू	८	आरोग्य सेवा बळकट	४०
कौशल्याबरोबर रोजगारही	१२	प्रशासनाचा कणा	४२
शिक्षण अविरत	१५	स्वस्त व परवडणारी घरे	४४
विद्यार्थिहिताला प्राधान्य	१७	वनांचे संरक्षण व संवर्धन	४६
दक्षता, सज्जता आणि तत्परता	१९	कोरोनाशी दोन हात	४९
शिक्षणाच्या सुसंधी	२१	दृष्टिक्षेप : सदैव कार्यरत	५१
प्रगतीसाठी 'सारथी'	३६	मंत्रिमंडळात ठरले !	५६

वर्ष ७२ वे | अंक ३ | सप्टेंबर २०२०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर, गोविंद अहंकारी
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

आरोग्य सुविधांना प्राधान्य

आरोग्य या विषयाकडे प्राधान्याने लक्ष दिले जाणार असून राज्यातील खेड्यापाड्यांमध्ये तसेच दुर्गम भागात उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा आणि वैद्यकीय सुविधा पोहोचण्यास शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. भारतीय स्वातंत्र्याच्या ७३व्या वर्धापन दिनानिमित्त मंत्रालयात झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात १५० प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. राज्यात विविध ठिकाणी रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यात येतील. शेतकऱ्याला स्वतःच्या पायावर उभे करणे हे या शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. 'जे विकेल तेच पिकेल' अशी शासनाची भूमिका आहे. त्यामुळे राज्यातील जनतेला दर्जेदार अन्नधान्य मिळेल. शेतकऱ्यांच्या समोर सतत कर्जाचा डोंगर उभा आहे. शेतकऱ्यांना या समस्येतून कायमस्वरूपी कसे मुक्त करता येईल, याकडे लक्ष देण्यात येईल. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेद्वारे सुमारे २९ लाख ५० हजार शेतकऱ्यांना १८ हजार ९८० कोटी रुपये रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करून कर्जमुक्त करण्यात आले आहे. मागील दहा वर्षात झाली नाही एवढी विक्रमी म्हणजे ४१८ लाख क्विंटल कापूस खरेदी या वर्षी शासनाने केली आहे. रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने 'महाजॉब्स' हे पोर्टल सुरू केले आहे. त्यामुळे राज्यात नवीन उद्योग येतील. कामगारांना रोजगार उपलब्ध होईल. 'जय जवान, जय किसान, जय कामगार' हे यापुढे आपल्या राज्याचे ध्येय असेल.

स्वातंत्र्यदिनी मंत्रालयात झालेल्या मुख्य शासकीय समारंभात बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे.

ऑनलाइन शिक्षण सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. सर्वसामान्य गरीब माणसाचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. अनलॉक प्रक्रिया सुरू केल्यानंतर राज्यात सध्या सुमारे ५० ते ६० हजार उद्योग सुरू झाले आहेत. कोरोनाचे संकट असतानाही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे काम वेगाने सुरू आहे.

ऑनलाइन शिक्षणात अग्रेसर

गेल्या सहा महिन्यांपासून आपण सर्व कोरोना या साथीच्या रोगाशी लढत आहोत. या रोगाशी दोन हात करताना राज्य शासनाने समर्थपणे विविध उपाययोजना राबवल्या आहेत. या युद्धात नागरिक, वैद्यकीय सेवा देणारे शासकीय आणि खासगी दवाखान्यातील डॉक्टरमंडळी व त्यांचे सहकारी, पोलीस आणि अधिकारी-कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी या सर्व योद्ध्यांचा आपणा सर्वांना अभिमान आहे. कारण या कालावधीत संयम, सजगता आणि तत्परता दाखवून या सर्वांनी जबाबदारीने आपापली भूमिका पार पाडली आहे किंबहुना पार पाडत आहेत. राज्यातील खेड्यापाड्यांमध्ये तसेच दुर्गम भागात उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा पोहोचवण्यास शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर सुसज्ज अशा प्रयोगशाळा आणि कोविड केअर सेंटर उभे करण्यात राज्याने आघाडी घेतली आहे.

'मिशन बिगिन अगेन'अंतर्गत शासनाने नव्याने नियमावली नुकतीच लागू केली आहे. नागरिकांना आता अनेक बाबींमध्ये सूट देत, अर्थचक्रास अधिक गती देण्यासाठी खासगी बसमधून प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच आंतरजिल्हा प्रवास व मालवाहतुकीसाठी कोणतेही निर्बंध राहणार नाहीत. वेगवेगळ्या व्यापारी करारानुसार शेजारी राष्ट्रांमधून मालवाहतूक व प्रवासी वाहतुकीसाठीचे निर्बंध उठवण्यात आले आहेत. शिवाय त्यासाठी कोणत्याही परवानगीची गरजही भासणार नाही.

शारीरिक अंतर राखून, मर्यादित उपस्थितीत आणि सर्व नियमांचे पालन करून भारतीय स्वातंत्र्याचा ७३ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याच पद्धतीने मोहरम, बकरी ईद, जन्माष्टमी, रक्षाबंधन आणि गणेशोत्सव हे सणही शांततामय व सुरक्षित वातावरणात साजरे करून आपण आपली परंपरा कायम राखली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कृषी, रोजगार, शिक्षण, आरोग्य आदी क्षेत्रांच्या विकासासाठी प्रयत्नपूर्वक राज्य शासन पाऊल टाकत आहे. राज्याने आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आदर्श निर्माण करून देशाला योग्य दिशा देण्याचे काम केले आहे. उद्योग-व्यापार या क्षेत्राबरोबरच शिक्षणक्षेत्रातही राज्य अग्रेसर आहे. कोरोनाने आपल्याला काय शिकवले असा विचार आपण केला तर कोरोनाने आपल्याला उद्याचे जग, माध्यमे आणि शिक्षण कसे असेल याची जाणीव करून दिली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये आणि त्यांना सातत्याने शिक्षण मिळाले पाहिजे या उदात्त हेतूने राज्यात विविध उपक्रम राबवून शाळा बंद असल्या तरी ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले आहे. गुगल क्लासरूमच्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षणाचे पाऊल टाकणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनासोबत गुगलने भागीदारी केली. या भागीदारीमुळे राज्यातील २.३ कोटी विद्यार्थी आणि शिक्षक एकत्रित शिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतील अशी व्यवस्था निर्माण झाली. गुगल क्लासरूम, गुगल मीट यांसारख्या विनामूल्य साधनांसह दूरस्थ शिक्षणाची सोय होत आहे. गुगलच्या सहकार्याने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्व भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणप्रक्रिया सुरू होण्यास मदत झाली.

केंद्राने नुकत्याच घोषित केलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व विभागातील शिक्षणतज्ज्ञांचा आणि अभ्यासकांचा समावेश असलेली समिती नेमून या धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात विचारविनिमय करण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने परीक्षेसंदर्भात जो निर्णय दिला आहे, त्या निर्णयाचा आदर करून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेऊन, राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत निर्णय घेतला आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा कशा आणि कधी घेता येतील, यासाठी कुलगुरूंची समिती गठित करण्यात आली असून त्यांच्या शिफारशीनुसार परीक्षा घेण्यात येत आहेत.

आपले राज्य विविध क्षेत्रात, अभियानात सतत अव्वल राहिले आहे. नागरी स्वच्छता अभियानातील कामगिरीत सातत्य राखत या वर्षीच्या स्वच्छ सर्वेक्षण राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये देशातील सर्वाधिक पुरस्कार मिळवून राज्याने घोडदौड कायम राखली आहे. या अभियानातील राष्ट्रीय १२ पुरस्कारांपैकी सर्वाधिक ४ पुरस्कारांसह अन्य १३ असे एकूण १७ पुरस्कार राज्याला मिळाले. मोठ्या राज्यांच्या मानांकनात महाराष्ट्राने देशात दुसरा क्रमांक मिळवला. सलग तिसऱ्या वर्षी देशातील सर्वाधिक पुरस्कार मिळवत महाराष्ट्राने यंदा हॅट्ट्रिक साधली असून ही एक अभिमानास्पद कामगिरी ठरली आहे.

'लोकराज्य'च्या या अंकात ऑनलाइन शालेय शिक्षणासंदर्भात शासनाचे धोरण, त्याची अंमलबजावणी तसेच कौशल्य विकासाचे शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण यासारख्या क्षेत्रातील शैक्षणिक कार्याची माहिती देण्यात आली आहे. याचबरोबर शालेय शिक्षण, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन कल्याण आणि अल्पसंख्याक विकास विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनांची माहिती, महत्त्वाच्या घडामोडी व मंत्रिमंडळाचे निर्णय यांचाही समावेश अंकात करण्यात आला आहे. हा अंक आपणास निश्चित आवडेल याची मला पूर्ण खात्री आहे.

डॉ. दिलीप पांढरपट्टे
(मुख्य संपादक)

कोविड-१९ महामारीमध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य महत्त्वाचे म्हणून शाळा बंद ठेवल्या आहेत. विद्यार्थी शाळेत येत नसले तरी त्यांचे शिक्षण मात्र थांबलेले नाही. राज्य शासन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहे. विद्यार्थिहित सर्वतोपरी ठेवून शासन शिक्षण पोहोचवत आहे.

प्रा. वर्षा गायकवाड
मंत्री, शालेय शिक्षण

महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे. महाराष्ट्राने आतापर्यंत देशापुढे वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये आदर्श ठेवून देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. उद्योग व व्यापार या क्षेत्रांबरोबर शिक्षणक्षेत्रातही महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्राला एक ऐतिहासिक परंपरा आहे. १९४८ मध्ये मुलींच्या शिक्षणाचा पाया महात्मा जोतिबा फुले यांनी महाराष्ट्रात प्रथम रचला व मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शेतकरी तसेच बहुजन समाजातील आणि मागासवर्गीय कुटुंबातील मुलांना 'कमवा आणि शिका' या योजनेद्वारे शिक्षणाच्या प्रवाहात आणले. भारतरत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी समाजामधील विधवा महिलांसाठी शिक्षणाची कवाडे उघडी केली.

अशी परंपरा असलेल्या या राज्यांमध्ये जेव्हा कोविड-१९ प्रादुर्भावाचे संकट उभे राहिले तेव्हा, खचून न जाता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याने विविध उपक्रम सुरू करून, शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये आणि त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे ही भावना निश्चित करून ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून हे साध्य करण्याचे ठरवले.

प्रत्यक्ष शिक्षण सुरू

दुर्गम भाग व कोरोना प्रादुर्भाव नाही अथवा कमी आहे अशा ठिकाणी शिक्षक स्वतः सोशल डिस्टंन्सिंग (सामाजिक अंतराचे)चे नियम पाळून विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन शिकवत आहेत. ज्यामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांच्या गृहभेटी घेऊन आवश्यक गृह अध्यापन करून विद्यार्थी शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. तसेच काही शिक्षक शाळेमधील गावांमध्ये लाऊडस्पीकरच्या मदतीनेदेखील विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

गावामधील शिक्षणप्रेमी, सुशिक्षित ग्रामस्थ व तरुण हे स्वयंसेवकाच्या भूमिकेतून गावामधील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहेत, यासाठी आवश्यक ती सर्व कार्यप्रणाली शिक्षकांमार्फत तयार केली जात आहे. याचबरोबर शालेय व्यवस्थापन समिती व माता - पालक संघ यांच्या मदतीनेदेखील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. ज्या विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन शिक्षणाद्वारे पोहोचता येणार नाही अशा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षकांच्या मदतीने

विद्यार्थिहित सर्वतोपरी

विविध उपक्रम सुरू केले आहेत.

तंत्रज्ञानाचा वापर

तंत्रज्ञानात तर महाराष्ट्र अग्रेसर आहेच. त्यामुळे देशस्तरावर भारत सरकारने सुरू केलेल्या दीक्षा ॲपवर महाराष्ट्राचे ४६ टक्के शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे. हे शैक्षणिक साहित्य व्हॉट्सॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्यातील शिक्षक काम करत आहेत. डीडी सह्याद्री वाहिनीवर युनिसेफ, एमकेसीएल नॉलेज फाऊंडेशन आणि शिक्षण विभागाच्या सहकार्याने 'गली गली सिम सिम' हा कार्यक्रम दररोज सकाळी १० वाजता प्रक्षेपित करण्यात येतो. याचा लाभ मराठी माध्यमातील पहिलीचे व आठवीचे विद्यार्थी घेतात. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडे मोबाइल उपलब्ध आहेत, त्या पालकांना जिओ टीव्हीच्या सहकार्याने चार विविध भाषांमधून बारा शैक्षणिक चॅनेल्स उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. गुगल इंडियाच्या सहकार्याने गुगल क्लासेसच्या माध्यमातून महाराष्ट्राने राज्यातील ४० हजार शिक्षकांना ऑनलाइन क्लासेस घेण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण दिले असून, याद्वारे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा शासनाचा मनोदय आहे.

काही ठिकाणी स्थानिक प्रशासनाद्वारे रेडिओमार्फत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी काही उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. जिओच्या सहकार्याने जिओसावन रेडिओसुद्धा या कामात शासनास मदत करत आहे. कोविड-१९च्या प्रादुर्भावाच्या काळात ३९३६ केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवली, राज्याचे धोरण शाळांपर्यंत पोहोचवले. तसेच या सर्व कार्यक्रमांची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी आयोजित वेबिनारमध्ये भाग घेतला. राज्यातील ज्या भागांमध्ये ऑनलाइन शिक्षण देता येणे शक्य नाही अशा दुर्गम भागांमध्ये तेथील शिक्षकांनी स्वतः गावातील सुशिक्षित मुलांचा विषयमित्र अथवा गटप्रमुख म्हणून सहभाग घेऊन, त्यांच्या ज्ञानाचा उपयोग गावातील मुलांना शिक्षण देण्यासाठी करून घेतला असून काही शिक्षक स्वतः वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन ८ ते १० मुलांचे गट तयार करून त्या मुलांना शिक्षण देण्याचे काम निरंतर करत आहेत.

व्यापक आणि दर्जेदार शिक्षण

राज्यात कोविड-१९च्या महामारीमुळे शाळा बंद आहेत, मात्र ऑनलाइन पद्धतीने शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरू आहे. ज्या गोष्टी भविष्यातील म्हटल्या जायच्या, त्या या कोरोनाच्या संकटामुळे तातडीने कराव्या लागल्या आहेत. शाळा हे मुलांच्या सर्वांगीण विकासाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे ऑनलाइन शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत असले तरी ते पूरक म्हणूनच आहे. त्याबरोबरच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचवणे आणि त्या माध्यमातून एक सुदृढ समाज निर्माण करणे हे शासनाचे धोरण असल्याने, शाळांमधील शिक्षण अधिक व्यापक आणि दर्जेदार करण्यावर आमचा भर आहे. आज शाळा बंद आहेत, मात्र हे कोरोना संकट दूर होऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत लवकरात लवकर शाळा सुरू होतील, असा आम्हाला विश्वास आहे. जानेवारी महिन्यापासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासाठी मुख्यमंत्रीही अनुकूल असून त्याबाबत शासनाने एक तज्ज्ञ समिती नेमली आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर यावर निर्णय होईल. मात्र शासन कोणत्याही स्थितीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी तडजोड करणार नाही.

- ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, राज्यमंत्री, शालेय शिक्षण

घरपोच पाठ्यपुस्तके

शिक्षण विभागामार्फत राज्यातील विद्यार्थ्यांना घरपोच पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले आहे. या पाठ्यपुस्तकांच्या आधारे विद्यार्थी या काळामध्ये आपले शिक्षण सुरू ठेवत आहेत. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या व्हॉट्सॲप समूहाच्या माध्यमातून प्राप्त पाठ्यपुस्तकांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या गृह शिक्षणासाठी होत असल्याचे दिसून येत आहे.

पाठ्यक्रम कमी

कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रचलित पद्धतीप्रमाणे शाळा सुरू झालेल्या नाहीत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी इयत्ता पहिली ते १२ वी चा इयत्तानिहाय, विषयनिहाय २५ टक्के पाठ्यक्रम कमी करण्यात आला आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (बोर्ड) यांच्या समन्वयाने आणि अभ्यासक्रम समितीच्या निर्णयानुसार संबंधित विषयाचे सर्व अभ्यासक्रम मंडळ सदस्यांमार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी अभ्यासक्रमाचा मूळ गाभा तसाच ठेवून प्राथमिक स्तरावरील २२, माध्यमिक स्तरावरील २० आणि उच्च माध्यमिक स्तरावरील ५९ असे एकूण १०१ विषयांचा इयत्तानिहाय, विषयनिहाय २५ टक्के पाठ्यक्रम कमी करण्यात आला आहे.

कोविड-१९च्या प्रादुर्भावाच्या काळात ज्या ज्या संस्थांनी शिक्षण मुलांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे त्या संस्थांचे, शिक्षकांचे व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे मी मनापासून कौतुक करत आहे. प्रत्यक्षात शाळा सुरू होईपर्यंत हे काम असेच निरंतर व जोमाने सुरू राहील व कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची काळजी आपण सर्वजण घेऊ, पालकांनी यासाठी सहकार्य करावे, असे मी आवाहन करीत आहे.

शब्दांकन : अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

दिनकर पाटील

कोविड-१९ च्या महामारीने जगातील सर्वच व्यवहारांचे संदर्भ बदलून गेले आहेत. यात सर्वात जास्त परिणाम झाला तो शाळांवर पण या बदललेल्या परिस्थितीतही मार्ग काढले जात आहेत. राज्यात शाळा सुरू नाहीत, पण त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबलेले नाही. वेगवेळ्या तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य सुरूच आहे.

शाळा बंद... शिक्षण सुरू

प्रत्येक संकट मग ते व्यक्तिगत असो की, सामाजिक आव्हानासोबत संधी घेऊन येत असते. या आव्हानाला तोंड देत संधीचे सोने करणारे यशस्वी होतात. ही बाब शालेय शिक्षण विभागालाही लागू पडते. न थकता न थांबता व न हरता प्रयत्न करणाऱ्याला समोर कितीही अडचणी आल्या तरी यशाचे अनेक दरवाजे न कळत उघडत जातात. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे जगभरात गंभीर परिस्थिती उद्‌भवली आणि त्यात सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात या विषाणूचे गंभीर परिणाम टाळण्यासाठी आकस्मिकपणे २५ मार्च २०२० पासून प्रशासनाला टाळेबंदीचा निर्णय घ्यावा लागला. गेल्या दोन महिन्यांपासून काही अंशी व्यवहार सुरळीत झाले असले तरी अजुनही परिस्थिती पूर्ववत झालेली नाही. टाळेबंदीचा निर्णय घेताना तो इतक्या अनपेक्षितरीत्या आणि तातडीने घ्यावा लागला की, दहावी-बारावीच्या काही विषयांची परीक्षा, विद्यापीठाच्या अंतिम परीक्षा, तसेच इयत्ता पहिली ते नववीच्या अंतिम परीक्षा घेणे शक्यच झाले नाही. मार्चमधील राहिलेला अभ्यासक्रम तसाच अपूर्ण राहिला आणि विद्यार्थी, पालक, शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक संबंधित घटक गोंधळून गेला की आता पुढे काय? आणि कसे?

या सर्व संभ्रमावस्थेत शालेय शिक्षण विभागाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड आणि राज्यमंत्री ओमप्रकाश तथा बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनाखाली कोविड-१९मुळे निर्माण झालेल्या अडचणी, संभ्रम दूर करण्यासाठी तातडीने काही पावले उचलली आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून टाळेबंदी झालेले शिक्षण पुन्हा विद्यार्थ्यापर्यंत विविध मार्गाने पोहोचवण्यास सुरुवात केली. तंत्रज्ञानाचा अचूक वेळी योग्य पद्धतीने वापर करून शिक्षण विद्यार्थ्यांच्या घराघरांत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू केला आणि त्यात यशही मिळत गेले.

शाळा बंद ...पण शिक्षण आहे

टाळेबंदी झाल्यानंतर या उपक्रमांतर्गत राज्यस्तरावरून दुसऱ्या सत्राच्या उर्वरित अभ्यासक्रमांचे दैनंदिन नियोजन करून इयत्तानिहाय प्रत्येक विषयांतील घटकाची लिंक विकसित करून व्हॉट्सॲपच्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासाठी दीक्षा ॲपवरील ई-साहित्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला गेला. यामध्ये इयत्तानिहाय, विषयनिहाय घटकानुरूप चित्रे, संवाद, ध्वनिचित्रफिती, कृती, प्रयोग आदी उपलब्ध आहे. मे महिना हा उन्हाळी सुटीचा कालावधी असल्याने, २७ एप्रिलपासून या उपक्रमात सहशालेय उपक्रम व कृतीवर आधारित घटकांचा समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिशचा सराव याच माध्यमातून देण्यात आला, पूरक वाचनासाठी गोष्टीची पुस्तके, कार्यानुभवाच्या छोट्या कृती, इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी, कलेतील संगीत नाटक, गायन, वादनाचा समावेश असलेल्या विविध उपक्रमांच्या लिंक दररोज सकाळी आठ वाजता उपलब्ध करून दिल्या जात होत्या. १५ जूनपासून शाळेचे शैक्षणिक सत्र नेहमीप्रमाणेच सुरू झाले आहे. तीन महिन्यांपासून शाळा बंद

शिक्षणप्रक्रिया सुरळीत

कोरोनाने उद्याचे जग, उद्याची माध्यमे, उद्याचे शिक्षण कसे असेल याची आजच जाणीव करून दिली आहे. त्यामुळे आत्मविश्वासाने पुढे जाताना महाराष्ट्राच्या शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या या पिढीला पुढची स्वप्ने केवळ दाखवली नाहीत तर ती प्रत्यक्षात आणली आहेत. जी सूट आणि गुगल क्लासरूमच्या माध्यमातून असे पाऊल टाकणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले त्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. शासनासोबतच्या गुगलच्या भागीदारीमुळे राज्यातील २.३ कोटी विद्यार्थी आणि शिक्षक एकत्रित शिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रवेश करू शकणार आहेत. जी सूट फॉर एज्युकेशन, गुगल क्लासरूम, गुगल मीट यांसारख्या विनामूल्य साधनांसह दूरस्थ शिक्षणाची सोय यामुळे होणार आहे. गुगलच्या सहकार्याने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून राज्यातील सर्व भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणप्रक्रिया सुरळीत सुरू होण्यास मदत होईल.

- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

आहेत, पण राज्यातील इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना सकाळी आठवाजता विषयानुरूप त्यांचा रोजचा करावयाचा अभ्यास प्राप्त होत आहे. राज्यातील लाखो विद्यार्थी या ऑनलाइन स्वअध्ययन मालिकेचा लाभ घेत असून १.१६ कोटी इतक्या वेळा हे ई-साहित्य पाहण्यात आले आहे. देशातील एकूण दीक्षा वापरांपैकी ४६ टक्के विद्यार्थी एकट्या महाराष्ट्रातील आहेत. सदर अभ्यासमाला विद्यार्थ्यांना उपयुक्त असल्याबाबत राज्यामधून अनेक विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या प्रतिक्रिया प्राप्त होत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या साहाय्याने परिषदेने चार यु-ट्यूब चॅनल्ससुद्धा सुरू केले असून इयत्ता पहिली व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध विषयाशी संबंधित घटक सोप्या पद्धतीने यामध्ये दाखवण्यात आले आहेत.

शैक्षणिक दिनदर्शिका

राज्यातील इयत्ता पहिली ते दहावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसह सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दिनदर्शिकेची निर्मिती केली आहे. विद्यार्थ्यांचा घरी अभ्यास सुरू असला तरी सर्वांच्या शिकण्यात एकसूत्रता असावी असा प्रयत्न करण्यात आला आहे. ही दिनदर्शिका उर्दू माध्यमातूनही उपलब्ध आहे.

दूरदर्शनचा प्रभावी उपयोग

बालकांमध्ये कार्टूनच्या माध्यमातून काही सहजसोप्या, दैनंदिन जीवनाशी निगडित बाबी तसेच प्राथमिक स्वरूपातील शिक्षण; गोष्टीच्या स्वरूपात पोहोचवण्याचा प्रयत्न दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर युनिसेफच्या सहकार्याने केला जात आहे. 'गली गली सिम सिम' हा कार्यक्रम दररोज सकाळी दहा वाजता प्रक्षेपित होतो. एमकेसीएल नॉलेज फाऊंडेशन व शिक्षण विभागाच्या सहकार्याने सुरू असलेला 'टिलीमिली' हा दूरदर्शनवरील कार्यक्रमही मुलांना शिकण्यात मदत करीत आहे. इयत्ता पहिली ते आठवीसाठी २० जुलै २०२० पासून इयत्ता व विषयानुरूप घटकांचे सकाळी आठ ते बारा दरम्यान वेळापत्रकानुसार प्रसारण केले जात आहे. विद्यार्थी मोठ्या संख्येने हे कार्यक्रम बघून अभ्यास करत असल्याचे दिसून येते.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे १२ शैक्षणिक दूरचित्रवाणी वाहिन्या जीओ टिव्हीवर ज्ञानगंगा नावाने चार माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी माध्यमातून एकूण बारा शैक्षणिक वाहिन्या सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, शालेय शिक्षण विभागातील सर्व अधिकारी, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी, विषय साधन व्यक्ती, मोबाइल टीचर यांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे प्रसारित करण्यात येणारी अभ्यासमाला, विविध प्रशिक्षणे यांची माहिती, संदर्भ साहित्य, शासन निर्णय, ई साहित्य, अवांतर वाचनाची पुस्तके अथवा शिक्षकांसाठी, शाळांसाठी वेळोवेळी देण्यात येणारी अधिकृत माहिती तत्काळ एका क्लिकवर मिळवायची असल्यास; जीओ चॅट चॅनेलला जॉईन होऊन ही माहिती ते प्राप्त करू शकतात. तसेच ज्यांच्याकडे ही सुविधा उपलब्ध नाही त्यांच्यासाठी जीओ सावन रेडिओवरून शैक्षणिक कार्यक्रम सुरू केले आहेत.

डिजिटल क्रांतीचा योग्य वापर

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसह राज्यातील इतर विद्यार्थ्यांचे शिक्षण या कठीण काळात थांबू नये, आणि प्रत्येकाला शिक्षण मिळवता आले पाहिजे, यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि गुगल यांनी केलेले संयुक्त प्रयत्न गौरवास पात्र आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सुरू केलेला जी सूट आणि राज्य शाळांकरिता गुगल क्लासरूम कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. कोरोनाच्या संकट काळात शिक्षणात उद्‌भवलेल्या समस्येचे संधीत रूपांतर करून डिजिटल क्रांतीचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांना याचा उपयोग करून घेता येणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही समान आणि दर्जेदार शिक्षण यामुळे मिळण्याची सोय झाली आहे.

- अजित पवार, उपमुख्यमंत्री

गुगल क्लासरूम

शाळा बंद असल्या तरी शिक्षक व विद्यार्थी यांच्या आंतरक्रियांचे शिक्षणात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांना प्रत्यक्ष संवाद साधता यावा म्हणून राज्यातील सर्व १,०९,९४२ शाळा ७,६४,३३७ शिक्षक २,२३,५६,०३३ विद्यार्थी यांच्यासाठी गुगल क्लासरूम प्रकल्प कार्यान्वित केला आहे. जी सूट फॉर एज्युकेशन व गुगल क्लासरूमचे पहिल्या टप्प्यात चाळीस हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. उर्वरितांना पुढील टप्प्यात प्रशिक्षण दिले जाईल.

शाळेबाहेरची शाळा

शाळेबाहेरची शाळा हा कार्यक्रम प्रथम संस्थेच्या सहकार्याने प्रसारीत केला जातो. 'मिस कॉल द्या, गोष्ट ऐका' हा उपक्रम सुरू आहे. ०८०३३०९४२४३ या क्रमांकावर मिस कॉल देऊन मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड या भाषांतील गोष्टी मुलांना ऐकता येतात. नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये सध्या हा उपक्रम अंगणवाडी तसेच इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी दर मंगळवारी ते शुक्रवारी सकाळी १०:३५ वाजता रेडिओ चॅनल ५१२.८ khz आणि ५८५ khz वर सुरू असतो. गावातील मंदिरामधील लाऊडस्पीकरवर सध्या या कार्यक्रमाचे प्रसारण करण्याची सोय करण्यात आली आहे.

ऑफलाइन शिक्षण

ज्या मुलांकडे ऑनलाइन शिक्षणाच्या सुविधा नाहीत, टीव्ही, रेडिओसारखे माध्यमही उपलब्ध नाही अशा मुलांचे शिक्षण सुरू राहावे यासाठी राज्यात काही शिक्षकांनी विविधांगी प्रयत्न सुरू केले आहेत ते कौतुकास्पद आहेत. काही शिक्षक घरोघरी जाऊन कृतिपत्रिकेद्वारे शिकण्यास मदत करीत आहेत. काही सेवानिवृत्त शिक्षक सामाजिक अंतराचे नियम पळून ग्रामीण भागातील मुलांना शिकवत आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून मुलांचे शिक्षण सुरू राहावे म्हणून विषयमित्र गटप्रमुख यांसारख्या संकल्पना वापरून शिकण्याची प्रक्रिया सुरू ठेवली आहे. गावातील सुशिक्षित तरुण, सरपंच, पोलीस पाटील, शिकलेल्या माता, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षकमित्र बनून मुलांच्या शिक्षणासाठी विविध प्रकारे सहकार्य करीत आहेत.

पाठ्यपुस्तके उपलब्ध

दरवर्षी एप्रिल किंवा मे महिन्यापासून दहावी-बारावीचे विद्यार्थी अभ्यास करण्यास सुरुवात करतात. मात्र यंदा टाळेबंदीमुळे पुस्तकेच उपलब्ध नसल्याने सर्व विद्यार्थी काळजीत होते. त्यात या वर्षी बारावीचा अभ्यासक्रमही बदलला असल्याने त्यांची काळजी साहजिकच होती, पण शासनाने तातडीने निर्णय घेऊन फक्त बारावीचे नव्हे तर इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची सर्व पाठ्यपुस्तके बालभारतीच्या वेबसाईटला पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून दिली. विद्यार्थी त्यांच्या सोयीनुसार ती पुस्तक नि:शुल्क सहज अभ्यासू शकतात. याचा अतिशय सुखद परिणाम समोर आला आहे तो म्हणजे आतापर्यंत ६७ लाख वेळा ही पुस्तके डाऊनलोड करण्यात आली आहेत. याही पुढे जाऊन सत्र सुरू झाल्यानंतर शाळा बंद असल्यातरी शिक्षण विभागाने नवीन वर्गाची पुस्तके प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी पोहोचवली आहेत, जेणेकरून या पुस्तकांचा उपयोग करून मुले आपले शिक्षण सुरू ठेवू शकतील.

ऑनलाइन व्यावसायिक विकास मंच

टाळेबंदीमध्ये फक्त विद्यार्थ्यांचेच नव्हे तर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे सक्षमीकरण, ऑनलाइन व्यावसायिक विकास मंचद्वारे परिषदेने नियोजितपणे सुरू केले आहे. सहा एप्रिलपासून या उपक्रमास शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या मुलाखतीने सुरुवात झाली. राज्यातील शिक्षण उपसंचालक, डायटचे प्राचार्य, शिक्षणाधिकारी, जेष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, विषय सहायक व परिषदेतील सर्व अधिकारी असे राज्यातील जवळपास ८०० अधिकारी झूमद्वारे या ऑनलाइन सक्षमीकरण सत्रात सहभागी होतात. लीडरशिप फॉर इक्विटी या संस्थेच्या सहकार्याने हा कार्यक्रम सुरू करण्यात आला असून; माइंड फुलनेस, मूल्यमापन व सनियंत्रण, ताणतणावाचे व्यवस्थापन, शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाची भूमिका, विविध देशातील शैक्षणिक धोरणे व तेथील शैक्षणिक प्रयोग, दिल्लीमधील शैक्षणिक प्रयोगांबाबत दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, रघुनाथ माशेलकर यांचे शिक्षणाबद्दलचे विचार, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांचे सुजाण पालकत्व, अच्युत गोडबोले यांचे माझ्या लेखनामागची प्रेरणा तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विठ्ठल वाघ, डॉ. यशवंत पाटणे, श्री. इंद्रजीत भालेराव 'अधिकारी घडताना', संदीप वासलेकर यांचा 'ज्ञानाचा प्रवास' ते आंतरराष्ट्रीय खेळाडू तेजस्विनी सावंत व वीरधवल खाडे यांचे 'स्फूर्तिदायक प्रवास' अशी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उद्बोधन करणारी व प्रेरणा देणारी २५ सत्रे झाली आहेत.

२१ ऑगस्टपासून 'ऑनलाइन शिक्षक विकास मंच' या उपक्रमाला सुरुवात केली आहे. कोविड-१९च्या काळात शाळा बंद असताना काही शिक्षकांनी स्वप्रेरणेने विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये म्हणून अनेक सर्जनशील कल्पना वापरून विविध उपक्रमांतून, योग्य ती काळजी घेत मुलांचे

मनस्वी आनंद

ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थी व शिक्षक यांच्यामधील दुरावा कमी होऊन प्रत्यक्ष आंतरक्रिया घडून येत आहे. भ्रमणध्वनी नसणे, इंटरनेटचा अभाव, आर्थिक भार या ऑनलाइन शिक्षणास मर्यादा असल्या तरी या माध्यमातून आंतरक्रियेद्वारे प्रभावी शिक्षण घडून येत असल्याचा मनस्वी आनंद असला तरी प्रत्यक्ष वर्गात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची बरोबरी अशक्य आहे.

- जगन्नाथ लक्ष्मण धायगुडे (प्राथमिक पदवीधर)

शिक्षण सुरू ठेवले आहे, अशा शिक्षकांच्या यशोगाथा वेबिनारच्या माध्यमातून सर्वांपुढे आणण्याचा हा उपक्रम सुरू आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कोविड योद्धे म्हणून सर्व शिक्षकांना पाणी, स्वच्छता व आरोग्य या विषयावर लर्निंग फ्रॉम होम (Learning from home) हे प्रशिक्षण देण्यात आले.

केंद्रप्रमुख सक्षमीकरण

केंद्रप्रमुख हा प्रशासकीय यंत्रणेतील शिक्षण व शाळांसाठी जवळचा घटक आहे. या बदलत्या पार्श्वभूमीवर त्यांचे उद्‌बोधन आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता वेबिनारद्वारे केंद्रप्रमुख शैक्षणिक नेतृत्व विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमांचे पाच सत्रांचे नियोजन आहे. केंद्रप्रमुख हा केंद्रातील शाळांचे नेतृत्व करीत असतो. केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षकांना मार्गदर्शन करणे, शालेय गुणवत्ता वाढवणे, राज्याचे धोरण शाळांपर्यंत पोहोचवणे, त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम केंद्रप्रमुख करत असतात. या सर्व बाबी अधिक परिणामकारक व्हाव्यात यासाठी वेबिनारच्या माध्यमातून उद्‌बोधन केले जात आहे. यामध्ये जवळपास ३९३६ केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी गटशिक्षणाधिकारी यांनी सहभाग नोंदवला आहे. प्रत्येक सत्रामध्ये या वेबिनारच्या माध्यमातून केंद्रप्रमुखांना कामाची दिशा देण्यात येत आहे.

महाकरिअर पोर्टल

संधी व गरज लक्षात घेऊन राज्य शासनाने महाकरिअर पोर्टलच्या निर्मितीचे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र व युनिसेफ आणि आय ड्रीम करिअर यांच्या सहकार्याने संयुक्तरीत्या हे पोर्टल विकसित केले असून पोर्टलवर इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर संबंधात हवी असलेली माहिती मिळणार आहे. १३,७२८ शासकीय व अनुदानित शाळांमधील ३७.९ लाख विद्यार्थी या करिअर पोर्टलचा उपयोग करू शकतील. या पोर्टलवर ५५५ व्यावसायिक आणि कौशल्याधिष्टीत करिअरची स्वतंत्रपणे माहिती उपलब्ध करून दिली आहे. ही माहिती इंग्रजी आणि मराठी भाषेत उपलब्ध आहे. येथे २१,१२२ महाविद्यालये, व्यावसायिक संस्थांची माहिती उपलब्ध असून देशासह अन्य देशातील विविध अभ्यासक्रमाची माहिती येथे दिली आहे. देशांतर्गत होणाऱ्या ११२७ प्रवेश परीक्षाची माहिती या पोर्टलवर उपलब्ध होणार आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ११२७ शिष्यवृत्त्यांबद्दलची माहिती तसेच शासन पुरस्कृत विविध शालेयस्तरावरील स्पर्धा परीक्षाची माहिती या पोर्टलवर उपलब्ध होणार आहे. राज्यात ४२० समुपदेशक कार्यरत असून त्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत असलेल्या व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन कक्षामार्फत विद्यार्थ्यांना अधिक मार्गदर्शन सहज उपलब्ध होऊ शकते. या महिन्याच्या अखेरपर्यंत ३१,३३९ विद्यार्थ्यांनी समुपदेशनाचा लाभ घेतलेला आहे.

हे सर्व उपक्रम म्हणजे टाळेबंदीच्या काळातही शांत स्वस्थ न बसता निरंतर शिक्षण विकासातून शाश्वत विकासाकडे मार्गक्रमण करण्याची ही नांदी आहे. अजूनही २०-३० टक्के विद्यार्थी या सर्वच बाबींपासून वेगवेगळ्या कारणांमुळे अलिप्त आहेत. पण म्हणून हातावर हात धरून बसून वाट बघण्यापेक्षा उपलब्ध संसाधनाचा जास्तीत जास्त उपयोग करून, अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न आहे. कोविड-१९चे संकट तूर्तास संपणारे नाही त्याच्या सोबतच जगणे आणि पुढे जाणे हे शिकायलाच पाहिजे आणि हे शिकवण्याचे एक आदर्श उदाहरण शिक्षण विभागाने या उपक्रमांच्या माध्यमातून घालून दिले आहे.

लेखक पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक आहेत.

शाळेचा आनंद हवा

मला स्वतःला वर्गातच शिक्षण घ्यावे वाटते. ऑनलाइन शिक्षणात इंटरनेटची अडचण येते. त्यात तेवढे छान समजत नाही. तरी त्याची सध्या गरज आहे. आमचे शिक्षक एप्रिल महिन्यापासूनच व्हिडिओ करून व्हॉट्सॲपवर पाठवत आहेत. गुगल मीटच्या माध्यमातून ऑनलाइन शिकवतही आहेत. आमच्या शिक्षणासाठी शिक्षक खूप प्रयत्न करत आहेत पण प्रत्यक्ष वर्गात व ऑनलाइन शिकणे यात खूप अंतर आहे.

- कु. ज्ञानेश्वरी पांडुरंग जाधव, इयत्ता पाचवी,
जि.प. आदर्श कन्या प्राथमिक शाळा तडवळे, ता.जि. उस्मानाबाद

कोरोनाचे संकट संपूर्ण जगावर आले आहे. सुरुवातीच्या काळात आरोग्यविषयक वाटणारे हे संकट पुढे फक्त आरोग्यविषयक राहिले नाही, या संकटाने आता आर्थिक संकटाचेही रूप घेतले आहे. त्यामुळे येता काळ सर्वांसाठीच आव्हानात्मक आहे. लॉकडाऊनविषयक शासनाच्या नियमानुसार शैक्षणिक संस्था सुरू करण्याचा निर्णय झाल्यानंतर आयटीआयही सुरू करण्यात येतील.

कौशल्याबरोबर रोजगारही

नवाब मलिक
मंत्री, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, अल्पसंख्याक विकास व औकाफ

कोरोनाकाळात उद्योगधंद्यांवर विपरीत परिणाम झाल्याने अनेकांचे रोजगार गेले आहेत. उद्योगधंद्यांना पुन्हा उभे करून बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे मोठे काम आपल्याला करावे लागणार आहे. त्या दृष्टीने या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग सज्ज झाला असून व्यापक उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

आयटीआयमधील जागा

राज्यातील तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी विभागामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) चालवल्या जातात. यासाठीची प्रवेशप्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे. लॉकडाऊनविषयक शासनाच्या नियमानुसार शैक्षणिक संस्था सुरू करण्याचा निर्णय झाल्यानंतर आयटीआयही सुरू करण्यात येतील. यंदा राज्यातील ४१७ शासकीय व ५६९ खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ८४ व्यवसाय अभ्यासक्रमांच्या ६ हजार ८६८ तुकड्यांमधून एकूण १ लाख ४५ हजार ६३२ जागा उपलब्ध आहेत. यंदा आयटीआय प्रवेशप्रक्रियेस विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. उपलब्ध जागांपेक्षा काहीपट जास्त अर्ज प्राप्त झाले, त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही आयटीआयच्या सर्व जागा भरल्या जातील. प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याबरोबरच त्यांना त्यानंतर इंटर्नशिपची संधी मिळवून देणे, नोकरी मिळवून देणे यासाठीही कौशल्य विकास विभाग आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत प्रयत्न करण्यात येतील. आयटीआयविषयक सविस्तर माहिती https://www.dvet.gov या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

राज्यातील सर्व शासकीय आयटीआयचा कायापालट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील आयटीआयचे टाटा टेक्नॉलॉजीच्या सहयोगातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आयटीआयमध्ये रूपांतरण करण्यात येत आहे. यासाठी साधारणत: १२ हजार कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. नवीन उद्योग, त्यामध्ये आवश्यक असलेले नवे कौशल्य या अनुषंगाने अभ्यासक्रमांची फेरआखणीही करण्यात येत आहे, जेणेकरून आयटीआय पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास तातडीने नोकरी मिळायला मदत होईल.

शिकाऊ उमेदवारी योजना

आयटीआय उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यास औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने शिकाऊ उमेदवारी योजना राबवली जाते. शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीमध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार विद्यावेतन मिळते. या योजनेंतर्गत राज्यातील सुमारे ११ हजार औद्योगिक आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारांच्या एकूण १ लाख जागा स्थित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आयटीआय उत्तीर्ण

होणाऱ्या प्रत्येक उत्तीर्ण उमेदवारास यासाठी संधी मिळते.

शाळा अर्धवट सोडलेल्यांसाठी

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे नाव आता 'महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळ' असे करण्यात आले आहे. मंडळांतर्गत विविध गटातील शैक्षणिक अर्हतेनुसार ६ महिने कालावधीचे १५२ अभ्यासक्रम, १ वर्ष कालावधीचे ९६ आणि २ वर्ष कालावधीचे ४४ अर्धवेळ व पूर्णवेळ असे एकूण २९२ अभ्यासक्रम राबवण्यात येतात. हे अभ्यासक्रम जिल्हा, तालुका, ग्रामीण भागात मंडळाने मान्यता दिलेल्या १ हजार ०८४ संस्थांमध्ये राबवण्यात येत आहेत. या अभ्यासक्रमांसाठी साधारणपणे प्रतिवर्षी ५० ते ६० हजार विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. खेड्यापाड्यांतील गोरगरीब विद्यार्थी मान्यताप्राप्त संस्थांमध्ये प्रवेश घेऊन प्रशिक्षण पूर्ण करतात. मंडळाचे अभ्यासक्रम हे रोजगार व स्वयंरोजगारास चालना देण्याच्या दृष्टीने, विशेषकरून शाळा अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरतात. मंडळामार्फत चालवले जाणारे विविध अभ्यासक्रम आदींची माहिती http://www.msbve.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ऑनलाइन रोजगार मेळावे

विभागाने लॉकडाऊनच्या काळात राज्यभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाइन रोजगार मेळाव्यांची मोठी मोहीम सुरू केली आहे. प्रत्येक जिल्हास्तरावर ऑनलाइन रोजगार मेळावे घेण्यात येत आहेत. एप्रिल ते जूनमध्ये २४ ऑनलाइन रोजगार मेळावे झाले तर फक्त जुलै महिन्यात ३१ मेळावे झाले. जुलैमध्ये झालेल्या मेळाव्यांमध्ये २०४ उद्योजकांनी सहभाग घेतला. त्यांच्याकडील १९ हजार ०७८ जागांसाठी त्यांनी ऑनलाइन मुलाखती घेतल्या. या मेळाव्यांमध्ये १८ हजार १५३ नोकरीइच्छुक तरुणांनी सहभाग घेतला. त्यापैकी आतापर्यंत १ हजार ६५१ तरुणांना रोजगार मिळाला आहे. उर्वरित जागांसाठी उर्वरित तरुणांमधून निवड प्रक्रिया सुरू आहे.

विविध योजना ऑनलाइन

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा सेवायोजन कार्यालयाकडे किंवा https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नावनोंदणी केलेल्या बेरोजगार उमेदवारांना सर्व सेवा, सुविधा ऑनलाइन पद्धतीने संकेतस्थळाच्या माध्यमातून देण्यात येत आहेत. राज्यभरातील वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध रोजगार मेळाव्याची सर्व माहिती मिळवणे व त्यासाठी उत्सुकता व पसंतीक्रम नोंदवणे, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी म्हणून सहभाग मिळवणे, केंद्र व राज्य शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध कौशल्य विकास योजना व कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था यांची माहिती प्राप्त करणे व सहभाग घेणे, आपली शैक्षणिक पात्रता अद्ययावत करणे, पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल यामध्ये दुरुस्ती करणे, वेगवेगळ्या उद्योजकांनी वेळोवेळी अधिसूचित केलेली रिक्तपदांची माहिती मिळवून त्यासाठी उमेदवारीचा अर्ज सादर करणे आदी बाबींचा त्यात समावेश

महास्वयम वेबपोर्टल

बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरू केले आहे. या वेबपोर्टलवर बेरोजगार उमेदवार आपले शिक्षण, कौशल्ये, अनुभव आदी माहीतींसह नोंदणी करू शकतात. त्याचबरोबर कुशल उमेदवारांच्या शोधात असलेल्या कंपन्या, उद्योजक, कॉर्पोरेट्स हेसुद्धा या वेबपोर्टलवर नोंदणी करून त्यांना हवे असलेले कुशल उमेदवार शोधू शकतात. अशा प्रकारे बेरोजगार आणि उद्योजक यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्याचे काम या वेबपोर्टलमार्फत करण्यात येते. नोकरीइच्छुक तरुणांनी या वेबपोर्टलवर आधार क्रमांकासह नोंदणी करावी. आधी नोंदणी केलेल्या उमेदवारांनीही आपली माहिती अद्ययावत करावी, तसेच कुशल उमेदवारांच्या शोधात असलेले खासगी, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजक, कॉर्पोरेट्स यांनीही या वेबपोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन करतो.

विभागाने लॉकडाऊनच्या काळात जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये आयोजित केलेले ऑनलाइन रोजगार मेळावे आणि महास्वयम वेबपोर्टलमार्फत एप्रिल ते जुलै महिन्यात एकूण ३९ हजार २८७ बेरोजगारांना रोजगार मिळवून दिला आहे. एप्रिल ते जूनअखेर या वेबपोर्टलवर १ लाख ७२ हजार १६५ नोकरीइच्छुक उमेदवारांनी नवीन नोंदणी किंवा पुनर्नोंदणी केली आहे. जुलै महिन्यात ५८ हजार १५७ बेरोजगारांनी रोजगारासाठी नोंदणी किंवा पुनर्नोंदणी केली आहे.

महत्त्वाचे निर्णय, कामगिरी

- बेरोजगारांना रोजगार उपलब्धतेसाठी काम करण्याच्या अनुषंगाने 'कौशल्य विकास आणि उद्योजकता' विभागाच्या नावात आता 'कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता' विभाग असा बदल
- राज्यात अर्थसाहाय्यित, स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्याच्या अनुषंगाने समिती गठीत.
- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये अनुकंपा तत्त्वावर वायरमन (तारतंत्री) पदाच्या नोकरीसाठी पात्र असलेल्या पण आवश्यक प्रशिक्षणाअभावी नोकरीपासून वंचित राहिलेल्या ५६९ तरुणांना आयटीआयमधून प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी मिळवून देण्याचा निर्णय.
- कोरोना संकटकाळात महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत रुग्णांच्या कॉन्टॅक्ट ट्रेसिंगसाठी महाकवच मोबाइल ॲप, टेलिमेडिसिन हेल्पलाईन तसेच कोरोनाच्या प्राथमिक चाचणीसाठी सेल्फ असेसमेंट टूल विकसित.
- कोरोना संकटकाळात नावीन्यता सोसायटीमार्फत सीएसआरच्या माध्यमातून ५२ कोटींहून अधिक रकमेच्या मदतीची उभारणी आणि वाटप.

करण्यात आला आहे. उद्योजकांच्या मागणीनुसार उमेदवारांच्या याद्यांमध्ये समावेश होण्यासाठी नोंदणीस आधार लिंक असणे आवश्यक आहे. अनेक बाबींचा लाभ मिळवण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने नोंदणीस आधार कार्ड जोडणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

ऑनलाइन समुपदेशन

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या संकटकाळात सध्याचा लॉकडाऊनचा कालावधी बघता उमेदवारांना प्रत्यक्ष समुपदेशन करणे शक्य होत नसल्याने विभागामार्फत आता ऑनलाइन समुपदेशन आयोजित करण्यात येत आहे. या सत्रांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. यासाठी सोशल मीडिया, व्हिसी घेण्याचे विविध ॲप्लिकेशन्स यांचा वापर करण्यात येत आहे. उमेदवारांना एकत्रित गट तसेच वैयक्तिक ऑनलाइन समुपदेशन करण्यात येते. दिव्यांग उमेदवारांसाठी विशेष समुपदेशन सत्राचे आयोजन केले जाते. कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार, मुलाखतीची तयारी, बायोडेटा, सिव्ही तयार करणे, ग्रुप डिस्कशन, दहावी, बारावीनंतर करिअरच्या संधी, उद्योगांमधील आयओटी, कोरोनाच्या अनुषंगाने व त्यानंतर उपलब्ध होणाऱ्या रोजगार, स्वयंरोजगार संधी, महास्वयम्,

एनसीएस वेबपोर्टलबाबत माहिती, उद्योजकता विकास, आंतरवासिता उमेदवारी इत्यादीबाबत माहिती या ऑनलाइन समुपदेशनांमध्ये देण्यात येत आहे. राज्यात जुलैमध्ये ४९ ऑनलाइन समुपदेश मेळावे झाले असून त्यात ६१ हजार ५७३ उमेदवारांनी सहभाग घेतला.

स्टार्टअप्सना चालना

महाराष्ट्रामध्ये अनुकूल व्यावसायिक वातावरण निर्मिती करून तरुणांमधील नवकल्पनांना प्रोत्साहन देणे तसेच रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी स्टार्टअप्सना चालना देण्यात येत आहे. याअनुषंगाने नुकताच ऑनलाइन महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीतर्फे आयोजित केलेल्या या स्पर्धेत देशभरातील १ हजार ६०० स्टार्टअप्सनी सहभाग घेतला. त्यातील उत्कृष्ट १०० स्टार्टअप्सनी सप्ताहात सहभाग घेतला. तरुणांनी वैशिष्ट्यपूर्ण कल्पकता दाखवत कृषी, शिक्षण, कौशल्य विकास, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, प्रशासन आदी विविध क्षेत्रात अभिनव बदल घडवू शकणाऱ्या स्टार्टअपचे सादरीकरण केले. सप्ताहातील उत्कृष्ट २४ स्टार्टअप्सना त्यांची नावीन्यपूर्ण उत्पादने, सेवा या संबंधित शासकीय विभागांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपयांपर्यंतचे शासकीय कामाचे कार्यादेश देण्यात येतील. या २४ कल्पनांचा वापर शासनाच्या विविध विभागांमधील कामकाजासाठी करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीच्या विविध योजना तसेच स्टार्टअपसंदर्भातील संपूर्ण माहिती https://www.msins.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शब्दांकन : इर्शाद बागवान,
विभागीय संपर्क अधिकारी

मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून कोविड-१९ या महामारीचा आपल्या देशात शिरकाव झाला आणि आरोग्याच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. यानंतर लॉकडाऊनचा निर्णय झाल्यामुळे, पुढचे दोन महिने सुट्टीतच गेले आणि शिक्षणाचा मुद्दा कमी महत्त्वाच्या बाबींमध्ये टाकता आला. मात्र शाळा, शिक्षण हे फार लांबणीवर टाकता येणार नाही, असे लक्षात आल्यानंतर जगभरात अनेक नवनवीन प्रयोग आणि पर्याय समोर येत आहेत.

शिक्षण अविरत

नंदकुमार वाघमारे

वेगवेगळ्या भूमिकांच्या अनुषंगाने वेगवेगळे उपाय सुचवले जात आहेत. तत्काळ सुचवलेला स्वाभाविक पर्याय म्हणजे ई-लर्निंग/ऑनलाइन शिक्षण. अर्थातच शहरी भागात हा पर्याय अमलात आणणे सोपे आहे. पालकांकडे स्मार्टफोन असतात इंटरनेट कनेक्टिव्हिटी पण असते. पण आदिवासी खेड्यांमध्ये याला बऱ्याच मर्यादा येतात. वरील सुविधा साधारण ३० टक्के मुलांनाच उपलब्ध आहेत व त्यातही विजेचा खंडित पुरवठा असल्याने अडचणी येतात. तसेच अनेक पालक शेतावर कामासाठी जात असल्याने खूपच कमी वेळ मुलांना फोन उपलब्ध होतो. त्यामुळे लाईव्ह ऑनलाइन क्लास तर शक्यच नाही. तसेच, इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या कन्टेन्मेंटमध्ये आदिवासी जीवनाचा आशय आढळत नाही. त्यामुळे हे कन्टेन्मेंट जसेच्या तसे वापरता येत नाही. त्याचबरोबर, मुलांचे पोषण, आरोग्य, पालकांचा उपजीविकेचा प्रश्नही आहेच.

असे सुरू झाले अनलॉक लर्निंग

या सर्वांचा विचार करून राज्याचे आदिवासी विकास मंत्री ॲड. के. सी. पाडवी यांनी महाराष्ट्र दिनाच्या दिवशी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी प्रामुख्याने ऑफलाइन शिक्षणाची कल्पना मांडली. त्यावर आदिवासी विकास आयुक्त डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विचार होऊन 'अनलॉक लर्निंग' ही संकल्पना आकारास आली. आदिवासी विकास विभागाच्या एकूण १,०६० रहिवासी आश्रमशाळा व एकलव्य शाळांमधून ४ लाख २८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मार्च २०२० पासून कोरोना महामारीची परिस्थिती लक्षात घेता या शाळा २०२०-२१ च्या प्रथम शैक्षणिक सत्रामध्ये नियमित पद्धतीने सुरू करणे शक्य नाही. पण शाळा विद्यार्थ्यांसाठी बंद ठेवल्या तरी त्यांचे शिक्षण अविरतपणे सुरू ठेवण्याचा निश्चय आदिवासी विकास विभागाने केला. जून २०२० मध्ये अवघ्या १२ दिवसांच्या कालावधीत, विभागातील व महाराष्ट्रातील शैक्षणिक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने अनलॉक लर्निंग या सर्वंकष प्रकल्पाची संकल्पना उदयास आली. अनलॉक लर्निंग प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना आपल्याच घरी व परिसरात राहून अनौपचारिक व रंजक पद्धतीने ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून शिकण्याची संधी मिळाली आहे.

अनलॉक लर्निंग उपक्रमामध्ये शिक्षण हक्क कायदा २००९ व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या तरतुदीतील अनुषंगाने अनेक मूलभूत घटक अंतर्भूत आहेत. मूलभूत शैक्षणिक संकल्पनांच्या आधारावर तयार केलेला आराखडा आणि त्याच्या अंमलबजावणीसाठीचे बारकाईने केलेले नियोजन ही या प्रकल्पाची ताकद आहे. औपचारिक आणि कृतियुक्त अनौपचारिक शिक्षण, अनुभव शिक्षण, सहशिक्षण (पिअर लर्निंग), पालकांचा आणि परिसरातील इतर व्यक्तींचा शिकण्या-शिकवण्यामध्ये सहभाग आणि महत्त्वाचे म्हणजे आपल्याच परिसरातील घटकांचा संदर्भ लावत स्वतःच्या शिकण्यामध्ये पुढाकार घेत शिकण्याचा अनुभव या मूल्यांच्या आधारावर या प्रकल्पाची रचना झाली आहे.

स्थानिकांचा सहभाग

अनलॉक लर्निंगच्या माध्यमातून गावागावांत शैक्षणिक वातावरण निर्माण व्हावे व विद्यार्थ्यांना शिक्षणाव्यतिरिक्त गावातील इतर संसाधन व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे यासाठी 'स्थानिक संसाधन समूहांचे गठन' करण्याची संकल्पना समोर आली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी

पाठ्यपुस्तके घरपोच

पाठ्यपुस्तकांसोबत स्वयंअध्ययनाद्वारे शिकता यावे यासाठी कार्यपुस्तिका तयार केल्या आहेत. यामध्ये मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान व समाजशास्त्र या विषयातील मूलभूत संकल्पना या आदिवासी आशय व दैनंदिन जीवनाचा संदर्भ देऊन सुस्पष्ट केल्या आहेत. त्यासोबत सरावासाठी प्रश्नावली दिली आहे. या कार्यपुस्तिका इयत्ता दुसरी ते १० वी पर्यंतच्या अभ्यासक्रमासाठी तयार केल्या आहेत. अभ्यासपूरक शिक्षणासाठी कृतिपुस्तिकाही तयार केल्या गेल्या आहेत.

कला, हस्तकला, परिसराची ओळख, आरोग्य, जीवनकौशल्य इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी निरीक्षण, प्रयोगशीलता, नवनिर्मिती, माहिती संकलन ही माध्यमे वापरणे अपेक्षित आहे. अनेक शिक्षकांनी अभ्यासक्रमातील मूलभूत संकल्पनांवर आधारित व्हिडिओ बनवले आहेत. स्मार्टफोन व इंटरनेट उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंगच्या माध्यमातून शिक्षण दिले जात आहे. १५ जुलैपर्यंत साधारण १.५५ लाख मुलांपर्यंत पाठ्यपुस्तके घरपोच देण्यात आली आहेत.

घरी राहून शिक्षण चालू राहावे, यासाठी शिक्षक गृहभेटीद्वारे मार्गदर्शन करतात. साधारण ४,९८४ शिक्षकांनी प्रत्येकी २० - २५ मुलांचे पालकत्व स्वीकारून ग्रीन झोनमधील गावात ७-१० दिवसातून एकदा गृहभेटी सुरू केल्या आहेत. अभ्यासातील मार्गदर्शनाव्यतिरिक्त कोरोना संदर्भात उद्‌बोधन, आरोग्याची काळजी, कुटुंबाला येणाऱ्या अडचणी, इत्यादी संदर्भात विचारपूसही करतात. याद्वारे विद्यार्थी-पालक-शाळा हे नाते अधिक दृढ बनते आहे. आतापर्यंत ६000 पेक्षा अधिक गृहभेटी राज्यभरात करण्यात आल्या.

दीड लाख मुलांना पाठ्यपुस्तकांचे घरपोच वाटप व शिक्षकांच्या गृहभेटीद्वारे शिक्षण देणे सुरू.

तळमळ असणाऱ्या व्यक्ती, सुशिक्षित पालक, होस्टेलचे विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती, शाळा समन्वय समिती, इत्यादींचा अंतर्भाव होऊ शकतो. आतापर्यंत ६,७५० स्थानिक संसाधन समूह शिक्षकांनी बनवले आहेत. या समूहांद्वारे ३३,७५० स्थानिक कार्यकर्त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली आहे. शासकीय वसतिगृहाच्या गृहपालांचा व वसतिगृहामधील आजी-माजी विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे.

आरोग्य व उपजीविकेची काळजी

याव्यतिरिक्त फिरत्या आरोग्य पथकांद्वारे गाव पातळीवर मुलांची व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी व दररोज १५00 टेलिकॉलद्वारे आरोग्याची चौकशी करून मार्गदर्शन केले जाते. आवश्यकतेनुसार सरकारी रुग्णालयात संदर्भ तपासणी/उपचारासाठी पाठवले जाते. जुलै-ऑगस्ट २०२० कालावधीत दुर्गम भागातील १,८00 मुलांची तपासणी करण्यात आली आहे. ज्या कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन सद्य:स्थितीत बंद आहे त्यांच्यासाठी आदिवासी विकास महामंडळ व ३० एकात्मिक आदिवासी विकास कार्यालयांच्या मदतीने उपजीविकेशी संबंधित योजनांचा उपयोग करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

गावपातळीवर मुले व त्यांच्या कुटुंबीयांची फिरत्या आरोग्य पथकातर्फे आरोग्य तपासणी.

अवघ्या अडीच महिन्यांच्या कालावधीत अनलॉक लर्निंगच्या माध्यमातून दुर्गम भागात अनेक आव्हाने पेलून एक शैक्षणिक चळवळ निर्माण झाली आहे. कोरोना संसर्गाच्या या बिकट परिस्थितीमध्येही आदिवासी मुले कुठल्याही प्रकारे वंचित राहू नयेत यासाठी तळमळीने झटणाऱ्या शिक्षक, गृहपाल, वसतिगृहाचे विद्यार्थी, गावातील स्वयंसेवक व विभागाचे अधिकारी यांचे अविरत प्रयत्न चालू आहेत. या चळवळीचा सकारात्मक व दूरगामी परिणाम आदिवासी शिक्षण व्यवस्थेवर नक्कीच होईल हे मात्र निश्चित आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

कोविड-१९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे केंद्र आणि राज्य शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. राज्यातील कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन विद्यापीठ आणि महाविद्यालय परीक्षांसंदर्भात राज्य व्यवस्थापन प्राधिकरणांच्या बैठकीत परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या परीक्षेसंदर्भातील निर्णयाचा आदर करून राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षेची तयारी केली आहे. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि आरोग्याच्या दृष्टीने विचार करून विद्यार्थ्यांना घरी बसूनच परीक्षा देता यावी, याचे नियोजन करण्यात येत आहे.

विद्यार्थिहिताला प्राधान्य

उदय सामंत
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

राज्यातील कोविड-१९ या साथरोगाचा प्रादुर्भाव व वाढती रुग्णसंख्या लक्षात घेऊन सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर वर्गाच्या आरोग्याची काळजी आणि सुरक्षितता याला सर्वोच्च प्राधान्य देऊन परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. विद्यार्थी, पालक, जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासन, समितीचे सर्व सदस्य, राज्यपाल महोदय भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व कुलगुरू यांची बैठक घेऊन यावर सविस्तर चर्चा करून १५ सप्टेंबर २०२० पासून अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. परीक्षा आणि निकालाची ही सर्व प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. यात एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही आणि विद्यार्थी घरी बसून परीक्षा देऊ शकेल असे सर्वतोपरी राज्यातील सर्व विद्यापीठे प्रयत्न करत आहेत.

अपवादात्मक परिस्थितीमध्ये जेथे शक्य नसेल तेथे स्थानिक प्रशासनाची पूर्व परवानगी घेऊन व आरोग्य आणि सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करून नजीकच्या केंद्रावर परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

परीक्षेचे नियोजन

विद्यार्थ्यांना कोणत्याही मानसिक त्रासाला सामोरे जावे लागणार नाही याची विशेष काळजी घेऊन सहज आणि सुलभ पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा कशा घेता येतील यासाठी संदर्भात गठित केलेल्या कुलगुरूंच्या समितीने परीक्षा पद्धतीसंदर्भात अनेक पर्याय सुचवले आहेत. त्यानुसार नियोजन करण्यात येत आहे.

सर्व विद्यापीठांची अनेक बाबतीतील विषम परिस्थिती लक्षात घेऊन कमीत-कमी कालावधीच्या परीक्षा घ्याव्यात. तसेच परीक्षा शक्यतो ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात. पण जिथे पूर्णतः ऑनलाइन पद्धतीने घेणे शक्य नसेल तिथे ब्लेंडेड (मिश्र) (ऑनलाइन व ऑफलाइन) किंवा ऑफलाइन (पेन आणि पेपर) पद्धतीने घ्याव्यात. यामध्ये बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू)/ओएमआर पद्धतीचा समावेश असेल. अशा पद्धतीनुसार त्या-त्या विद्यापीठांच्या सोयीनुसार परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधांसह त्यांना सोयीचे पडेल अशा पद्धतीने परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी ज्यांचे प्रकल्प/अहवाल आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक विद्यापीठ कार्यपद्धतीचा अवलंब करत आहे. प्रात्यक्षिक परीक्षा आणि व्हावया-व्होसे यासाठी स्काईप किंवा अन्य मीटिंग ॲप्स किंवा टेलेफोनिक पद्धतीचा वापर करत प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन लेखी परीक्षांच्या आधी करण्यात येत आहे. अंतिम सत्र/वर्षाची परीक्षा देणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांचे बॅकलॉग असतील अशा विद्यार्थ्यांच्याही परीक्षा यावर नमूद केलेल्या पद्धतीनुसारच घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

दक्षता घेऊन परीक्षा

परीक्षा पद्धती आणि वेळापत्रक विद्यापीठ/महाविद्यालय यांनी विद्यार्थ्यांना पर्यंत वेळेत परीक्षा वेळापत्रक पोहोचवून प्रत्येक विद्यापीठाने बदललेल्या परीक्षा पद्धतीनुसार परीक्षांचे नियोजन करून प्रचलित पद्धती, नियम, अधिनियम यांची तपासणी करून त्यांच्या संबंधित प्राधिकरणाची मंजुरी घेऊन परीक्षांचे सुलभ नियोजन करावे. यासाठी विद्यापीठे/महाविद्यालयांनी कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर मदतीसाठी विनंती केली तर अशा संस्थांना स्थानिक प्रशासनाकडून सहकार्य करण्यात येईल. विद्यार्थिहित लक्षात घेऊन एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेऊन विद्यापीठ/महाविद्यालयांनी परीक्षेचे नियोजन करावे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा

सीईटी सेलमार्फतसुद्धा राज्यातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य

सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) १ ते १५ ऑक्टोबर २०२० दरम्यान घेण्याचा प्रयत्न आहे. याचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२०-२१साठी ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी विशेष बाब म्हणून दोन दिवस संधी देण्यात आली होती.

तंत्रशिक्षण

तंत्रशिक्षणामध्ये या वर्षी दोन प्रकारे प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. यामध्ये ई-स्क्रुटिनी आणि प्रत्यक्ष स्क्रूटिनी या पद्धतींचा वापर केला आहे. दहावी आणि बारावीनंतरचे प्रवेश घेणारे जे विद्यार्थी आहेत, त्यांना तो जेथे कुठे असेल तेथून तो संगणकाच्या माध्यमातून त्याचा प्रवेश घेऊ शकतो. यामध्ये तो अर्ज भरू शकतो, त्याचे कागदपत्र अपलोड करू शकतो. ज्यांच्याकडे संगणक नाही अशा विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट फोनवरून अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्यांच्याकडे काहीच सुविधा उपलब्ध नाही अशा विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष स्क्रुटिनीच्या साहाय्याने ३४० तालुक्यांमध्ये सुविधा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. तिथे जाऊन विद्यार्थी आपले अर्ज भरू शकतो. ही सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थिकेंद्रित व्यवस्था निर्माण केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सहज प्रवेश प्रक्रियेला सामोरे जाता आले.

दहावीनंतर तंत्रनिकेतनमध्ये विद्यार्थी तीन वर्षांसाठी प्रवेश घेतात. राज्यात ३७८ तंत्रनिकेतन संस्था आहेत. यामध्ये ४२ शासकीय संस्था आहेत. राज्यामध्ये या वर्षी पहिल्यांदाच ऑनलाइन स्क्रूटिनी उपलब्ध करून दिली आहे. ६७ प्रकारचे पदविका अभ्यासक्रम यामध्ये उपलब्ध आहेत. बारावीनंतर फार्मसी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थी प्रवेश घेतात. राज्यात ४१८ संस्था उपलब्ध आहेत. तसेच हॉटेल मॅनेजमेंटच्या अभ्यासक्रमालाही विद्यार्थी प्रवेश घेतात. १७ ऑगस्ट २०२० पासून तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी आणि फार्मसीमध्ये ऑनलाइन क्लास सुरू झाले आहेत. अभ्यासक्रमाच्या २० टक्के भाग हा पूर्णपणे डिजिटल संसाधनांच्या माध्यमातून शिकवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून विद्यार्थी डिजिटल क्रेडिट मिळवू शकतो. ऑनलाइन क्लासमध्ये ८० ते ८५ टक्के मुले सहभागी होत आहेत.

परदेशात शिक्षणाची संधी

खुल्या प्रवर्गातील ज्यांच्या पालकांचे उत्पन्न २० लाखांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घ्यायचे असेल तर त्यांचे राहण्याचे, येण्या-जाण्याचे तसेच शिकवणी शुल्क शासनातर्फे दिले जाते. मात्र, यासाठी विद्यार्थ्यांना द रँकिंग (टाइम्स हायर एज्युकेशन) किंवा क्यूएस रँकिंग असणाऱ्या विद्यापीठात प्रवेश घ्यावा लागतो. यामध्ये ज्या विद्यापीठांचा २००च्या आत रँक आहे, अशा विद्यापीठात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे आवश्यक आहे. यामध्ये २० विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

उच्च शिक्षणाची हमी

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने २००६-०७ पासून छत्रपती राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. यामध्ये ६०५ व्यावसायिक अभ्यासक्रमांची निवड करण्यात आली आहे. कॅबमार्फत प्रवेश झालेला असेल तर ईबीसी आणि ओबीसी विद्यार्थ्यांना ५० टक्के शुल्क माफ केले जाते. एससी, एसटी प्रवर्गातील विद्यार्थी असेल तर त्याची पूर्ण फीस शिष्यवृत्तीमार्फत परत केली जाते. ही शिष्यवृत्ती डीबीटीमार्फत विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित खात्यावर जमा केली जाते. गेल्या वर्षी १ लाख ७९ हजार ईबीसी विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. यामध्ये पूर्ण शुल्क (फी) ६१८ कोटी रुपये शासनाने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून दिले आहेत.

अभियांत्रिकीविषयी जनजागृती

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तंत्रनिकेतनच्या माध्यमातून शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे प्रत्यक्षात ज्ञान व्हावे आणि अभियंता वास्तवात कसे काम करतो हे पाहण्याची संधी तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत उपलब्ध करून दिली होती. या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रिया, शिष्यवृत्तीच्या योजना आणि अशा पद्धतीची माहिती सहजपणे उपलब्ध करून देण्यात आली. करिअर फेयरच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते. यात २ लाख ८० हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

विद्यार्थ्यांना आंतरवासिताची संधी

तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील सहा विभागातील उद्योजकांना एकत्र केले. त्यांना विद्यार्थ्यांना नोकरी द्यायची असेल तर काय सुधारणा आवश्यक आहेत याची माहिती करून घेतली. आणि गतवर्षी तंत्रनिकेतनच्या ६८ हजार विद्यार्थ्यांनी राज्यातील विविध कंपन्यांमध्ये आंतरवासिता केली आहे. ज्याचा त्यांना खूप फायदा झाला आहे. विद्यार्थ्यांना उद्योजक बनवण्यासाठीसुद्धा वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न चालू आहेत.

राज्यातील सर्व विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता कायम ठेवून नियोजन करण्यात येत आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि आरोग्याच्या दृष्टीने विचार करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी घराबाहेर न जाता घरी बसूनच परीक्षा देता यावी याचे नियोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी कोविड काळातसुद्धा मानसिक खच्चीकरण होऊ न देता आपत्कालीन परिस्थितीत नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आपला अभ्यास चालू ठेवत परीक्षेला सकारात्मकपणे सामोरे जावे.

शब्दांकन : काशीबाई थोरात,
विभागीय संपर्क अधिकारी

आता आपण लॉकडाऊन असा शब्द न वापरता 'मिशन बिगिन अगेन' असे म्हणत हळूहळू अनलॉक करणे सुरू केले आहे. पण असे करत असताना आपण आपली काळजी घेणे आवश्यक आहे. कोविड-१९ साठी आपल्या राज्याने वेळेआधीच खबरदारी घेत उपाययोजना केल्या. त्यामुळे आज राज्यात देशातील सर्वाधिक रुग्ण आढळत असताना आरोग्य यंत्रणा सक्षमपणे तोंड देत आहे. येणाऱ्या काळात आपण दक्ष, सज्ज आणि तत्पर असणे जरूरी आहे.

दक्षता, सज्जता आणि तत्परता

अमित विलासराव देशमुख
मंत्री, वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य

राज्यातील वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने परीक्षांचे वेळापत्रक तयार केले आहे. प्रथम, द्वितीय तसेच तृतीय वर्षात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात येत आहेत. मला असे वाटते की, आज गरज आहे ती वैद्यकीय अभ्यासक्रमाला पूरक ठरतील अशा वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची आणि तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करण्याची. या आपत्तीच्या काळात हे तर प्रकर्षाने जाणवल्याने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांना असे अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतच्या सूचना केल्या होत्या. या वर्षी हे विद्यापीठ असे १४ वेगवेगळे अभ्यासक्रम तयार करत आहे. वैद्यकीय क्षेत्रात चांगले डॉक्टर तयार होण्याबरोबरच कुशल मनुष्यबळ निर्माण करणे ही काळाची गरज असणार आहे.

परीक्षा घेणारे पहिले विद्यापीठ

पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी सध्या कॅम्पस मध्येच असल्यामुळे याबाबत फारशी अडचण येणार नाही. तसेच या विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठीची प्रवेश परीक्षा १५ सप्टेंबर रोजी असल्याने विद्यार्थ्यांच्या परीक्षा ठरल्यानुसार वेळेवर घेतल्या जातील. मात्र, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ऐनवेळी अडचण निर्माण झाल्यास परिस्थिती पाहून याबाबत निर्णय घेण्यात येईल अशा सूचनाही महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाच्या कुलगुरूंना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत पदव्युत्तर वैद्यकीय विद्याशाखा वगळता इतर पदव्युत्तर वैद्यकीय विद्याशाखांची परीक्षा घेण्यात आली. विशेष म्हणजे सीसीटीव्हीच्या माध्यमातून प्रत्येक परीक्षा केंद्रावर विद्यापीठामार्फत नजर ठेवण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणारे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

पदव्युत्तर वैद्यकीय विद्याशाखा वगळता इतर पदव्युत्तर वैद्यकीय विद्याशाखांची (दंत, आयुर्वेदिक, युनानी, होमिओपॅथी, नर्सिंग, फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, ऑडिओलॉजी स्पीच थेरपी) यांची लेखी परीक्षा १७ ते २३ ऑगस्ट २०२० या काळात राज्यातील ११५ केंद्रांवर पार पडली. या परीक्षेत २४२१ विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज आले होते आणि या परीक्षेला विद्यार्थ्यांची सरासरी ९० टक्के उपस्थिती होती. विद्यार्थ्यांची परीक्षा कोविड-१९ परिस्थितीला अनुसरून सुरक्षित वातावरणात घेण्यात आली. या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा २४ ऑगस्ट ते २४ सप्टेंबर या कालावधीत घेण्यात येणार आहे.

पदव्युत्तर वैद्यकीय विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा २५ ते ३१ ऑगस्ट २०२० या कालावधीत, प्रात्यक्षिक परीक्षा २ ते १० सप्टेंबर २०२० या कालावधीत घेण्यात येणार आहेत. या परीक्षेसाठी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर डिप्लोमा व सुपर स्पेशालिटी वैद्यकीय विद्याशाखेचे २२०४ विद्यार्थी बसणार असून ही परीक्षा ३० परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. सर्व वैद्यकीय आरोग्य विज्ञान शाखा यांच्या अंतिम वर्ष पदवीपूर्व व प्रथम वर्ष एमबीबीएस (जुना अभ्यासक्रम) विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षा ८ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२० व प्रात्यक्षिक परीक्षा विद्याशाखानिहाय २० सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२० या कालावधीत घेण्यात येणार आहेत. या परीक्षा २७४ परीक्षा केंद्रांवर होणार असून या परीक्षेसाठी ९६८८ विद्यार्थी बसणार आहेत.

स्वास्थ्यरक्षणाय विज्ञानानुसन्धानाय च समर्पितम्।

MUHS

प्रयोगशाळांची उभारणी

सध्या जगभरात कोविड-१९ विषाणूंमुळे होणाऱ्या आजाराने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. मात्र अशा कठीण परिस्थितीत आरोग्य यंत्रणा या आजाराचे निदान व उपचार करत आहेत. लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर आपल्यासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते या आजाराचे निदान करण्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळांचे. राज्याच्या वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्य विभागाने रुग्णांचे निदान वेळेत होण्यासाठी आणि सर्वांना या सुविधांचा लाभ मिळण्यासाठी विक्रमी वेळेत संपूर्ण राज्यात वैद्यकीय महाविद्यालयात प्रयोगशाळांचे जाळे उभे केले, त्यामुळे रुग्णांवर तत्काळ निदान होऊन उपचार प्रक्रियेला गती मिळाली. राज्यात वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत कोविड-१९ चाचणीसाठी विक्रमी वेळेत खासगी व शासकीय १४० हून अधिक प्रयोगशाळांची उभारणी करण्यात आली आहे. याशिवाय महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. कोविड-१९ निदान झालेल्या रुग्णावर मोफत उपचार सरकारी रुग्णालयात करण्यात येत आहेत.

विद्यावेतनात वाढ

कोविड-१९ संकटाशी सामना करताना डॉक्टर वर्गाने यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मला येथे विशेष उल्लेख करावासा वाटतो तो (निवासी) रेसिडेंट डॉक्टर वर्गाचा. कारण या काळात हेच रेसिडेंट डॉक्टर्स २४ तास काम करीत होते. वैद्यकीय शिक्षणाची पदवी घेतल्यानंतर हे डॉक्टर हॉस्पिटलमध्ये रुजू होतात, याच डॉक्टरांना आपत्कालीन परिस्थितीत कसे संयमाने, शांतपणे काम करावे लागते. नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील वैद्यकीय व दंत महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात दरमहा दहा हजार रुपयांची वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सध्या कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे गेल्या मार्चपासून राज्यातील निवासी डॉक्टर अग्रभागी राहून रुग्णांना तत्परतेने सेवा देत आहेत. प्रसंगी स्वतः कडे दुर्लक्ष करून रुग्णसेवा देणाऱ्या निवासी डॉक्टरांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. निवासी डॉक्टरांच्या मानधनात एवढी घसघशीत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि अतिविशेष उपचार अभ्यासक्रमाचे विद्यार्थी यांच्या विद्यावेतनात १ मे २०२० पासून दरमहा दहा हजार रुपयांची वाढ होणार आहे.

महत्त्वपूर्ण निर्णय

- लातूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे 'विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था लातूर' असे नामकरण.
- देशात प्रथमच प्लाझ्मा थेरपीचा शासकीय महाविद्यालयात सर्वात मोठा प्रयोग. बी.जी. मेडिकल (ससून) रुग्णालयात पहिल्यांदा प्लाझ्मा थेरपीचा वापर.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे देशात सर्वात मोठा प्लाझ्मा थेरपी प्रकल्प कार्यान्वित.
- राज्यात तज्ज्ञ डॉक्टर्सचा टास्क फोर्स, याच धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर तसेच संबंधितांचा समावेश असलेल्या फोर्सची स्थापना करण्यास प्रारंभ.
- कोविड-१९ चाचणीसाठी आतापर्यंत राज्यात विक्रमी वेळेत खासगी व शासकीय १४२ हून प्रयोगशाळांची उभारणी; आयुषची या प्रयोगशाळांना मान्यता.
- राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कोविड -१९ साठी विलगीकरण कक्ष.
- वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची नोंद घेणारी बायोमेट्रिक पद्धत बंद.
- लातूर येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे विभागीय उपकेंद्र. या उपकेंद्रामध्ये आरोग्य सेवेतील तांत्रिक मनुष्यबळासाठी विविध अभ्यासक्रम सुरू करणार.
- धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू. या अभ्यासक्रमांच्या ४६ जागांमध्ये वाढ.
- प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती मिळणार. वैद्यकीय आणि दंत अभ्यासक्रम शिकणाऱ्या ११२ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी मिळणार प्रतिपूर्ती रक्कम.

शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती

वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती मिळणार आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. २०१९-२० या शैक्षणिक वर्षात खुल्या प्रवर्गातील काही विद्यार्थ्यांना शासकीय महाविद्यालयांऐवजी खासगी विनाअनुदानित महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला. अशा ११२ बाधित विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ७ कोटी ४९ लाख ३८ हजार ६०० रुपये प्रतिपूर्ती देण्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ठरले. या संदर्भातील शासन निर्णय २० सप्टेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आला असून कार्योत्तर मान्यता देण्यात आली. एकूण ३३ कोटी ६ लाख २३ हजार ४०० इतकी प्रतिपूर्तीची एकूण रक्कम होणार आहे. याचा लाभ ६ वैद्यकीय/दंत पदव्युत्तर ३ वर्षे कालावधीच्या पदवीसाठी तसेच ४.५ वर्षे कालावधीच्या १०६ पदवी विद्यार्थ्यांना होणार आहे.

शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

शिक्षणाची सर्वांना समान संधी प्राप्त व्हावी, त्यापासून कोणीही वंचित राहू नये, यासाठी शासनातर्फे विविध शिष्यवृत्ती योजना राबवल्या जात आहेत. राज्याच्या शालेय शिक्षण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, इतर मागास बहुजन कल्याण आदी विभागांच्या माध्यमातून अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, इतर मागास वर्ग व सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी विविध योजना व विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. यामुळे तळागाळांतील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणापासून परदेशात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत आहेत.

शिक्षणाच्या सुसंधी

शालेय शिक्षण

खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

शिष्यवृत्ती परीक्षा

राज्यातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्याची योजना राज्य शासन १९५४-५५ या शैक्षणिक वर्षापासून राबवत आहे. २९ जून, २०१५ च्या शासन निर्णयानुसार पूर्व माध्यामिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेचा स्तर इयत्ता चौथीऐवजी इयत्ता पाचवी व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता सातवी ऐवजी इयत्ता आठवी असा करण्यात आला आहे. १५ फेब्रुवारी २०१६च्या शासन निर्णयानुसार या परीक्षेचे नामाभिधान अनुक्रमे 'पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा' व 'पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा' असे करण्यात आले आहे.

इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी या दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षांचे स्वरूप समान आहे. प्रथम भाषा व गणितासाठी अनुक्रमे २५ प्रश्न (५० गुण) व ५० प्रश्नांसाठी (१०० गुण) ९० मिनिटांचा कालावधी असतो तर तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणीसाठी अनुक्रमे २५ प्रश्न (५० गुण) व ५० प्रश्न (१०० गुण) यासाठीही ९० मिनिटांचा कालावधी असतो.

२०१७ पासून इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एक महत्त्वाचा बदल झाला आहे. तो म्हणजे प्रत्येक पेपरमध्ये कमाल २० टक्के प्रश्नांच्या बाबतीत उत्तरांच्या ४ पर्यायांपैकी दोन पर्याय अचूक असतात. ते दोन्ही पर्याय नोंदवणे बंधनकारक असते. इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतून विद्यानिकेतन प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांची निवड केली जाते. महाराष्ट्रात पुसेगाव (जिल्हा सातारा), धुळे, औरंगाबाद, अमरावती व केळापूर (जिल्हा यवतमाळ) या पाच ठिकाणी शासकीय विद्यानिकेतन आहेत. या विद्यानिकेतनमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे राखीव जागा उपलब्ध आहेत. तसेच कमळेवाडी, पो. शिरुर (दबडे), ता. जि. नांदेड या ठिकाणी विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यानिकेतन आहे. वरील सर्व विद्यानिकेतन प्रवेशासाठी आवश्यक अटी-शर्तींची माहिती या परीक्षेच्या अधिसूचनेत सविस्तरपणे नमूद केली जाते.

शिष्यवृत्ती परीक्षा ही मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, सिंधी, तेलुगू व कन्नड अशा आठ मूळ माध्यमांमधून तसेच मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, सिंधी, तेलुगू व कन्नड अशा सात सेमी इंग्रजी माध्यमांमधून घेतली जाते. या परीक्षांची तयारी करणे विद्यार्थ्यांना सोपे व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने 'शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शिका' प्रकाशित केल्या आहेत. या मार्गदर्शिका मराठी, इंग्रजी, उर्दू व हिंदी या चार माध्यमांमध्ये उपलब्ध आहेत.

महाडीबीटी पोर्टलवरील योजना

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयामार्फत विविध गटांतील विद्यार्थ्यांसाठी एकूण चार शिष्यवृत्तीविषयक योजना राबवण्यात येतात. राज्य शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या शासकीय योजनांचा लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण करण्याकरिता महाडीबीटीपोर्टल सुरू करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या योजना अशा..

- **कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती** : नवीन आकृतिबंधानुसार वर्ष ७६-७७ पासून कनिष्ठ महाविद्यालयातील टप्पा अस्तित्वात आल्यापासून या स्तरावरील विद्यार्थ्यांना खुल्या गुणवत्ता शिष्यवृत्त्या देण्यात येतात. माध्यमिक शालान्त परीक्षेत कमीत कमी

६० टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार ही शिष्यवृत्ती देण्यात येते. समाधानकारक प्रगती आणि कनिष्ठ महाविद्यालय पहिल्या वर्षाच्या (इयत्ता ११ वीच्या) अखेरीस घेण्यात येणाऱ्या परीक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्त्या इयत्ता १२ वी मध्ये पुढे चालू राहतात. १५ ऑक्टोबर १९९६ रोजीच्या शासन निर्णयानुसार या शिष्यवृत्तीचे संच ४८०० मंजूर असून या शिष्यवृत्तीचा दर ५० रुपये दरमहा १० महिन्यांसाठी.

- **आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती :** आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील हुशार मुले/मुली जे माध्यमिक शालान्त परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत अशांनी पुढील उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शालेय शिक्षण विभागाच्या १५ ऑक्टोबर १९९६ च्या निर्णयाअन्वये ३२०० शिष्यवृत्त्या मंजूर केल्या आहेत. ही शिष्यवृत्ती फक्त कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरासाठी उपलब्ध आहे. १९९८-९९ पासून शिष्यवृत्तीची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

इयत्ता ११ वी व १२ वीसाठी विज्ञान, वाणिज्य व कला शाखेसाठी अनुक्रमे २०००, ८०० व ४०० संच मजूर आहेत. वसतिगृहात न राहणाऱ्या मुलांसाठी ८० रुपये तर, मुलींसाठी १०० रुपये दरमहा २) वसतिगृहात न राहणाऱ्या मुलांसाठी १४० रुपये व मुलींसाठी १६० रुपये दरमहा दहा महिन्यांसाठी. इयत्ता ११ वीमध्ये ५० टक्के गुण मिळवून पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती १२ वीपर्यंत चालू राहते.

- **पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना :** १९५४-५५ पासून ही योजना सुरू आहे. २९ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता ५ वी आणि ८ वी साठी शिष्यवृत्तीची परीक्षा घेतली जाते. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या या शिष्यवृत्तीच्या स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना मंजूर संचाच्या अधीन राहून या योजनेचा लाभ दिला जातो.

ही शिष्यवृत्ती समाधान प्रगती व चांगल्या वर्तणुकीच्या आधारे पुढे चालू राहते. २२ जुलै २०१० च्या शासन निर्णयानुसार जे व के संचाच्या शिष्यवृत्तीच्या दरात वाढ करण्यात आली असून इयत्ता ५ वी साठी प्रतिमहा १०० रुपयेप्रमाणे दहा महिन्यासाठी १००० रुपये व इयत्ता ८ वी साठी दरमहा १५० रुपयेप्रमाणे दहा महिन्यांसाठी १५०० रुपये देण्यात येत आहे. उर्वरित नऊ संचासाठी शिष्यवृत्तीच्या रकमेत व संचामध्ये बदल करण्यात आला नाही.

राज्यातील विविध विभागांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व भौगोलिकस्तर विचारात घेऊन शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी विविध संवर्गात शिष्यवृत्तीचे संच मंजूर केले आहेत. त्यानुसार पात्र विद्यार्थ्यांना त्या-त्या जिल्ह्यासाठी गुणानुक्रमे संच प्रदान करण्यात येतात. जिल्हानिहाय शिष्यवृत्ती संचाचे निरनिराळे प्रकार असून त्यांच्या अटी व निकष संचसंख्या, दर आदी माहिती शाळांना देण्यात येते. त्यामुळे कोणती शिष्यवृत्ती गुणानुक्रमाने कोणाला मिळू शकते हे स्पष्ट होते. सर्व प्रकारच्या शिष्यवृत्त्या ह्या गुणानुक्रमानुसार दिल्या जातात.

- **संस्कृत शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेच्या अभ्यासाकडे आकर्षित करण्यासाठी विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेच्या गुणवत्ता शिष्यवृत्त्या केंद्र शासनाकडून दिल्या जातात. इयत्ता ८ वी मधील वार्षिक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयात प्राप्त केलेल्या गुणवत्तेवर इयत्ता ९ वी व १० वी आणि १० वीच्या गुणवत्तेवर इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. २० ऑक्टोबर १९९८ च्या शासन निर्णयानुसार संस्कृत शिष्यवृत्तीच्या संचात व दरात सुधारणा करण्यात आली आहे. ती अशी ९ वी, १० वी, ११ वी साठी मंजूर संच प्रत्येकी १०० तर शिष्यवृत्तीचा दर हा दहा महिन्यांसाठी दरमहा अनुक्रमे १०० रुपये, १२५ रुपये, १२५ रुपये १२ वी साठी मंजूरसंच १०० तर बारा महिन्यांसाठी दरमहा १०० रुपये.

– अर्चना शंभरकर,
विभागीय संपर्क अधिकारी

आदिवासी विकास

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी योजना

राज्यातील अनुसूचित जमातीतील गावपाड्यांवर राहणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचावे, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील होता यावे, यासाठी राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाने विविध योजनांची अंमलबजावणी केली आहे. शासकीय तसेच खासगी अनुदानित व विनाअनुदानित आश्रमशाळा, नामवंत शाळांमध्ये प्रवेश आदी विविध माध्यमातून आदिवासी, पारधी समाजातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे काम राज्यात नेटाने सुरू आहे.

राज्य शासनाने विशेष प्रयत्नांचे क्षेत्र म्हणून आदिवासी शिक्षणाचा विचार केला आहे. महाराष्ट्रात आश्रमशाळांनी आदिवासी शिक्षणासाठी फार मोठे कार्य केले आहे. आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाशिवाय भोजन, निवास, पाठ्यपुस्तके, गणवेश इत्यादींच्या स्वरूपात बऱ्याच सुविधा व प्रोत्साहनाची तरतूद करण्यात येते. आदिवासी विकास विभागाच्या वतीने

राबवण्यात येत असलेल्या योजनांची थोडक्यात माहिती..

शासकीय वसतिगृह योजना

अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना त्यांच्या गावाबाहेर राहून उच्च शिक्षण घेणे सुलभ व्हावे याकरिता आदिवासी विभागामार्फत विभागीय स्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर आणि ग्रामीणस्तरावर शासकीय वसतिगृहे कार्यान्वित आहेत. या वसतिगृहांमध्ये इयत्ता आठवीपासून पुढील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येतो. प्रवेशित विद्यार्थ्यास निवास, आहार, आवश्यक शैक्षणिक साहित्य इत्यादी सोयी सुविधा मोफत पुरवण्यात येतात. योजनेंतर्गत अर्जाकरिता http://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधता येईल. सद्य:स्थितीत योजनेंतर्गत ४९५ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून २०१९-२० मध्ये सुमारे ५४,००० विद्यार्थी प्रवेशित होते.

विद्यार्थ्यांना थेट अर्थसाहाय्य

शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वस्तुस्वरूपात मिळणारे लाभ तसेच आहारभत्ता रोख स्वरूपात लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात (डीबीटी) येतो.

स्टेशनरी व निवासी साहित्यासाठी थेट लाभ :- सर्व स्तरावरील शासकीय आदिवासी वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सतरंजी, चादर, बेडशीट, उशी व उशी कव्हर, ब्लँकेट, वह्या व अभ्यासक्रमासाठी आवश्यक इतर शैक्षणिक साहित्य, क्रमिक पुस्तके /संदर्भ पुस्तके, छत्री या बाबी वस्तू स्वरूपात देण्याऐवजी त्याकरिता विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक संलग्नित बँक खात्यामध्ये रोख रक्कम थेट जमा करण्यात येते. या वस्तूंकरिता इयत्तानिहाय/ अभ्यासक्रमनिहाय पुढीलप्रमाणे रक्कम देण्यात येते :- आठवी ते दहावी ३२०० रुपये, ११ वी, १२ वी व पदविका अभ्यासक्रम- ४,००० रुपये, पदवी अभ्यासक्रम (जसे कला/वाणिज्य/ विज्ञान/कायदा/कृषी इ.) - ४५०० रुपये, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रम - ६००० रुपये.

निर्वाहभत्ता :- शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या प्रकारानुसार पुढीलप्रमाणे निर्वाहभत्ता दिला जातो. विभागीय स्तर - ८०० रुपये, जिल्हा स्तर - ६०० रुपये, तालुका/ग्रामीण स्तर - ५०० रुपये.

भोजनभत्ता :- महानगरपालिका, विभागीय व जिल्हास्तरावरील शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना आहाराकरिता आवश्यक रक्कम आधार क्रमांक संलग्नित बँक खात्यामध्ये थेट जमा करण्याबाबत ५ एप्रिल २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. योजनेंतर्गत १२० वसतिगृहांतील सुमारे २१,००० विद्यार्थ्यांना थेट लाभ देण्यात येतो.

वसतिगृहनिहाय आहाराकरिता वसतिगृहाच्या दर्जानुसार रक्कम निश्चित करण्यात आली आहे. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका, विभागीय शहरातील वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना ३,५०० रुपये तर जिल्हास्तरावरील सर्व वसतिगृहांसाठी ३,००० रुपये भोजनभत्ता दिला जातो. यासाठी २०१९-२० मध्ये ४०१.०८ कोटी रुपयांची तरतूद होती. २०२०-२१ साठी ५२१.६१ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती

इयत्ता १० वी पासून पुढे उच्च शिक्षणाचा लाभ गरजू विद्यार्थ्यांना घेता यावा या उद्देशाने केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडील वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मासिक देय दराने निर्वाहभत्ता आणि शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क यासाठी रक्कम देण्यात येते.

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेण्यासाठी आदिवासी विभागाकडून मंजूर केली जाणारी पोस्ट मॅट्रिकोत्तर स्कॉलरशिप, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कचा लाभ ऑनलाईन प्रणालीद्वारे देण्यासाठी https://mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ (आज्ञावली) कार्यान्वित करण्यात आले आहे.

१२ वी ला राज्यशास्त्र विषयात राज्यात प्रथम येणारी आदिवासी विद्यार्थिनी ऋतुजा लांडे.

लाभार्थ्यांसाठीची अर्हता : ● विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. ● विद्यार्थ्याने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.
● विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा कमी असावे.
● विद्यार्थी इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेणारा नसावा. ● दूरस्थ शिक्षण पद्धतीतील अभ्यासक्रमांना लागू.

पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना

२०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून विभागाच्या कार्यान्वित शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या एकूण २०,००० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत महानगरपालिका, विभागीय शहरे आणि जिल्हास्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निवासभत्ता, आहारभत्ता, निर्वाहभत्ता तसेच शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्याकरिता निर्धारित केलेले अर्थसाहाय्य देण्यात येते.

या योजनेसाठी आवश्यक अटी व शर्थी

- विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. विद्यार्थ्याने अर्जासोबत जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षीक उत्पन्न मर्यादा लागू राहील.
- विद्यार्थी हा १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.
- विद्यार्थ्यास आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसावा.
- विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.
- आदिम जमातीच्या व अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ प्राथम्याने देय राहील.

२०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून तालुकास्तरावरील इयत्ता १२ वी नंतरच्या मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेंतर्गत लाभ देण्यास सुरुवात झाली आहे.

१६ सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयाद्वारे या योजनेत सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दहावी नंतरच्या दोन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी, महानगरपालिका, नगरपालिका हद्दीमध्ये आणि महानगरपालिका, नगरपालिका हद्दीपासून पाच कि.मी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात, शिक्षणसंस्थेत शिकत असलेले विद्यार्थी या योजनेंतर्गत लाभास पात्र राहतील.

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी निर्वाहभत्ता

वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र इ. व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत देण्यात येणारी निर्वाहभत्ता रक्कम अपुरी पडत असल्याने पुस्तके, निवास, भोजन, स्टेशनरी इ. खर्चासाठी वसतिगृहात व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीच्या निर्वाह भत्त्याव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम या योजनेद्वारे दिली जाते.

लाभार्थ्यांसाठीची अर्हता : ● विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमात प्रवेशित असावा. ● विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असावा. ● भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्न मर्यादा लागू आहे, तीच मर्यादा या योजनेस लागू राहील. (२.५० लाख रुपयांपेक्षा कमी) ● स्थानिक विद्यार्थी किंवा स्वत:च्या घरी राहणाऱ्या विद्यार्थ्यांस ही योजना लागू नाही. ● महाविद्यालयाच्या वसतिगृहात किंवा आदिवासी विभागाच्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होत नसल्यास तसे प्रमाणपत्र संबंधित वसतिगृह अधीक्षकांकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

अनेक अडचणींवर मात करत डॉक्टर बनून आदिवासी मुलींसमोर आदर्श ठरलेल्या पालघरमधील आदिवासी कन्या डॉ. सुचिता पाडवी.

योजनेंतर्गत देय रक्कम

इयत्ता १२ वीनंतरचे उच्च शिक्षण घेण्याकरिता मोठी शहरे, विभागीय मुख्यालये व जिल्हास्तर अशी वर्गवारी केली आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर या शहरांसाठी भोजनभत्ता ३२,०००, निवासभत्ता २०,००० तर निर्वाहभत्ता ८,००० रुपये. इतर महसूल विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी भोजनभत्ता २८,०००, निवासभत्ता १५,०००, निर्वाहभत्ता ८,००० रुपये. इतर जिल्ह्यांच्या ठिकाणांसाठी भोजनभत्ता २५,०००, निवासभत्ता १२,०००, निर्वाहभत्ता ६,००० रुपये. तालुक्याच्या ठिकाणांसाठी भोजनभत्ता २३,०००, निवासभत्ता १०,०००, निर्वाहभत्ता ५,००० रुपये अनुज्ञेय राहील.

तसेच वरील रकमेव्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष ५,००० रुपये व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी २,००० रुपये इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरूपात देण्यात येते. या योजनेसाठी २०२०-२१ वर्षासाठी ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत अर्जाकरिता संकेतस्थळ :- http://swayam.mahaonline.gov.in

शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना

राज्यातील शासनमान्यता प्राप्त खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती योजना - (फ्रीशीप) २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आली. या योजनेस उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून दरवर्षी नव्याने मंजुरी देण्यात येते होती. तथापि, २०१५-१६ पासून ही योजना कायमस्वरूपी योजना म्हणून राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरून आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत योजनेंतर्गत संबंधित वर्षात शिक्षण शुल्क समिती/प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येते. या योजनेसाठी २०१९-२० साठी २५ कोटी तर (सुधारीत अंदाज) २०२०-२१ साठी २७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

अमेरिकेतील मिशिगन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीमध्ये पीएच.डी.साठी निवड झालेली गडचिरोलीच्या दुर्गम भागातील आश्रमशाळेतील विद्यार्थिनी योगिता वरखडे.

लाभार्थ्यांसाठीची अर्हता :

- या योजनेसाठी उत्पन्न मर्यादेची अट नाही.
- अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरिता शासनाच्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू राहील.
- आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाकरिता सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा प्रवेश घेतलेले, खासगी विनाअनुदानित महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा आणि इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांकरीता (उदा. नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील.
- आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील.
- एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन एटीकेटीद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.
- ज्या अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया लागू आहे त्यांना त्या प्रक्रियेद्वारा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू.
- कृषी व संलग्न अभ्यासक्रमांसाठी सीईटी घेत नसल्यास इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू.
- व्यवस्थापन कोट्यातील विद्यार्थी तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेशित विद्यार्थी यांना अनुज्ञेय नाही.

परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

परदेशात उच्च शिक्षण घेण्याची संधी लाभलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे सोपे व्हावे याकरिता ३१.०५.२००५ रोजीच्या शासन निर्णयानुसार परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. १६ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेंतर्गत निकषांमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्या अशा :-

- प्रस्तुत योजनेंतर्गत दरवर्षी कमाल १० आदिवासी विद्यार्थ्यांची निवड करण्याची तरतूद आहे.
- व्यवस्थापन, वैद्यकीय, अभियांत्रिकी, विज्ञान, कृषी आदी शाखांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता शिष्यवृत्ती देण्यात येते.
- पालकाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा सहा लाख रुपये.
- विद्यार्थी हा पूर्णवेळ नोकरी करीत नसावा.
- कुटुंबातील फक्त एकाच अपत्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.
- विद्यार्थ्याने परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा.
- अभ्यासक्रमाचे शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क व विद्यापीठाने निर्धारित केलेली इतर शुल्क शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात येतात.
- आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यामार्फत दरवर्षी मे महिन्यात वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इच्छुकांकडून प्रस्ताव मागवण्यात येतात.

या शिष्यवृत्तीसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी सचिव (आदिवासी विकास) यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत आयुक्त, आदिवासी विकास, आयुक्तालय, नाशिक, अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व संचालक वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई हे सदस्य आहेत. शिष्यवृत्ती लाभ मिळण्यासाठी प्राप्त अर्जाची राज्यस्तरीय छाननी समितीद्वारा पडताळणी होऊन निवड केली जाते व आयुक्तालय स्तरावर शिष्यवृत्ती लाभ मंजूर केला जातो. २०१९-२० या वर्षासाठी चार कोटी रुपये तर २०२०-२१ वर्षासाठी चार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व वाहतूकभत्ता देण्याची ही योजना आदिवासी विकास विभागाच्या १४ ऑगस्ट २००३ च्या शासन निर्णयानुसार २००३-०४ पासून राबवण्यात येत आहे.

मुंढेगाव येथील आश्रमशाळा

अनूसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यास दरमहा ५०० रुपयेप्रमाणे १० महिन्यांकरिता रुपये ५०००/- रुपये इतकी शिष्यवृत्ती व दरमहा १०० रुपयेप्रमाणे १० महिन्यांकरिता एक हजार रुपये इतका वाहतूकभत्ता या योजनेंतर्गत दिला जातो.

लाभार्थ्यांसाठीची अर्हता :- ● इयत्ता ८ वी ते १२ वीमध्ये मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणारा व शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेला अनुसूचित जमातीचा विद्यार्थी. ● विद्यार्थ्याचे अपंगत्व किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. त्याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. ● विद्यार्थ्यांची हजेरी ७० टक्क्यांपेक्षा कमी असणार नाही.

आश्रमशाळेत इंग्रजी माध्यम

जागतिकीकरणाच्या आजच्या वातावरणात इंग्रजीचे महत्त्व वाढत असून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी माध्यमांकडे फार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आदिवासी विभागाच्या अधीनस्थ ११ शासकीय इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळा सुरू आहेत. त्या धर्तीवर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अधिक चांगली होण्याच्या दृष्टीने २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून आयएसओ नामांकन मिळालेल्या शासकीय आश्रमशाळांच्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाची इयत्ता पहिलीची सीबीएसई अभ्यासक्रमांतर्गत अतिरिक्त तुकडी सुरू करण्यात येऊन टप्प्याटप्प्याने इयत्ता १० वीपर्यंत वर्गवाढीने वर्ग सुरू करण्यात येणार आहे.

योजनेची अंमलबजावणी

- २०१९-२० पासून इयत्ता पहिली सुरू करण्याकरिता पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे.
- त्या पुढील वर्षी टप्प्याटप्प्याने नैसर्गिक वाढीने इयत्ता १० वीपर्यंत (२०२९-३०) वर्ग सुरू करणे.
- आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत नियोजित शाळेच्या परिसरातील इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेण्यास इच्छुक पालकांकडून अर्ज मागवून निकषानुसार प्राधान्याने विद्यार्थी निवड करणे.
- या योजनेंतर्गत प्रतिविद्यार्थी गणवेश व कपडे, निवासी खर्च, विद्यार्थी प्रवास खर्च व शैक्षणिक साहित्यासाठी ७५०० रुपये तर भोजन खर्च (अंदाजित) साठी २५०० रुपये असे एकूण १०,००० रुपये अनुदान अनुज्ञेय आहे.

योजनेच्या अटी व शर्ती

- प्रवेश घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
- विद्यार्थ्याच्या पालकाने प्रवेशाचे वेळी सक्षम अधिकाऱ्याने दिलेला अनुसूचित जमातीचा दाखला सादर करावा.
- प्रतिवर्षी योजनेचा आढावा प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत घेण्यात येईल. विद्यार्थ्यांना मिळत असलेले शिक्षण, सुविधा त्यांची होत असलेली प्रगती, त्यांना येणाऱ्या अडचणी इ. बाबत प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत उचित कार्यवाही करण्यात येईल.
- योजनेचा लाभ देताना दारिद्र्य रेषेखालील अल्पभूधारक पालकांच्या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा एक लाख रुपये राहील.

विविध योजनांचा तपशील

महाडीबीटी पोर्टल अंतर्गत आदिवासी विकास विभागांतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने खालील योजनांच्या वित्तीय लाभाची रक्कम ही पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी डीबीटी

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी खालील विविध वस्तू खरेदी करून उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. परंतु यापैकी अनेक वस्तू प्रत्येक वर्षी उपलब्ध करून देण्यात येत नव्हत्या. तसेच देण्यात येणाऱ्या वस्तूही तक्रारी व न्यायालयीन प्रकरणांमुळे वेळेत उपलब्ध होत नव्हत्या, त्यामुळे २०१७-१८ या वर्षापासून या वस्तूंसाठी थेट निधी (डीबीटी) देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निधी पुढील वस्तू खरेदीसाठी दिला जातो (१) छत्री, (२) नाईट ड्रेस (३) वूलन स्वेटर (४) सॅन्डल (५) व्हाईट कॅनव्हास शूज (६) व्हाईट सॉक्स (दोन जोड) (७) आंघोळीचा साबण (८) कपडे धुण्याचा साबण (९) खोबरेल तेल (१०) टुथपेस्ट (११) टुथ ब्रश (१२) कंगवा (१३) नेल कटर (१४) मुलींसाठी निळ्या रंगाचे रीबन (दोन जोड) (१५) टॉवेल (१६) अंडर गारमेंट (१७) स्लिपर, (१८) शालेय साहित्य व लेखन सामग्री (१९) गणवेश (२०) पी.टी.ड्रेस (२१) सतरंजी (२२) चादर (२३) वुलन ब्लॅकेट (२४) बेडशीट (२५) उशी (२६) उशी कवर.

थेट निधी देय रक्कम ही इयत्ता १ ली ते ४ थी साठी ७५०० रुपये, इयत्ता ५ वी ते ९ वी साठी ८५०० रुपये तर इयत्ता १०वी ते १२ वी साठी ९५०० रुपये एवढी आहे. ६० टक्के रक्कम शाळा सूरू होण्यापूर्वी वितरित करण्यात येते. विद्यार्थ्यांनी वस्तू आणल्याची खात्री करून उर्वरित ४० टक्के रक्कम खात्यावर वितरित करण्यात येते.

● **केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना :-** या केंद्र पुरस्कृत योजनेत केंद्र शासनाचा हिस्सा ७५ टक्के तर राज्य शासनाचा हिस्सा २५ टक्के असतो. इयत्ता १० वी नंतरच्या मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क, निर्वाहभत्ता इत्यादी देण्यात येते.

● **शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती :-** शासनमान्यता प्राप्त खासगी विनाअनुदानित तसेच कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अभ्यासक्रमासाठी शिक्षणशुल्क व परीक्षाशुल्क रक्कम देण्यात येते.

● **व्यावसायिक अभ्यासक्रम संलग्नित निर्वाह भत्ता योजना :-** व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्यात येतो.

● **शिक्षणशुल्क व परीक्षाशुल्क प्रदाने -:** शासकीय तसेच खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये इयत्ता १० वीनंतरच्या मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता इत्यादी देण्यात येते. महाडीबीटी पोर्टलवर अनुसूचित जमातीचा विद्यार्थी प्रथम ऑनलाइन अर्ज करतो व त्या अर्जाची एक प्रत त्याच्या शैक्षणिक संस्थेकडे सादर करतो. त्यानंतर शैक्षणिक संस्था त्यांची कागदपत्रे तपासून ऑनलाइनद्वारे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तांकडे सादर करतात. आयुक्त कार्यालय त्यास मंजुरी देऊन आयुक्तस्तरावरून ही रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होते. निर्वाहभत्ता, परीक्षाशुल्क याची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट जमा होते. तसेच शिक्षण शुल्क व इतर शुल्क याची रक्कम संबंधित महाविद्यालयाच्या खात्यावर थेट जमा होते.

इतर शिक्षणविषयक योजना

आश्रमशाळा समूह योजना

राज्यात एकूण ४९९ शासकीय आश्रमशाळा व ५३९ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. शासकीय आश्रमशाळांचा संपूर्ण खर्च शासनामार्फत करण्यात येतो. अनुदानित आश्रमशाळांना परिरक्षण अनुदान १५०० रुपये प्रति विद्यार्थीप्रमाणे दिले जाते व वेतनेतर अनुदान ८ टक्के प्राथमिक विभाग व १२ टक्के माध्यमिक विभागाला दिले जाते. विद्यार्थ्यांना डीबीटीद्वारे थेट आधार संलग्न बँक खात्यात पैसे जमा केले जातात.

वसतिगृह योजना

राज्यात एकूण ४९१ शासकीय वसतिगृहे असून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरात राहण्याची सोय व्हावी म्हणून तालुकास्तरीय विद्यार्थ्यांना इयत्ता आठवीपासून प्रवेश आणि जिल्हास्तर व विभागस्तरावर ११ वीपर्यंतच्या उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था वसतिगृहात करण्यात येते. या विद्यार्थ्यांना भोजन डीबीटी व स्टेशनरी डीबीटी वेगवेगळ्या स्वरूपात देण्यात येते.

एकलव्य रेसिडेंन्शिअल इंग्लिश स्कूल

राज्यात एकूण २४ एकलव्य रेसिडेंन्शिअल इंग्लिश स्कूल असून त्यात इयत्ता पहिली ते १२ पर्यंत एकूण ५००५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

प्रथमोपचार प्रशिक्षण

विद्यार्थ्यांना प्रथमोपचार सुविधा तातडीने मिळणेसाठी डिजी हेल्थ प्रणाली प्रकल्पांतर्गत असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित आश्रमशाळा व एकलव्य निवासी आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांना प्रथमोपचाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येईल. नाशिक, डहाणू, जव्हार, शहापूर, घोडेगाव, पेण, सोलापूर, अकोला, औरंगाबाद, पुसद, भंडारा, देवरी, चंद्रपूर व चिमूर या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतील एकूण २१४ शासकीय आश्रमशाळा, २२५ अनुदानित आश्रमशाळा व ६ एकलव्य निवासी शाळेतील दोन शिक्षक (१ प्राथमिक व १ माध्यमिक), स्त्री व पुरुष अधीक्षक यांना हे प्रशिक्षण देण्यात येईल.

शिक्षकांसाठी प्रशिक्षण

आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील इ. पहिली ते १२ वीपर्यंतच्या अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण हे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे येथे घेण्यात येत होते. परंतु चालू शैक्षणिक वर्षात कोविड-१९ च्या महामारी प्रादुर्भावामुळे संस्थेमार्फत सध्या शिक्षकांना प्रशिक्षण हे ऑनलाइन पद्धतीने देण्यात येत आहे.

– नंदकुमार वाघमारे,
विभागीय संपर्क अधिकारी

अल्पसंख्याक

योजना उत्कर्षाच्या

अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी राज्य शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, शीख, पारसी आणि ज्यू समुदायांचा अल्पसंख्याकांमध्ये समावेश होतो. या समाजाच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. शिक्षण, प्रशिक्षण, शिष्यवृत्ती, कौशल्य विकास, शैक्षणिक कर्ज, वसतिगृहे अशा विविध योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. अल्पसंख्याक समाजातील मुलामुलींना या शैक्षणिक योजनांचा लाभ घेऊन उज्ज्वल भविष्याच्या दिशेने वाटचाल करण्याची संधी यामुळे उपलब्ध झाली आहे.

उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

उच्च व्यावसायिक तसेच बारावीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनामार्फत शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. या योजनेच्या लाभासाठी अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ६ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. या योजनेंतर्गत ३० टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखीव आहे.

या योजनेंतर्गत तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी प्रतिवर्ष २५ हजार रुपये किंवा प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. योजनेचा अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक व जाहिरात दरवर्षी तंत्रशिक्षण संचालक व वैद्यकीय शिक्षण संचालक यांच्यामार्फत प्रसिद्ध करण्यात येते. वेळापत्रकानुसार या संचालनालयांच्या संकेतस्थळांवर ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा. गुणवत्ताधारक पात्र विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम ईसीएस किंवा एनईएफटीद्वारे त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते.

इयत्ता बारावीनंतरच्या इतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञानशाखेत पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम) अल्पसंख्याक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा ५ हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधावा. उच्चशिक्षण संचालक व तंत्रशिक्षण संचालक यांच्यामार्फत या योजनेचे संनियंत्रण करण्यात येते.

प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना

प्री-मॅट्रिक (मॅट्रिकपूर्व) शिष्यवृत्ती योजना ही अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकारद्वारे पुरस्कृत योजना आहे. ही योजना राज्यात शालेय शिक्षण विभागांतर्गत संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालयामार्फत राबवण्यात येते. या योजनेंतर्गत शासकीय वा खासगी शाळेत पहिली ते दहावीमध्ये शिकत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेंतर्गत पात्र ठरण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक असून मागील वर्षात विद्यार्थ्यांने ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे. या शिष्यवृत्तीसाठी http://www.minorityaffairs.gov.in/hi या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती

पोस्ट मॅट्रिक (मॅट्रिकोत्तर) शिष्यवृत्ती योजना अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकारव्दारे पुरस्कृत असून राज्यामध्ये ती उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत संचालक, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबवण्यात येते. या योजनेंतर्गत इयत्ता अकरावी, बारावी किंवा समकक्ष अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेंतर्गत पात्र ठरण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक असून विद्यार्थ्यांने मागील वर्षात ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे. या शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी तसेच या शिष्यवृत्तीकरिता ऑनलाइन अर्ज करण्यासाठी http://www.minorityaffairs.gov.in/hi आणि https://scholarships.gov.in/ या संकेतस्थळांना भेट द्यावी.

मुलींसाठी वसतिगृहे

मुलगी शिकली म्हणजे संपूर्ण समाज पुढे जातो. मुलींचा शिक्षणाकडे असलेला ओढा पाहून शासनानेही त्यांना प्रोत्साहन देण्याचे ठरवले आहे. अल्पसंख्याक समाजातील शिक्षणातील मागासलेपण दूर करण्यासाठी या समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव), शासकीय अध्यापक महाविद्यालय (पनवेल), राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर), शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था (अमरावती), शासकीय विज्ञान संस्था (औरंगाबाद), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

(औरंगाबाद), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड), डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (अकोला), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (जळगाव), शासकीय तंत्रनिकेतन (सोलापूर, हिंगोली, यवतमाळ आणि वाशिम), परभणी जिल्ह्यातील परभणी, पूर्णा, गंगाखेड, सेलू, पाथरी, आणि जिंतूर तसेच चंद्रपूर (जि. चंद्रपूर) आणि वसमत (जि. हिंगोली) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), गांधी हायस्कूल (भंडारा), घनसावंगी (जि. जालना) या २३ ठिकाणी अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. या वसतिगृहांमध्ये १ हजार ९१० इतक्या मुलींची प्रवेशक्षमता आहे. याशिवाय राज्यातील इतरही काही भागात वसतिगृहांची बांधकामे सुरू असून काही ठिकाणच्या वसतिगृहांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत.

या वसतिगृहांच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजातील मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रेरित करणे तसेच त्यांना शहरांमध्ये शिक्षणासाठी निवासाची सुविधा उपलब्ध करून देणे हा शासनाचा उद्देश असून त्याला मुलींचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यंदा शैक्षणिक संस्था सुरू झाल्यानंतर राज्याच्या त्या त्या भागात शिक्षण घेणाऱ्या मुलींना या वसतिगृह सुविधांचा लाभ घेता येईल.

शैक्षणिक कर्ज योजना

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुलभ व्हावे यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून शैक्षणिक कर्ज योजना राबवली जात आहे. उच्च व्यावसायिक शिक्षणासाठी यातून कर्ज दिले जाते. महामंडळामार्फत अल्पसंख्याक समाजातील बेरोजगारांसाठी व्यवसाय कर्जही दिले जाते. बेरोजगार तरुण या योजनेचा लाभ घेऊन आपला व्यवसाय, उद्योग सुरू करू शकतात. अधिक माहितीसाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, दुसरा मजला, जुने कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई येथे तसेच जिल्हास्तरावर असलेल्या महामंडळाच्या कार्यालयात संपर्क साधावा. शिवाय अल्पसंख्याक विकास विभागाच्या https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अधिक माहिती मिळेल.

स्पर्धापरीक्षा प्रशिक्षण

राज्य शासनामार्फत अल्पसंख्याक समुदायाच्या शैक्षणिक विकासासाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. युपीएससीच्या विविध परीक्षांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थी, विद्यार्थिनी उत्तीर्ण व्हाव्यात यासाठी 'स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना' राबवली जाते. राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या मुंबई, कोल्हापूर, नागपूर आणि औरंगाबाद येथील केंद्रे तसेच पुण्यातील 'यशदा'मधील केंद्रामध्ये निवडक होतकरू अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना या योजनेतून प्रशिक्षण दिले जाते. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊन केंद्रीय प्रशासकीय सेवांमध्ये दाखल होऊ शकतात.

अभियंता होण्याची संधी

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता राज्यातील १५ शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये (पॉलिटेक्निक) दुसऱ्या पाळीतील वर्ग चालवले जातात. या योजनेतून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना अभियंता बनण्याची संधी उपलब्ध झाली असून यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली. या वर्गांमध्ये यंदा १ हजार ९२० इतक्या जागा उपलब्ध असून मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर, आयटी, प्रिंटिंग टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन आदी अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाणार आहे. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी या योजनेतून पदविका पूर्ण केली आहे. यंदाच्या वर्षीही ही योजना प्रभावीपणे राबवून प्रवेशित विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले जाईल.

ठाणे, सोलापूर, नांदेड, जळगाव, यवतमाळ, वांद्रे (जि. मुंबई उपनगर), रत्नागिरी, कराड (जि. सातारा), ब्रम्हपुरी (जि. चंद्रपूर), जालना, अंबड (जि. जालना), पुणे, हिंगोली, लातूर येथील शासकीय तंत्रनिकेतने आणि मुंबईतील शासकीय मुद्रण तंत्र संस्था (सीएसएमटी समोर) येथे दुसऱ्या पाळीतील वर्ग चालविले जातात. एकूण प्रवेश क्षमतेच्या ७० टक्के जागा अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी तर ३० टक्के जागा सर्वसाधारण आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी दिल्या जातात, जेणेकरून विविध समाजातील विद्यार्थी एकत्र शिकून त्यांच्यामध्ये एकीची भावना वृद्धिंगत होईल.

८४ आयटीआयमध्ये वर्ग

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना देण्याच्या अनुषंगाने यंदा राज्यातील ४४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये

पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण

राज्यात चालू वर्षाखेरपर्यंत साधारण साडेबारा हजार पोलिसांची भरती करण्याचे गृह विभागामार्फत प्रस्तावित आहे. या भरतीमध्ये अल्पसंख्याक समाजातील अधिकाधिक उमेदवारांना संधी मिळण्याच्या अनुषंगाने त्यांची तयारी करून घेण्यात येणार आहे. यासाठी पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सामान्य ज्ञान, शारीरिक चाचण्या आदी आनुषंगिक प्रशिक्षण देण्यात येईल. कोरोनाची परिस्थिती पाहून राज्य शासनाच्या या संदर्भातील नियमानुसार प्रत्यक्ष प्रशिक्षण नंतर सुरू करण्यात येईल. सध्या वर्धा, गडचिरोली, अमरावती, नांदेड, जालना, पुणे, यवतमाळ, परभणी, सोलापूर, औरंगाबाद, बुलडाणा, नाशिक, बीड आणि अकोला या १४ जिल्ह्यांमध्ये इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत.

इच्छुक उमेदवारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे किंवा त्या जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण देण्यासाठी निवडलेल्या स्वयंसेवी संस्थेकडे अर्ज करावयाचा आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येत असून त्यानंतर या जिल्ह्यांमध्येही पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येतील.

प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास ट्रॅकसूट आणि बूट खरेदीसाठी १ हजार रुपये, पुस्तकांच्या खरेदीसाठी ३०० रुपये, प्रतिमहिना १ हजार ५०० रुपये याप्रमाणे दोन महिन्यांसाठी ३ हजार रुपये विद्यावेतन आणि प्रशिक्षण कालावधीत दररोज नाष्टा देण्यात येणार आहे. प्रशिक्षण दोन महिन्याचे असेल. प्रत्येक जिल्ह्यात कमाल १०० विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणाकरिता प्रत्येक जिल्ह्यास साधारण ५ लाख ६० हजार रुपये खर्च असून यासाठी तरतूद करण्यात आली आहे. जिल्ह्यातून किमान ३० विद्यार्थी आले तरी त्यांचे प्रशिक्षण घेणे संबंधित स्वयंसेवी संस्थेवर बंधनकारक करण्यात आले आहे.

(आयटीआय) दुसऱ्या आणि तिसऱ्या पाळीतील वर्ग चालवले जाणार आहेत. याबरोबरच ४० खासगी आयटीआयमध्ये स्वतंत्र तुकड्या चालवण्यात येणार आहेत. या माध्यमातून ८४ आयटीआयमध्ये एकूण ८ हजार ३४८ जागांवर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी नुकतीच प्रक्रिया राबवण्यात आली. प्रवेशित विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण दिले जाईल., शिवाय प्रशिक्षणानंतर त्यांना नोकरी मिळवून देण्यासाठीही प्रयत्न करण्यात येतील.

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

मदरशांमधील विद्यार्थ्यांना क्रमिक अभ्यासक्रमातील गणित, विज्ञान, समाजशास्त्र, भाषा इत्यादी विषयांचे शिक्षण देण्यासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबवण्यात येत आहे. धार्मिक शिक्षण घेणाऱ्या मुलांना क्रमिक अभ्यासक्रम शिकण्यास व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास या योजनेतून प्रोत्साहन देण्यात येते. मदरशांमध्ये पायाभूत सुविधा, ग्रंथालय यासाठी अनुदान तसेच क्रमिक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकास मानधन देण्यात येते. मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या मदरशांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. राज्यातील १२१ मदरशांमधील शिक्षकांच्या वेतनासाठी १ कोटी ८० लाख रुपयांचा निधी नुकताच वितरित करण्यात आला. योजनेच्या लाभासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

अल्पसंख्याकबहुल शाळांना अनुदान

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शासनमान्य खासगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा पुरवण्यासाठी अनुदान योजना राबवली जाते. पात्र शाळांना २ लाख रुपये इतके अनुदान मिळते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेच्या तसेच महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाच्या विविध योजनांच्या माहितीसाठी https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना

आर्थिक कारणास्त व शिक्षण पूर्ण करू शकत नाही अशा अल्पसंख्याक विद्यार्थिनींसाठी मौलाना आझाद राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येते. शाळा-महाविद्यालयाचे शुल्क, अभ्यास क्रमाची पुस्तके, लेखनसामग्री, उपकरणे आदींची खरेदी, निवास व भोजनव्यवस्थेचा खर्च आदींकरिता ही शिष्यवृत्ती देय आहे. केंद्र शासनाच्या मौलाना आझाद शिक्षण प्रतिष्ठानमार्फतही योजना राबवली जाते. अधिक माहिती www.maef.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

– इर्शाद बागवान,
विभागीय संपर्क अधिकारी

इतर मागास बहुजन कल्याण

इतर मागास, विजाभज व विमाप्र प्रवर्गासाठी शिष्यवृत्ती

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

इयत्ता पाचवी ते सातवी : या इयत्तेमधील इमाव, विजाभज/विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थिनींसाठी ही योजना राबवली जाते. इतर मागासवर्ग, विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थिनींना ही योजना लागू करण्यात आली आहे. या प्रवर्गाच्या विद्यार्थिनींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान म्हणून ही शिष्यवृत्ती दिली जाते.

योजनेच्या प्रमुख अटी : विद्यार्थिनी इयत्ता पाचवी ते सातवीमध्ये शासनमान्य शाळेत शिकत असावी. **लाभाचे स्वरूप** : प्रतिविद्यार्थिनीस दरमहा ६० रुपये याप्रमाणे १० महिन्यांकरिता ६०० रुपये दिले जातात.

अर्ज करण्याची पद्धत : संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर जाऊन पात्र विद्यार्थिनींचे अर्ज /माहिती भरून संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावी.

संपर्क : जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, संबंधित शाळांचे मुख्याध्यापक.

इयत्ता ८ वी ते १० वी : या इयत्तेतील इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थिनींसाठीदेखील ही योजना लागू आहे.

प्रमुख अटी : विद्यार्थिनी ही इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावी. तिने शासनमान्य माध्यमिक शाळेत प्रवेश घेतलेला असावा. इ. ८ वी ते १० वी पर्यंत वर्गात नियमित शिकत असावी. उत्पन्नाची अट नाही .

लाभाचे स्वरूप : दरमहा १००/- रुपये याप्रमाणे १० महिन्यांसाठी १०००/- रुपये एवढी शिष्यवृत्ती देण्यात येते.

अर्ज करण्याची पद्धत : संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी https://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर जाऊन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरून संबंधित साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे सादर करावेत.

संपर्क : साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.

इमाव : गुणवंतांना पुरस्कार

राज्यातून व विभागातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या इतर मागासवर्ग प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनींना स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार योजना.

योजनेचे स्वरूप

- इतर मागास प्रवर्गातील इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत राज्यातून प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना एक लाख रुपये रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.
- इतर मागास प्रवर्गातील दहावी व बारावीच्या परीक्षेत विभाग स्तरावरून प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना ५१ हजार रुपये रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.

परदेशात शिक्षणाची संधी

महाराष्ट्र राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. ज्या गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी टाइम्स हायर एज्युकेशन (टीएचई) किंवा क्युएस रँकिंग २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

प्रमुख अटी :

- विद्यार्थ्याचे पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत. ● परदेशातील विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा. ● पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्याची कमाल वयोमर्यादा ४० वर्षे.

अर्ज करण्याची पद्धत : या शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक वर्षी एप्रिल किंवा मे महिन्यात संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांनी प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत वृत्तपत्रात तसेच शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध केली जाते.

संपर्क : संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.

विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

इयत्ता पहिली ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (डीएनटी) विद्यार्थ्यांना भारत सरकारची डॉ. आंबेडकर मॅट्रिकपूर्व आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना.

उद्देश : विमुक्त जाती, भटक्या जमाती

(डीएनटी) प्रवर्गातील गरीब कुटुंबातील अनेक मुलांना त्यांच्या पालकांच्या पारंपरिक व्यवसायामध्ये मदत करावी लागते. त्यामुळे अशी गरीब कुटुंबातील मुले शाळेत नियमित जाऊ शकत नाही. अशा गरीब वि.जा.भ.ज. प्रवर्गातील गरीब कुटुंबातील मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने भारत सरकारची डॉ. आंबेडकर मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना २०१४-१५ पासून सुरू केली आहे. ही योजना केंद्र शासनाने २०१६-१७ या वर्षापासून सुधारित केली आहे.

अटी व शर्ती

- या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ शासनाच्या मान्यताप्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांस अनुज्ञेय राहील.
- शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा वार्षिक रुपये दोन लाख इतकी राहील.
- विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्तीचा लाभ बंद करण्यात येईल. (अपवादात्मक परिस्थितीमध्ये सक्षम प्राधिकाऱ्यांनी अपरिहार्य कारण नमूद केले असेल त्याव्यतिरिक्त)
- शिष्यवृत्ती मिळण्यासाठी विद्यार्थ्याने तो शिकत असलेल्या शाळेमार्फत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक राहील.
- या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यास अन्य मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही.
- या योजनेची अंमलबजावणी ही जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद व समाज कल्याण अधिकारी (वर्ग-२ बृहन्मुंबई यांच्यामार्फत करण्यात येईल.)
- या योजनेकरिता राज्यस्तरावर सह संचालक. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, पुणे यांना आणि जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व समाज कल्याण अधिकारी यांना तक्रार निवारण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.
- या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करताना संगणकीय व्यवस्थापन प्रणाली वापरण्यात यावी.
- शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित विद्यार्थ्याने शाळेत प्रवेश घेतलेल्या दिनांकापासून ते शाळा सोडल्याच्या दिनांकापर्यंत दीर्घ मुदतीची सुटी वगळता शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांसाठी लागू राहील. (ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षात उशिरा प्रवेश घेतला असेल किंवा शैक्षणिक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी शाळा सोडली असेल असे विद्यार्थी वगळता).
- एकदा मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीचे पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नूतनीकरण करण्यात येईल. तथापि, मागील शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांची किमान ६० टक्के नियमित उपस्थिती असणे अनिवार्य राहील.
- शिष्यवृत्तीची मंजूर रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी योजना

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती, शिक्षण प्रतिपूर्ती, निर्वाहभत्ता व वसतिगृह योजना राबवण्यात येत आहे. या योजनांचा लाभ घेऊन या संवर्गातील विद्यार्थी उत्तम व उत्कृष्ट शिक्षण घेत आहेत .

मॅट्रिकपूर्व शिक्षण शिष्यवृत्ती

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रिकपूर्व शिक्षण व परीक्षाशुल्क प्रतिपूर्ती या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे पालक राज्याचे रहिवाशी असावेत. अशा विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती प्रमाणित दराने केली जाते. खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण व परीक्षाशुल्काची प्रतिपूर्ती विद्यार्थ्यांना द्यावयाचे दरमहा शिक्षणशुल्क + परीक्षाशुल्काची प्रतिपूर्ती (वर्षातून दहा महिने कालावधीसाठी) इयत्ता पहिली ते चौथी १०० रुपये दरमहा, इयत्ता पाचवी ते सातवी १५० रुपये दरमहा, इयत्ता आठवी ते दहावी २०० रुपये दरमहा.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती

इयत्ता पाचवी ते सातवी व इयत्ता आठवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे, या उद्देशाने सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. संबंधित शाळेचे मुख्याध्यापकांनी मुलींची यादी तयार करून संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे पाठवणे आवश्यक आहे. इयत्ता पाचवी ते सातवी ६० रुपये दरमहा (१० महिन्यांसाठी ६०० रुपये), इयत्ता आठवी ते दहावी १०० रुपये दरमहा (१० महिन्यांसाठी १००० रुपये) दिले जातात.

माध्यमिकच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

इयत्ता पाचवी ते सातवीमधील दोन गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच इयत्ता आठवी ते दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

मागील वार्षिक परीक्षेत प्रत्येक इयत्तेत कमीत कमी ५० टक्के गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकावर उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

प्रमुख अटी : मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्गामध्ये शिकणारा मागासवर्गीय विद्यार्थी असावा, ही शिष्यवृत्ती मागील वार्षिक परीक्षेत कमीत-कमी ५० टक्के व त्याहून अधिक गुण मिळवून मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येते, या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही. ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नसते. **लाभाचे स्वरूप** : इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना ५० रुपये दरमहा (५०० रुपये १० महिन्यासाठी), इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना १०० रुपये दरमहा (१००० रुपये १० महिन्यासाठी).

केंद्र सरकारची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी केंद्र शासनाने इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

प्रमुख अटी : ही योजना शासकीय मान्यताप्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांस लागू राहील, विद्यार्थी हा अनुसूचित जाती प्रवर्गातील असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा २.५० लाख रुपये, यामध्ये विद्यार्थ्यांच्या किमान गुणांची अट नाही. या योजनेंतर्गत विद्यार्थ्याने ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही.

लाभाचे स्वरूप : ● वसतिगृहात राहणारे - ३५० रुपये दरमहा (१० महिन्यासाठी), पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक १००० रुपये, ● वसतिगृहात न राहणारे विद्यार्थी १५० रुपये दरमहा (१० महिन्यासाठी) पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक ७५० रुपये, ● दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी १६० रुपये दरमहा (४) मंदबुद्धी विद्यार्थ्यांकरिता २४० रुपये दरमहा.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

भारत सरकारच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असावे. विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्या पुढील शिक्षण घेत

असलेला असावा, तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा. **लाभाचे स्वरूप** : विद्यार्थ्यास निर्वाहभत्ता व शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्क प्रदान, २३० ते ५५० रुपये दरमहा या दराने निर्वाहभत्ता, वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ३८० ते १२०० रुपये दरमहा निर्वाहभत्ता.

मॅट्रिकोत्तर शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती

जे मागासवर्गीय विद्यार्थी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या निकषात बसत नाहीत, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/उच्च शिक्षण घेता यावे, याकरीता राज्य शासनाकडून मॅट्रिकोत्तर शिक्षणशुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ दिला जातो. योजना अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता, अचूकता, पारदर्शकता आणून विलंब टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षाशुल्क योजना, ई-स्कॉलरशीप योजना २०११-१२ पासून ऑनलाइन सुरू करण्यात आली. यासाठी विद्यार्थी शालान्त परीक्षोत्तर व पुढील शिक्षण घेत असलेला असावा. तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा. **लाभाचे स्वरूप** : सर्व जिल्हा स्तरावरील मान्यता प्राप्त मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क व इतर विहित केलेले शुल्क देण्यात येते.

सफाई कामगारांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने ही मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. यासाठी अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबधित सफाईगार, कातडी सोलणे, कातडी कमावणे, या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती सर्व जातिधर्माला लागू आहे. उत्पन्नाची अट नाही. अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना ग्रामसेवक व सरपंच, नगरपालिका मुख्याधिकारी, महानगरपालिका आयुक्त/उपायुक्त/प्रभाग अधिकारी यांच्याकडून अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच २० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर अस्वच्छ व्यवसायात काम करीत असल्याचे हमीपत्रक व जातीचा दाखला आवश्यक. विद्यार्थी वसतिगृहात राहत असल्यास सबंधित अधीक्षकाचे प्रमाणपत्र. **लाभाचे स्वरूप** : इयत्ता पहिली ते दहावीसाठी वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा ११० रुपये व तदर्थ अनुदान ७५० रुपये तर तिसरी ते दहावीच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा ७०० रुपये व तदर्थ अनुदान १००० रुपये.

सैनिक शाळा: निर्वाहभत्ता

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा, सैन्यदलात भरती होण्याची विद्यार्थिदशेतच त्यांच्यात प्रेरणा निर्माण व्हावी, शिस्त,

आत्मविश्वास, शौर्य, सांघिकवृत्ती, नेतृत्व, देशभक्ती इत्यादी गुणांची जोपासना होण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना ऑनलाइन सुरू केली आहे. यासाठी विद्यार्थी पाचवी ते दहावीमध्ये शिकत असावा, पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क, भोजन, निवास, कपडे इत्यादींवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रतिविद्यार्थी प्रतिवर्षी १५,००० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना विविध क्षेत्रात व्यवसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. यासाठी विद्यार्थी मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकत असावा. संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण विभागाकडून दरमहा ६० रुपये विद्यावेतन देण्यात येते, त्या विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा ४० रुपये पूरक विद्यावेतन देण्यात येते. तंत्रशिक्षण विभागाकडून ज्यांना विद्यावेतन देण्यात येत नाही, त्यांना सामाजिक न्याय विभागाकडून दरमहा १०० रुपये विद्यावेतन देण्यात येते.

स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील उमेदवारांकरिता कमी जागा राखीव असतात. यासाठी प्रत्येक विभागीय स्तरावर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यासाठी उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आली आहे. प्रवेशितांना मोफत निवास, भोजन व व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण इ. ची सुविधा दिली जाते. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त असलेले एकूण १२ व्यावसायिक अभ्यासक्रम यात समाविष्ट आहेत.

गुणवत्ता पुरस्कार

इयत्ता १० वी १२ वीच्या परीक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान केले जातात. यामध्ये बोर्डामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास - १ लाख रुपये, विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्यास ५० हजार रुपये, जिल्ह्यात प्रथम येणाऱ्यास २५ हजार रुपये, तालुक्यात प्रथम आलेल्यास १० हजार रुपये, माध्यमिक विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयामधून प्रथम आलेल्यास ५ हजार रुपये रोख बक्षिस दिले जातात. सोबत स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येते.

देशांतर्गत शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील अनुसूचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्यात येते. अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध व्हावे व त्यांची स्पर्धात्मक युगामध्ये जडणघडण व्हावी याकरिता देशातील उत्तमोत्तम शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी उपरोक्त योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

प्रमुख अटी : ● विद्यार्थी अनु.जाती/नवबौध्द व महाराष्ट्र रहिवासी असावा. ● कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकत्रित वार्षिक उत्पन्न ६ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. ● विद्यार्थी या योजनेसाठी शासन निर्णय ८ नोव्हेंबर, २०१७ सोबत जोडलेल्या शासन परिशिष्ट ब अन्वये महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संस्थेत प्रवेशित असावा. (उदा. आयआयएम, आयआयटी, एनआयटी, आयआयएसईआर, आयआयआयटी, आयआयआयएम इ.). ● या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी इयत्ता १०वी,

१२वीची परीक्षा मंडळ महाराष्ट्र राज्य माध्यमिक बोर्ड/केंद्रीय बोर्ड (सीबीएससी) यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक परीक्षांमध्ये किमान ५५ टक्के गुण मिळवलेले असावेत.

लाभाचे स्वरूप : संस्थेने आकारणी केलेले शैक्षणिक संपूर्ण शुल्क, वसतिगृह व भोजनशुल्क अदा केले जाते. त्याबरोबर क्रमिक पुस्तकांसाठी ५,००० रुपये व शैक्षणिक साहित्यासाठी ५,००० रुपये असे एकूण प्रतिवर्षी १०,००० रुपये विद्यार्थ्यांस अदा केले जातात.

परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे, अशा ७५ विद्यार्थ्यांना (पीएच.डी.-२८ व पदव्युत्तर पदवी-४७)

परदेशातील शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती देण्यात येते.

प्रमुख अटी : विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विद्यार्थ्याचे वय पदव्युत्तर पदवीकरिता ३५, तर पीएच.डी. करिता ४० पेक्षा जास्त वय नसावे. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न सहा लाखांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्याने परदेशातील लेटेस्ट क्युएस टॉप ३०० वर्ल्ड रँकिंग विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा. परदेशातील विद्यापीठ हे मान्यताप्राप्त विद्यापीठ असावे. क्युएस टॉप १०० वर्ल्ड रँकिंगमध्ये प्रवेश मिळालेल्या परदेशी विद्यापीठांमध्ये तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा लागू राहणार नाही.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमाचा कालावधी कमाल चार वर्ष किंवा यापेक्षा कमी असलेला प्रत्यक्ष कालावधी तसेच पदव्युत्तर पदवीकरिता कमाल दोन वर्षे किंवा यापेक्षा कमी असलेला प्रत्यक्ष कालावधी ग्राह्य धरण्यात येतो. परदेशी विद्यापीठाने एखाद्या विद्यार्थ्याला विशिष्ट पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश दिला असेल व त्याचे पदवी शिक्षण अन्य शाखेतून पूर्ण झालेले असेल, तरीही त्या विद्यार्थ्यांना आता परदेश शिष्यवृत्तीचा लाभ मिळवता येणार आहे. **लाभाचे स्वरूप :** विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षणशुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो.

विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाहभत्ता अमेरिका व इतर राष्ट्रासांठी अमेरिकन डॉलर १५,४०० तर ग्रेट ब्रिटनसाठी पौंड ९९०० इतका अदा करण्यात येतो. विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी अमेरिकन १५०० व ग्रेट ब्रिटनसाठी पौंड ११०० इतके देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे. विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम संपल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो. तसेच आरोग्य विमा व व्हिसाची रक्कमही देण्यात येते.

शासकीय वसतिगृहे योजना

अनुसूचित जाती मुलामुलींसाठी २७१ जुनी शासकीय वसतिगृहे, १०३ नवीन शासकीय वसतिगृहे व विभागीय स्तरावरील १००० विद्यार्थी क्षमतेची ७ वसतिगृहे अशी एकूण ३८१ शासकीय वसतिगृहे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त मुलींकरिता नवीन ५० वसतिगृहे तर नोकरी करीत असलेल्या महिलांकरिता मुंबई, पुणे व नागपूर येथे तीन वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. विभागांतर्गत अशी एकूण ४३४ शासकीय वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांपैकी तालुका व जिल्हास्तरावरील वसतिगृहांमध्ये इयत्ता आठवी ते दहावी, अकरावी ते बारावी तसेच व्यावसायिक/बिगर व्यावसायिक विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. विभागीय स्तरावरील वसतिगृहांमध्ये अकरावी ते बारावी तसेच व्यावसायिक/बिगर व्यावसायिक विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.

सुविधा

विद्यार्थ्यांसाठी सकाळच्या नाष्ट्यासह दोन वेळचे पोटभर जेवण, दैनंदिन खर्चासाठी निर्वाहभत्ता दरमहा- विभागीयस्तर - ८०० रुपये, जिल्हास्तर - ६०० रुपये, तालुकास्तर - ५०० रुपये, मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठी अतिरिक्त १०० रुपये दरमहा देण्यात येतात, स्नेहसंमेलनासाठी प्रतिशासकीय वसतिगृह प्रतिवर्षी २५,००० रुपये. प्रत्येक वसतिगृहात ॲक्वागार्ड व वॉटरकूलर, फायर फायटिंग सुविधा पुरवण्यात येते. प्रत्येक वसतिगृहासाठी संगणक प्रिंटर व इंटरनेट सुविधेसह वर्षातून दोन वेळा पेस्ट कंट्रोल, ग्रंथालय सुसज्ज करण्यासाठी प्रतिवसतिगृह दोन लाख रुपये प्रतिवर्षी अशी तरतूद आहे.

शासकीय निवासी शाळा

प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या ९० शासकीय निवासी शाळा सुरू आहेत. या निवासी शाळेमध्ये इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींना प्रवेश दिला जातो.

स्वाधार योजना

शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थीपैकी इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वीनंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात/ शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुलामुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाहभत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली आहे.

या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याशी संपर्क साधता येईल.

– दत्तात्रय कोकरे,
विभागीय संपर्क अधिकारी

राज्यातील सर्व घटकांचा विकास करण्याच्या दृष्टीने राज्यातील महाविकास आघाडी शासन कटिबद्ध आहे. विशेषतः तरुणांच्या आकांक्षा आणि त्यांना नोकरी आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या सर्व योजना आणि संस्थांना आर्थिक बळ दिले जात आहे. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था अर्थात सारथी या संस्थेच्या माध्यमातून मराठा, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा, कुणबी कुटुंबांचा सामाजिक आर्थिक, शैक्षणिक विकास करण्याच्या दृष्टीने राज्य शासन प्रयत्नशील असून या संस्थेच्या बळकटीसाठी विशेषत्वाने लक्ष देत आहे.

प्रगतीसाठी 'सारथी'

राजेंद्र सरग

कंपनी कायद्यानुसार स्थापन झालेल्या पुणे येथील छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आहे. शिवरायांचे प्रखर राष्ट्रप्रेम, जनतेचा खरा कळवळा, न्यायप्रियता, निर्भयता, कार्यक्षम या गुणांनी संपन्न छत्रपती शाहू महाराजांनी त्या काळात शिक्षणाचे महत्त्व ओळखले. त्यांनी लोककल्याणकारी राज्यकारभार करत असताना शिक्षण, क्रीडा, कला व संगीत इत्यादीला आश्रय दिला एवढेच नव्हे तर आपल्या कारकिर्दीत त्यांनी राष्ट्रीय भावना, वैज्ञानिक दृष्टिकोन, कृषी संशोधन, जलव्यवस्थापन, सिंचन, सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन, आंतरजातीय विवाह, उद्योग, महिला सक्षमीकरण (स्त्री शिक्षण व विधवा-पुनर्विवाहला प्रोत्साहन तसेच स्त्रियांवर, क्रूरतेविरुद्ध/अत्याचार, देवदासी प्रथेविरूद्ध, पडदा पद्धतीविरुद्ध), शिक्षण वसतिगृह व इतर अनेक महत्त्वाच्या विषयांवर अथक कामे केली.

त्यांची दूरदृष्टी अशी की, स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांच्या संस्थानात त्यांनी अमलात आणलेली अनेक धोरणे स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या लोकशाहीची अंगभूत तत्त्वे झाली आहेत. म्हणूनच मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नवीन संस्था स्थापन करण्याचा विचार केला, तेव्हा तिला छत्रपती शाहू महाराजांचे नाव देण्याचे ठरले.

'सारथी' संस्थेच्या माध्यमाने छत्रपती शाहूंच्या जनकल्याणकारी कार्याची माहिती आजच्या पिढीला होईलच; तसेच त्याबरोबरच त्यांचा पुरोगामी, वैज्ञानिक व कल्याणकारी दृष्टिकोन आजच्या तरुणाईला मार्गदर्शन करीत राहील, यात शंका नाही.

अशा या 'सारथी' संस्थेमार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा या लक्ष्य गटाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी सारथीला मुख्य तीन उद्दिष्टे ठरवून देण्यात आलेली आहेत. त्या तीन मुख्य उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी ८२ पूरक उद्दिष्टे देण्यात आली आहेत. त्या आधारावरच टप्प्याटप्प्याने विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

त्यापैकी काही प्रमुख कार्यक्रम -

- 'सारथी'च्या लक्ष्य गटाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या अनुषंगाने सर्व बाबींचा अभ्यास करणे व तसे करून शासनाला त्यावरील उपाययोजना सुचविणे व लक्ष्य गटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विविध संशोधन, प्रशिक्षण व इतर कार्यक्रम हाती घेणे.
- लक्ष्य गटांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी विविध सर्वेक्षण, कृती संशोधनासहित संशोधन, मूल्यमापन; रोजगार, स्वयंरोजगार, उद्योजकता विकास यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण व विविध क्षेत्रातील प्रशिक्षण व शैक्षणिक केंद्रे स्थापित करणे व विकसित करणे; विद्यार्थी, उद्योजक, शेतकरी व महिलांसाठी मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रे सुरू करणे आणि विविध शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, वेतनमान व पुरस्कार सुरू करणे व प्रदान करणे.
- नागरिकांचे संविधानिक हक्क व कर्तव्ये; राष्ट्रीय एकात्मता व वैज्ञानिक दृष्टिकोन यांना प्रोत्साहन; शांती, जातीय सलोखा व धार्मिक सद्भावना, बंधुता यांना प्रोत्साहन; अंधश्रद्धा, हुंडा, कौटुंबिक हिंसाचार यांचा विरोध; स्वच्छता व आरोग्यासाठी घ्यायची खबरदारी, सामूहिक विवाह, साधे विवाह, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण यांना प्रोत्साहन; यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम हाती घेणे; तसेच सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांच्या मदतीने वरील क्षेत्रासंबंधी जाणीवजागृती व शैक्षणिक कार्यक्रम राबवणे.

सारथीचे यशस्वी विद्यार्थी

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) मध्ये प्रसाद सीताराम शिंदे या विद्यार्थ्याची आयएफएसकरिता निवड झाली आहे. तसेच १६ विद्यार्थी यूपीएससी मुलाखतीसाठी पात्र आहेत.

उद्देश

- दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संवाद-सूचना कौशल्य, सॉफ्ट स्किल्स, माहिती, इंग्रजीसहित इतर भाषांवर प्रभुत्व, आत्मविश्वास वृद्धी, व्यावसायिक मार्गदर्शन, समुपदेशन, कौशल्य, नैसर्गिक कल इत्यादी विविध कार्यक्रम.
- लक्ष्य गटांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी संशोधन संकलन, माहिती प्रसारणासाठी शिखर संस्था म्हणून कार्यरत. विविध समस्यांवर जागृतीसाठी प्रकल्प राबवणे.
- लक्ष्य गटांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कृती, प्रायोगिक व धोरणात्मक संशोधन हाती घेणे तसेच स्थानिक, राज्य व राष्ट्रीय पातळीवर सुयोग्य कल्पना व संकल्पना विकसित करणे आणि पर्यायी धोरणे तयार करणे व सुचवणे.
- ग्रामीण क्षेत्रातील समस्या, शेतीविषयक समस्या, व्यसनाधीनता यांच्यावर स्वतः किंवा इतर संस्थांच्या सहकार्याने संशोधन उपक्रम हाती घेणे. या क्षेत्रातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी व ताणतणाव कमी करण्यासाठी जाणीवजागृती कार्यक्रम, उपक्रम, प्रशिक्षण, समुपदेशन आदी कार्यक्रम राबवणे.
- प्रशिक्षित मनुष्यबळाच्या आधारे तसेच इलेक्ट्रॉनिक, छापील साहित्य, सोशल मीडिया, हेल्पलाइन, माहिती व समुपदेशन केंद्र यांचा वापर करून कृषिक्षेत्रावर अवलंबून असलेल्या लक्ष्य गटांतील कुटुंबांसाठी समुपदेशन, माहिती, प्रेरणादायक कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम राबवणे.
- कौशल्य विकास प्रशिक्षण सेवा संस्थांच्या निवडीसाठी, प्रशिक्षण खर्च, वेतनमान, प्रशिक्षणार्थींसाठी निःशुल्क प्रशिक्षण कार्यक्रमांच्या मूल्यमापनासाठी संशोधन, सर्वेक्षण, डेटा गोळा करणे व तज्ज्ञांच्या मदतीने वेळोवेळी निकष ठरवणे.
- रोजगार, स्वयंरोजगार, उद्योजकता, लघु व मध्यम उद्योग सुरू करणे. कौशल्य विकास योजना स्वबळावर किंवा प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून तयार करणे व राबवणे.
- कार्पोरेट सामाजिक जबाबदारीअंतर्गत निधी उभा करून लक्ष्य गटांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास व पायाभूत सुविधा तयार करणे.
- लक्ष्य गटातील नववी, दहावी, अकरावी व बारावीतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी तसेच परीक्षेत यशस्वी होण्यासाठी प्रशिक्षण योजना राबवणे.
- विविध उच्च शिक्षणासाठी लक्ष्य गटांतील विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देणे.
- लक्ष्य गटातील सदस्यांसाठी वेगवेगळ्या स्पर्धापरीक्षा, व्यावसायिक शिक्षण, प्रवेशपरीक्षा, विदेशी शिक्षणासाठी असणारे प्रशिक्षण व शिकवण्यांसाठी प्रोत्साहन देणे व त्यांचे प्रयोजन करणे; तसेच विशेषकरून लक्षित गटांतील मुलींसाठी अशा योजना, आराखडे, कार्यक्रम यांची अंमलबजावणी करणे.
- महिलांच्या प्रगतीसाठी व सबलीकरणासाठी क्षमतावृद्धीसारखे प्रकल्प राबवणे; विविध कार्यक्रमांचे आयोजन व प्रायोजन (प्रायोजिक तत्त्वावर आयोजन) करणे आणि प्रशिक्षण देणे; तसेच गुणवत्ताधारक महिलांना/मुलींना आरोग्यक्षेत्र, क्रीडाक्षेत्र, कला, हस्तकला आणि इतर नावीन्यपूर्ण क्षेत्रे यात प्रगतीसाठी आर्थिक पाठबळ देणे.
- ग्रंथालय व अभ्यासिकांना मदत करणे तसेच त्यांना व ग्रामपंचायतींना संबंधित पुस्तके, माहिती पुस्तिका, पत्रके, पोस्टर्स-छापील तसेच दृकश्राव्य सामग्री पुरवणे. 'राजर्षी शाहू राष्ट्रीय सार्वजनिक ग्रंथालय' नावाची राष्ट्रीय पातळीवरील ग्रंथालयाची स्थापना करणे.
- विविध सर्वेक्षणे, संशोधन, अभ्यास प्रकल्प, भाषांतरे, लिखाण, पुस्तके यांचे व्यक्ती व संस्था यांना प्रायोजन करणे.
- ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना यासाठी विविध शैक्षणिक, माहिती इ. कार्यक्रम हाती घेणे.
- राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्याशी संबंधित सर्व व्यक्तिगत कागदपत्रांचे, ऐतिहासिक दस्तवेजाचे तसेच त्यांची राज्यकारभार संबंधित आज्ञापत्रे इत्यादींचे संकलन करणे व संरक्षण करणे तसेच त्यांचे प्रकाशन करणे.
- कंपनीशी संलग्न विद्यार्थी, विद्वान व संस्था अतिविशिष्ट प्रकल्पांसाठी, सर्वेक्षणांसाठी व संशोधनासह इतर व्यावसायिक कार्याला आर्थिक व इतर मदत देण्यासाठी पुरस्कार, बक्षीस, शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, वेतनमान सुरू करणे व प्रदान करणे.
- कंपनीच्या उद्दिष्टांसाठी खरेदीतत्त्वावर वा भाडेतत्त्वावर वा इतर प्रकारे करारनामा करून जमीन, इमारती, कार्यशाळा, प्रयोगशाळा, यंत्रे, उपकरणे, वैज्ञानिक दस्तवेज, साधने, चित्रे, डेटा, प्रायोगिक डाटा, ग्रंथालये, वृक्षसंपदा आणि सर्व प्रकारचे विशेषाधिकार यांना तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी तसेच गरजेप्रमाणे चल व अचल मालमत्ता संपादन करणे.
- लक्ष्य गटांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी राज्यात व राज्याबाहेर विविध भेटी, शैक्षणिक सहलींचे आयोजन.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचे व त्यांच्याशी संबंधित ऐतिहासिक स्थानांचे संशोधन व दस्तवेजीकरण करणे.
- छत्रपती शाहू महाराजांच्या व इतर समाजसुधारकांच्या जीवनकार्याशी निगडित महत्त्वाच्या दिवशी सभासमारंभ, व्याख्याने, कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा, स्पर्धा, क्रीडा कार्यक्रम, सोहळे, सूचना व माहिती कार्यक्रम, भेटी, प्रदर्शने, छापील व इलेक्ट्रॉनिक साहित्याचे निःशुल्क वाटप करणे व असे कार्यक्रम हाती घेणाऱ्या संस्थांना प्रायोजित करणे किंवा त्यांच्याशी सहकार्य करणे.
- छत्रपती संभाजी महाराज, संत तुकाराम महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, संत गाडगे बाबा, सयाजीराव गायकवाड, शहीद भगत सिंह, महर्षी वि. रा. शिंदे, ताराबाई शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी समाजसुधारकांच्या जीवनकार्यावर तसेच लक्ष्य गटांच्या संदर्भात महत्त्वाच्या सामाजिक व शैक्षणिक सुधारणा चळवळींचे अध्ययन व संशोधन यांचे नियोजन करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांना प्रायोजित करणे व असे कार्य हाती घेणे.

जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ही संस्था राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अंतर्गत स्वायत्त संस्था आहे. शास्त्रोक्त संशोधन, सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी योजनांचे मूल्यांकन, प्रशिक्षण, कौशल्य विकास इत्यादीद्वारे ही संस्था सामाजिक न्याय विभागासाठी मुख्य समन्वयाचे कार्य करते.

सामाजिक न्यायासाठी 'बार्टी'

डॉ. पद्मश्री पाटील

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतेचे विचार जनसामान्यात रुजवणे, प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये अनुसूचित जातीच्या विकासाकरिता विविध उपक्रम राबवणे, अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासाकरिता जातीनिहाय संशोधन करून शासनास धोरणात्मक शिफारसी करणे, शासनाने वेळोवेळी सोपवलेली योजना व कामे पार पाडणे हे ध्येय आणि उद्देश या संस्थेचा आहे.

विविध विभाग कार्यरत

राज्यातील अनुसूचित जातीच्या होतकरू, गरीब, कार्यक्षम विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षेस सक्षमपणे व आत्मविश्वासपूर्वक सामोरे जाता यावे व त्यांचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास व्हावा या दृष्टीने बार्टीचे विविध विभाग कार्यरत आहेत. या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण, राज्यसेवा स्पर्धापरीक्षा पूर्वप्रशिक्षण, आयबीपीएस आणि इतर स्पर्धापरीक्षा पूर्वप्रशिक्षण देण्यात येते. अधिछात्रवृत्ती विभागाच्या वतीने एम. फिल./पीएच.डी करण्यासाठी विद्यार्थ्याना आर्थिक स्वरूपात अधिछात्रवृत्ती दिली जाते. संशोधन विभागांतर्गत अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासाकरिता जातीनिहाय संशोधन करून शासनास धोरणात्मक शिफारशी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते.

प्रकाशने विभागाच्या वतीने सामाजिक न्याय व समतेच्या प्रस्थापनेकरिता कार्य केलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर थोर समाजसुधारकांच्या जीवनकार्यावर आधारित पुस्तकांचे प्रकाशन, भाषांतर, खरेदी/छपाई करून विविध समाजघटकांना ८५ टक्के सवलतीच्या दरात वितरित केली जातात. बार्टीच्या विविध योजनांची पद्धत आणि उद्दिष्टांची विविध दृकश्राव्य माध्यमाद्वारे व प्रबोधनात्मक उपक्रमाद्वारे प्रसिद्धी करण्याचे काम प्रसिद्धी विभाग करतो.

जात प्रमाणपत्र पडताळणी

२९ ऑगस्ट २०१२च्या शासन निर्णयानुसार महासंचालक, बार्टी पुणे यांना मुख्य समन्वयक, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने समित्यांशी समन्वय साधणे, तसेच समितीस आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरवणे, साधनसाम्रगी उपलब्ध करून देणे, कार्यालयीन व खर्चासाठी निधी उपलब्ध करून देणे व वेळोवेळी आढावा घेणे. अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा प्रशिक्षण, समाजातील जातीय सलोखा वृद्धिंगत, गावामध्ये सौहार्दपूर्ण वातावरण निर्मिती होण्यासाठी बार्टीद्वारे कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते. सामाजिक न्याय विभागांतर्गत अधिकारी व कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देणे. मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी विविध योजना राबवण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या योजनांचे मूल्यमापन बार्टी संस्थेमार्फत करण्यात आल्याने ते शासनास धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त होते.

यशोगाथा

- संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत आतापर्यंत २११ विद्यार्थ्यांची सनदी अधिकारीपदी निवड.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगच्या राज्यसेवा परीक्षेत एकूण ५५ विद्यार्थ्यांची अधिकारीपदी निवड.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग न्यायिक सेवा परीक्षेत बार्टी पुरस्कृत विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थ्यांची दिवाणी न्यायाधीश व न्याय दंडाधिकारी वर्ग-१ पदी निवड.
- अधिछात्रवृत्ती अंतर्गत एकूण ४७५ लाभार्थींपैकी १०४ एम.फिल. व ९५ पीएच.डी. विद्यार्थी उत्तीर्ण.
- आयबीपीएसच्या प्रशिक्षणातून ३५८८ विद्यार्थ्यांना नोकरी प्राप्त.
- कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून ट्रेन ॲण्ड एम्प्लॉय योजनेंतर्गत आणि इंजिनिअरिंग क्लस्टरच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगार संधी उपलब्ध.

नावीन्यपूर्ण उपक्रम

- हिंदू खाटिक, मांग गारुडी, मादिगा, कैकाडी, सफाई कर्मचाऱ्यांचा वास्तववादी विश्लेषणात्मक अभ्यास, अनुसूचित जातीचे इतर जातींच्या तुलनेमध्ये मागासलेपण दर्शवणारी आकडेवारी (सांख्यिकीय माहिती) इ. अहवाल राज्य शासनास सादर केले आहेत. याचबरोबर विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या संदर्भात इदाते अहवाल (१९९६), धोबी समाजाचा अस्पृश्यतेसंबंधीचा अहवाल (१९९६), कोल्हाटी समाजाचा अहवाल (१९९८) हे अहवाल राज्य शासनास सादर करण्यात आले आहेत.
- बार्टीच्या ध्येय उद्दिष्टांना अनुसरून विविध प्रशिक्षणाचे बार्टीमार्फत आयोजन करण्यात येते.
- भरतीपूर्व प्रशिक्षण व कल्याण विभागांतर्गत महाराष्ट्रातील उमेदवारांना सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षणाचे नक्षलग्रस्त सडक अर्जुनी जिल्हा गोंदिया येथे लाभ देण्यात आला आहे.
- महार रेजिमेंटमधील शौर्य पुरस्कार प्राप्त सैनिकांचा मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार सोहळा.
- चैत्यभूमी व भीमा कोरेगाव येथे अभिवादनासाठी येणाऱ्या लाखो अनुयायांना बार्टीमार्फत मोफत अन्न व पाणी व्यवस्था.
- राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये जात प्रमाणपत्र पडताळणीचे समन्वयाचे काम. आतापर्यंत ३०४६८७३ जात वैधता प्रमाणपत्र वितरित.
- बार्टीचे ॲट्रॉसिटी ट्रेनिंग कक्षामार्फत अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम ॲट्रॉसिटी १९८९ प्रचार व प्रसारा करीत आत्तापर्यंत तालुका व जिल्हा स्तरावरील एकूण १३५ कार्यशाळेद्वारे २७१४० लाभार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ देण्यात आला व त्यांच्यामार्फत गावातील जातिभेद निर्मूलनाचे कार्य.
- मूल्यमापन कक्षामार्फत आतापर्यंत १० कल्याणकारी योजनांचे मूल्यमापन करून या योजनांच्या लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळत आहे का योजनेची फलश्रुती अनुदानाचा लाभ मिळत आहे का योजनेतील ऊनी व इत्यादी बाबतीत अहवालाद्वारे शासनास शिफारस.
- २०१२ ते २०१७ पर्यंत एकूण ४७८ विद्यार्थी अधिछात्रवृत्तीचा लाभ घेत आहेत. १०४ विद्यार्थ्यांचे एम.फिल. पूर्ण व ९५ विद्यार्थ्यांचे पीएच.डी. पूर्ण झाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन फेलोशिप (BANRF) २०१८ करिता एकूण ४०८ विद्यार्थ्यांची निवड.
- यूपीएससी व एमपीएससी या परीक्षेच्या पूर्वतयारीकरिता बार्टीमार्फत एकूण ३२११ विद्यार्थ्यांना निशुल्क प्रशिक्षण त्यापैकी २७३ उमेदवार परीक्षांमध्ये यशस्वी.
- आयबीपीएस या परीक्षेच्या पूर्वतयारीकरिता बार्टीमार्फत एकूण २४८७० विद्यार्थ्यांना लाभ त्यापैकी ३५८८ विद्यार्थी बँक ऑफिसर, कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक अशा विविध शासकीय पदांवर नियुक्त.
- कौशल्य विकास प्रशिक्षणाचा आतापर्यंत १६०८४ विद्यार्थ्यांना लाभ ६० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना औद्योगिक व शेती क्षेत्राच्या रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.
- दीक्षाभूमी नागपूर येथे विश्वशांती परिषदेचे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे आयोजन करून विश्वशांतीकरिता कार्यरत व्यक्तींचा सत्कार, विचारमंथन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन.
- संत साहित्यातील पुरोगामी विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संतसाहित्य संमेलनाचे नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यात आयोजन.
- समतादूत प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात प्रतिवर्षी संविधान दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने या वर्षी संविधान दिनानिमित्त 'संविधान साक्षर ग्राम' हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला.

- बार्टी पुणे, संचलित येरवडा येथील सफाई कामगारांच्या मुलामुलींची निवासी शाळेचा सलग दुसऱ्या वर्षी इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

ऑनलाइन प्रशिक्षण

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या सूचनेनुसार महासंचालक कैलास कणसे यांनी राज्यातील सर्व जाती-धर्मातील उमेदवारांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देण्याचे नियोजन केले. या प्रशिक्षण वर्गासाठी ९० हजारापेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज केले होते. या प्रशिक्षणाची सुरुवात २४ जुलै २०२० रोजी झाली असून उमेदवारांचा या प्रशिक्षणासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कोरोना साथीच्या संकटकाळातही बार्टीच्या प्रत्येक विभागाने आपल्या कामाचे सामाजिक दायित्व विचारात घेऊन अखंडपणे कार्यरत राहून उल्लेखनीयरीत्या कामगिरी पार पाडली आहे. संस्थेमार्फत गरजू व निराधार व्यक्तींना मोफत अन्न व पाण्याची व्यवस्था करण्यात आली. लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये ९० समतादूत व प्रकल्प अधिकारी यांनी आपत्ती व्यवस्थापन कार्यालयात १,१२,०८६ ई-पास वितरण केले, परराज्यातील ६८,९०५ प्रवाशांची यादी तयार केली आहे. समतादूतांच्या माध्यमातून या वर्षी ४०,८०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला असून १७०० विद्यार्थी प्रतीक्षा यादीमध्ये आहेत.

बुद्धिस्ट असोसिएशन फॉर द ब्लाईंड, नाशिक या संस्थेने अंध बांधवांकरिता ब्रेल लिपीमध्ये भारतीय संविधान लिप्यांतरित करण्याच्या हाती घेतलेल्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे ऐतिहासिक काम बार्टीच्या माध्यमातून पूर्णत्वास गेले.

लेखिका बार्टी, पुणे येथे प्रकल्प व्यवस्थापक आहेत.

पुणे येथील कोविड रुग्णालयाची पाहणी करताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

राज्यात कोरोनाचा उद्रेक होऊन सहा महिने झाले. या काळात राज्याच्या आरोग्य विभागामार्फत अनेक उपाययोजना करत कोरोनाला रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे, त्याला प्रतिसादही मिळतोय. विविध उपाययोजनांमध्ये राज्यात अभिनव अशा टेलिआयसीसु प्रकल्पाचा शुभारंभ झाला, तर शहरी आरोग्य संचालक हे नवीन पद निर्माण करून आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी ग्रामीण भागाबरोबरच नागरी भागातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी पाऊल टाकले आहे.

आरोग्य सेवा बळकट

अजय जाधव

राज्यात कोरोनाच्या रुग्णांची संख्या वाढत असतानाच या आजारातून बरे झालेल्यांची संख्याही साडेपाच लाखांच्या आसपास पोहोचली आहे. ही नक्कीच दिलासा देणारी बाब आहे. कोरोनाबाधित आढळल्यानंतर त्याच्या निकट सहवासातील व्यक्तींचा शोध तातडीने घेतला पाहिजे. जेणेकरून संसर्गाचा प्रादुर्भाव टाळता येऊ शकतो. यासाठी जे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे त्यानुसार राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये निश्चित प्रमाणापेक्षा कमी कॉन्टॅक्ट ट्रेसिंग झाले आहे. त्या जिल्ह्यांनी कॉन्टॅक्ट ट्रेसिंग वाढवण्याचे निर्देश आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिले आहेत.

जम्बो सुविधांची निर्मिती

राज्यात मुंबईपाठोपाठ पुणे येथे कोरोना उपचारांसाठी जम्बो सुविधांची निर्मिती करण्यात आली. पिंपरी येथील अण्णासाहेब मगर स्टेडियमच्या मैदानावर कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी उभारण्यात आलेल्या कोविड रुग्णालयाचे नुकतेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाइन लोकार्पण झाले.

राज्यात विशेषज्ञ डॉक्टरांची कमतरता लक्षात घेऊन जिल्ह्यांना विशेषज्ञ घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. अशा विशेषज्ञांना तीन महिन्यांची ऑर्डर दिली जाते आणि २ लाख रुपये प्रतिमहिना अदा केले जातात. विशेषज्ञ उपलब्ध होण्यासाठी मानधनात वाढ करतानाच तीनऐवजी सहा महिन्यांची ऑर्डर देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला. आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी प्रयत्न सुरू असून सध्या प्राधान्याने वर्ग 'क' आणि 'ड'च्या मेरीटनुसार यादया करण्याचे काम सुरू आहे. त्याचबरोबर 'अ' आणि 'ब' संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

पहिला टेलीआयसीयु प्रकल्प

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला भिवंडी येथील उपजिल्हा रुग्णालयात राज्यातील पहिल्या टेलीआयसीयु प्रकल्पाचा ऑनलाइन शुभारंभ आरोग्यमंत्री श्री. टोपे यांच्या हस्ते करण्यात आला. अतिदक्षता विभागात (आयसीयु) दाखल असलेल्या कोरोनाच्या गंभीर रुग्णांसाठी विशेषज्ञांचे मार्गदर्शन आणि उपचाराची सेवा या तंत्रज्ञानाच्या मदतीने घेण्यात येणार आहे. राज्यात अकोला, जळगाव, सोलापूर, जालना आणि औरंगाबाद येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये ही सुविधा लवकरच कार्यान्वित होणार आहे.

भिवंडी येथील आयजीएम उपजिल्हा रुग्णालयातील आयसीयुमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून दिल्ली येथील विशेषज्ञांकडून गंभीर रुग्णांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले जाते आणि त्यांना कुठले उपचार द्यायचे याबाबत मार्गदर्शन केले जाते. दिवसातून पाच वेळा या विशेषज्ञांकडून रुग्णांची विचारपूस केली जाते. राज्यात अन्य ठिकाणी करण्यात येणारी ही सुविधा वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयात आहे मात्र भिवंडी त्याला अपवाद ठरले असून ही सुविधा असणारे ते राज्यातील पहिले उपजिल्हा रुग्णालय ठरले आहे. येथील टेलीआयसीयु

कक्ष आरोग्यमंत्री यांच्या दिवंगत मातोश्री शारदाताई यांना समर्पित करण्यात आले आहे.

आरोग्य सुविधेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज आहे. राज्यातील कोरोना रुग्णांचा मृत्युदर ही चिंतेची बाब असून मृत्युदर एक टक्क्यांपेक्षाही कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यात विशेषज्ञांची जाणवणारी कमतरता टेलीआयसीयु तंत्रज्ञानामुळे काहीशी भरून निघणार असून कोरोनाच्या गंभीर रुग्णांवर विशेषज्ञांच्या मार्गदर्शनातून उपचार झाले तर मृत्युदर कमी होण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

नवीन पदनिर्मिती

कोरोना आजाराच्या पार्श्वभूमीवर शहरी भागातील आरोग्य व्यवस्था अधिक परिणामकारक करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या मान्यतेने आरोग्य संचालक (शहरी) हे नवीन पद निर्माण करण्यात आले असून त्यासोबतच अन्य सहा पदेदेखील निर्माण करण्यात आली आहेत. शहरी भागासाठी संचालक, आरोग्य सेवा (शहरी), उप संचालक-२ पदे, सहायक संचालक-४ पदे अशी ही नवी यंत्रणा असणार आहे. या नवीन पदांच्या निर्मितीसाठी आरोग्यमंत्री श्री. टोपे यांनी पुढाकार घेतला होता. शहरी भागांमध्ये प्राथमिक आरोग्य सेवांचे बळकटीकरण करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय ठेवण्याची जबाबदारी संचालक शहरी आरोग्य सेवा यांची असणार आहे. त्याचबरोबर महापालिका व नगरपालिका क्षेत्रातील आरोग्य सेवेसोबतच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची नियमितपणे देखभाल, परीक्षण व नियंत्रण करतानाच त्याचा आढावाही संचालक शहरी आरोग्य यांनी घ्यायचा आहे.

ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नागरी कार्यक्षेत्रात आरोग्य सेवेचे काम कमी आहे ही बाब आरोग्य व नगरविकास विभागाच्या सचिवांना निदर्शनास आणून देतानाच कार्यक्षमता वाढीसाठी उपाययोजना सुचवण्याची जबाबदारी शहरी आरोग्य संचालकांची असणार आहे. साथरोग नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबवणे तसेच आरोग्य सेवा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरविकास विभाग यांच्यात समन्वयाची जबाबदारीदेखील संचालकांवर असणार आहे. संचालक शहरी यांच्यासोबत उपसंचालक राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, उपसंचालक संसर्गजन्य रोग नियंत्रण तसेच कुटुंबकल्याण, इतर आरोग्य कार्यक्रम, जलजन्य/कीटकजन्य आजार आणि इतर सांसर्गिक/असांसर्गिक आजार या विभागांसाठी चार सहायक संचालक असतील. राज्यातील शहरी भागामध्ये लसीकरण, साथ रोग व इतर आरोग्यविषयक कार्यक्रम अधिक परिणामकारकतेने राबवण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी ही यंत्रणा कार्यरत राहील.

नवीन रुग्णवाहिका

गामीण भागातील शासकीय आरोग्य यंत्रणेच्या रुग्णवाहिका या कायमच टिकेचा विषय ठरतात. ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेला बळकटी देण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांना ५०० नवीन रुग्णवाहिका पुरवण्यात येणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केलेल्या घोषणेची पूर्तता केली असून या नवीन रुग्णवाहिका महिन्याभरात उपलब्ध होतील. कोरोनाशी लढा सुरू असताना आरोग्यमंत्र्यांना मातृवियोगाचे दु:ख सहन करावे लागले. मात्र त्यांनी दु:खाला बाजुला सारत कर्तव्याला प्राधान्य दिले आणि केवळ तीन दिवसांचा दुखवटा पाळल्यानंतर ते पुन्हा कामावर हजर झाले. कृतीतून समाजप्रबोधनाचा संदेश त्यांनी दिला.

विभागीय संपर्क अधिकारी

पारदर्शक धोरण

कोरोनाच्या उद्रेकानंतर गेल्या सहा महिन्यात महाराष्ट्रात ७ लाखांहून अधिक रुग्णांची नोंद झाली त्यातील साडेपाच लाखांहून अधिक बरे होऊन घरी गेले तर लाखभर रुग्णांवर उपचार सुरू आहेत. रुग्णवाढीचे केंद्र मुंबईकडून मुंबई महानगर परिसर आणि पुणे आदी परिसरात स्थलांतरित झाले आहे. या काळातील अनुभवातून राज्यात आता अधिक चांगल्या सुविधा निर्माण झाल्याने मृत्यू रोखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

रुग्णांचे वेळेत लवकर निदान करण्यासाठी अधिकाधिक चाचण्या केल्या जात असल्याने बाधित रुग्णांची संख्या जास्त आढळून येत आहे. महाराष्ट्राने सुरुवातीपासून कोरोना रुग्णाचा झालेला मृत्यू जाहीर करताना पारदर्शक धोरण अवलंबले आहे. एखाद्या रुग्णाचा मृत्यूसमयी अहवाल जर कोरोना पॉझिटिव्ह असेल तर त्याचा मृत्यू कोरोनामुळे झाल्याचे घोषित केले जाते मग त्याच्या आजाराचे मूळ कारण काही असो. राज्यासाठी मार्च, एप्रिल हा काळ कठीण होता. जुनपासून परिस्थिती सुधारली. आता मृत्युदर रोखण्याकामी अधिक प्रयत्न केले जात आहे.

सांसर्गिक आजारांच्या रुग्णालयासंदर्भात केंद्र शासनाने प्रस्ताव मांडला आहे. ज्या जिल्ह्याची लोकसंख्या १० लाखांहून अधिक आहे अशा महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यांमध्ये १०० खाटांचा तर १० लाखांपेक्षा कमी लोकसंख्येच्या ८ जिल्ह्यांमध्ये ५० खाटांचा स्वतंत्र विभाग असावा यातील काही खाटा डायलिसीससाठी राखीव ठेवण्यात येतील. १०० खाटांच्या विभागामध्ये २० खाटांचा अतिदक्षता विभाग (आयसीयू) तर ५० खाटांच्या विभागामध्ये १० खाटांचा अतिदक्षता विभाग असावा असे महाराष्ट्रातर्फे सुचविण्यात आले आहे. सांसर्गिक आजारांवरील रुग्णालयासाठी मुंबई करिता स्वतंत्र प्रस्ताव आहे. शहरी भागात संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव जास्त असल्याने शहरी भागातील सुविधा बळकट करण्याची गरज आहे. ५० हजार लोकसंख्या असलेल्या शहरी भागासाठी क्षेत्रीय स्तरावरील आरोग्य कर्मचारी आणि आरोग्य पद असेल. या संदर्भात केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय आराखडा तयार केला जात आहे.

– डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, आरोग्य विभाग

नागपूर येथे शेतकऱ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात ८ (अ) उताऱ्यांचे वाटप करताना महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, दुग्धविकास मंत्री सुनिल केदार, आमदार विकास ठाकरे आदी.

प्रशासनाचा कणा

सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी महसूल विभाग पार पाडत असतो. शासनाच्या लोकाभिमुख योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम महसूल विभाग करत असतो. महसूल विभागाचे काम २४ तास व ३६५ दिवस अविरतपणे सुरू असते. कोणतीही परिस्थिती असो, महसूल विभागाची जबाबदारी ही अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळेच महसूल विभाग हा शासन व प्रशासनाचा कणा आहे.

बाळासाहेब थोरात
मंत्री, महसूल

शासकीय अधिकारी कर्मचारी काम करण्यास विलंब करतात असे कधीतरी म्हटले जात असे, मात्र कोविड-१९ या संकटाच्या काळात जेव्हा संपूर्ण राज्य बंद करण्याची वेळ आली तेव्हा सरकारी रुग्णालय, जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी यांच्यासह विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी असे सर्वजण या संकटसमयी अहोरात्र काम करत होते आणि अजूनही राज्यातील कोविड-१९ मुळे आलेली परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी झटत आहेत.

राज्यातील संपूर्ण व्यवस्था नीट चालावी म्हणून विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी झटत होते. शासकीय सेवेत कार्यरत कर्मचारी आणि अधिकारी, पोलीस बांधव, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर्स, नर्सेस, वार्डबॉय, फार्मासिस्ट, सपोर्ट स्टाफ आणि इतरही या लढाईत सामील असलेले असंख्य हात या लढाईतील खरेखुरे सैनिक ठरले असे मला वाटते. या काळात सर्वांनी जोखीम पत्करून, आपल्या व्यक्तिगत सुटीचा विचार न करता महाराष्ट्रातील जनतेच्या भल्यासाठी काम केले.

आज फक्त भारतापुढे नाही, तर जगासमोर कोविड-१९चे संकट उभे राहिले आहे. कोविड-१९चा मुकाबला करण्यासाठी देशात लॉकडाऊन करण्यात आला. या काळात आपण सर्वांनी स्वयंशिस्त आणि संयम दाखवला असून येणाऱ्या काळातही आपल्याला एकजुटीने परिस्थितीशी सामना करावयाचा आहे. आता राज्यात 'मिशन बिगिन अगेन' करण्यात आले असले तरी यापुढील काळातही आपण काळजी घेणे आवश्यक आहे.

आरोग्य, पोलीस आणि महसूल विभागांसह इतरही सर्वच विभागातील अधिकारी आणि कर्मचारी पाच महिन्यांहून अधिक काळ कोरोना विरोधातील लढाईत व्यग्र आहेत. राज्याचे मुख्य सचिव आणि त्यांची टीम, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार व त्यांचे सर्व सहकारी हे अठरा अठरा तास व्यस्त आहेत. तहसीलदार/तलाठी समाजाला धीर देत आहेत, कोतवाल त्यांना मदत करत आहेत. तुम्ही घरदार सोडून राज्यासाठी दिवसरात्र एक करून काम करत आहात, त्याच कौतुक आहे. या सगळ्यातून महसूल यंत्रणा प्रशासनाचा कणा आहे हे दिसून आले आहे. यापुढील काळात आपली जबाबदारी अधिक वाढली आहे. शासकीय कामात महसूल विभागाची महत्त्वाची भूमिका आहे. सर्वसामान्यांच्या आयुष्यात सुख, शांती आणणारा हा विभाग आहे. त्यामुळेच अनेक जबाबदाऱ्या महसूल विभागावर सोपवण्यात येतात. आजपर्यंत साडे सतरा लाखांहून अधिक लोकांनी 'डिजिटल ७/१२' घेतला आहे, त्याचप्रमाणे आता 'डिजिटल आठ (अ)' लासुद्धा असाच प्रतिसाद मिळेल अशी मला आशा आहे. महसूल प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र प्रयत्न करू या.

क्रीडाई संघटनेची मागणी पूर्ण

महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्यासमोरील सोर्स कम्पलेंटमधील सुनावणीप्रकरणी, ११ मार्च २०२० रोजी दिलेल्या निवाड्यानुसार, गृहनिर्माण विभागाने याबाबत संदिग्धता दूर केल्यानंतर, महसूल व वन विभागांतर्गत असलेल्या मुद्रांक विभागाने खालीलप्रमाणे

स्पष्टीकरण निर्गमित केलेले आहे. त्यानुसार, स्थावर संपदा तथा मालमत्ता (विकास आणि नियमन) कायदा, २०१६ (रियल इस्टेट (रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट) ॲक्ट, २०१६च्यामार्फत स्थावर संपदा प्रकल्पाचे नियमन तथा नियंत्रणाकरिता महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. उक्त प्राधिकरण, हे नोंदणी नियम, १९६१च्या नियम ४४च्या उप-नियम (१) मधील बाब (ळ) नुसार रेरा अधिनियमाखाली सक्षम प्राधिकरण ठरते. त्यामुळे, उक्त सक्षम प्राधिकरणामार्फत दिनांक ११ ऑक्टोबर २०१९ रोजी निर्गमित परिपत्रक क्रमांक २५/२०१९ मध्ये रेरा प्राधिकरणाकडे नोंदणीपासून सूट दिलेल्या स्थावर संपदा प्रकल्पांमधील स्थावर संपदा तथा मालमत्तेच्या हस्तांतरण दस्तांच्या नोंदणीकरिता सक्षम प्राधिकरणासमोर, रेरा अधिनियमाच्या कलम ३च्या पोट कलम (२) च्या अनुषंगाने झालेल्या सुनावणीमध्ये, उक्त प्राधिकरणामार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या निवाड्यांमध्ये रेरा प्राधिकरणाकडे नोंदणीपासून सूट दिलेल्या संबंधित स्थावर संपदा प्रकल्पामधील, स्थावर संपदा तथा मालमत्तेच्या हस्तांतरण दस्तांच्या नोंदणीकरिता देखील नोंदणी नियम, १९६१ च्या नियम ४४ च्या उप-नियम (१) मधील बाब (ळ) लागू होणार नाही.

या स्पष्टीकरणामुळे आता पूर्णत्वाचा दाखला घेतलेल्या प्रकल्पा संदर्भातील दस्त नोंदणीच्या वेळी रेरा नोंदणी आवश्यक राहणार नाही. क्रीडाई, पुणे या संघटनेची अनेक दिवसांची मागणी पूर्ण झालेली आहे.

महत्त्वाचे निर्णय

■ महसूल चोरीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित आर्थिक व्यवहारांसाठी यापुढे पॅन क्रमांक अनिवार्य करण्याचा निर्णय. ■ कंपनी एकत्रिकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कावर विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटींवरून ५० कोटीपर्यंत वाढवण्यास मंजुरी. ■ प्रॉपर्टी व्यवहारांच्या नोंदणीस परवानगी.

महसूल सहायक

महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयातील लिपिक गट पदाचे पदनाम आता महसूल सहायक करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेची महसूल विभागांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील 'लिपिक गट (क)' कर्मचाऱ्यांची तांत्रिक लिपिकऐवजी 'महसूल सहायक' असे पदनाम करावे अशी मागणी होती. शासनाने महसूल कर्मचारी संघटनेची ही मागणी मान्य केली.

सर्वसामान्यांना दिलासा

येत्या ३१ डिसेंबर २०२० अखेरपर्यंत ३ टक्के तर ३१ मार्च २०२१ पर्यंत २ टक्के मुद्रांक शुल्क दर सवलतीमुळे सर्वसामान्य, शेतकरी वर्ग यांच्यासह बांधकाम व्यावसायिकांना दिलासा मिळेल. सध्याचा प्रचलित मुद्रांक शुल्क दर कमी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे अभिहस्तांतरण पत्राच्या दस्तावरील प्रचलित मुद्रांक शुल्काचा दर १ सप्टेंबर, २०२० पासून ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता ३ टक्क्यांनी तर १ जानेवारी, २०२१ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीकरिता २ टक्क्यांनी कमी करण्यात आला आहे.

कोविड-१९ मुळे राज्यात लॉकडाऊननंतर 'मिशन बिगिन अगेन'अंतर्गत उद्योग व्यवसायाला चालना देण्यात येत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून बांधकाम व्यावसायिक आणि विविध संघटना यांच्याकडून मुद्रांक शुल्क कमी करण्याची मागणी महसूल विभागाकडे करण्यात येत होती. शासनाने याबाबत पुढाकार घेऊन घर खरेदीदार आणि बांधकाम व्यावसायिकांना दिलासा दिला आहे. वाढती लोकसंख्या, नागरिकीकरण, औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागातील कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यास नक्कीच मदत होईल. सर्वसामान्य नागरिकांचा महसूल विभागाशी दैनंदिन कामकाजासाठी संबंध येत असतो. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकास मध्यवर्ती ठेवून त्यांच्या प्रश्नांची/अडचणींची सोडवणूक तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक जलद करण्याचा प्रयत्न महसूल विभाग करीत आहे. महाराष्ट्राच्या विकासात आजपर्यंत या विभागाने महत्त्वाचे योगदान दिले आहे.

शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,
विभागीय संपर्क अधिकारी

सात-बारानंतर आता आठ (अ) ऑनलाइन

कोविड-१९ ची राज्यातील परिस्थिती लक्षात घेऊन या वर्षीचा महसूल दिन ऑनलाइन पद्धतीने साजरा करण्यात आला. १ ऑगस्टपासून नवीन महसूल वर्षाला सुरुवात होत असते. कोविड-१९ पार्श्वभूमीवर आपण या वर्षी महसूल दिनाचा कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने साजरा केला. यामुळे कोरोना आपत्तीच्या काळामधील ही एक इष्टापत्ती आहे. या महसूल वर्षात 'आठ (अ)' हा ऑनलाइन उतारा देण्याची सुविधा महसूल विभागामार्फत सुरू करण्यात आली. कोविड-१९च्या काळात महसूल विभाग आपली भूमिका कार्यक्षमपणे पार पाडत असून राज्याचे आर्थिक व्यवहार सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी देखील प्रयत्न करीत आहे. तंत्रज्ञानामुळे कामाच्या गतीसोबतच त्याचे स्वरूपदेखील बदलले आहे. कोविडच्या या परिस्थितीत राज्याचे अर्थचक्र सुरळीतपणे सुरू ठेवण्याची जबाबदारी हीदेखील महसूल विभागाची असल्याने येणाऱ्या काळातही या विभागामार्फत तत्परतेने काम होईल असा मला विश्वास आहे. पूर्णत्वाचा दाखला घेतलेल्या प्रकल्पांना दस्त नोंदणीच्या वेळी रेरा नोंदणीची आवश्यकता नाही. रिअल इस्टेट (रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट) रेरा प्राधिकरणाकडून पूर्णत्वाचा दाखला घेतलेल्या प्रकल्पांच्या संदर्भात दस्त नोंदणीच्या वेळी रेरा नोंदणी आवश्यक राहणार नाही.

सर्वसामान्य गोरगरीब माणसांचे घराचे स्वप्न पूर्ण करणे आणि त्याला हक्काचे घर उपलब्ध करून देणे याबरोबरच शहरे झोपडपट्टीमुक्त करणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून गृहनिर्माण विभाग कार्यरत आहे. हे करीत असताना केवळ इमारती उभ्या न करता तेथील नागरिकांना जीवनावश्यक मूलभूत सुविधा, स्वच्छ परिसर व स्वप्नातील निवारा कसा मिळेल, याकडे गृहनिर्माण विभाग कटाक्षाने लक्ष देत आहे. त्यात आता आरोग्य केंद्राचीही भर पडली आहे.

स्वस्त व परवडणारी घरे

डॉ.जितेंद्र आव्हाड
मंत्री, गृहनिर्माण

सुरुवातीच्या दीड महिन्याच्या काळातच आम्ही पंचवीस महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी देखील सुरू केली. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) व झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (एसआरए)च्या माध्यमातून लोकांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी तसेच जे रखडलेले प्रकल्प होते किंवा ज्या योजना होत्या, त्यांना गती देण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यांच्या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. 'रोटी, कपडा और मकान' हे ब्रीदवाक्य आपण ऐकले असेल. परंतु आता यापुढील काळात लोकांना हक्काचे घर देण्याची जबाबदारी आम्ही स्वीकारली आहे. त्यामुळे म्हाडाऐवजी यापुढे 'रोटी, कपडा और म्हाडा' असे सरकारचे ब्रीदवाक्य असणार आहे. एस.आर.ए.ऐवजी आसरा असे त्याचे नाव ठेवल्यास तेही वावगे ठरू नये. अशाप्रकारे म्हाडा व एस.आर.ए.च्या माध्यमातून लोकांना स्वस्त व परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

म्हाडा व एस.आर.ए.च्या माध्यमातून विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या व योजनांच्या कामाला गती देण्याचे प्रयत्न सुरू असतानाच गेल्या मार्चपासून कोरोनारूपी महाभयंकर संकट आपल्या समोर उभे राहिले आहे. या संकटाने संपूर्ण विश्व व्यापून टाकले असून त्यामुळे सर्व जगातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे आपल्याला पाहायला मिळत आहेत.

स्ट्रेस फंड उभारणार

संपूर्ण जगाला आता जागतिक मंदीचा सामना करावा लागत आहे. गृहनिर्माण क्षेत्रही त्याला अपवाद ठरले नाही. परंतु या संकटाच्या परिस्थितीत आपल्याला असे थांबून चालणार नाही. कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत बांधकाम उद्योग संकटात आहे. अर्थकारणाला जर गती द्यायची असेल, बळकटी द्यायची असेल तर बांधकाम उद्योगाला ताकद देण्याची गरज आहे. मुंबई आणि राज्याच्या इतर भागातही प्रमुख शहरांमध्ये विकासाला गती द्यायची असेल तर गृहनिर्माण उद्योगाला सवलती व सुविधा देण्याची गरज आहे. गृहनिर्माण उद्योगाला उभारी देण्यासाठी व रखडलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी स्ट्रेस फंड उभारण्याचा पर्यायही समोर होता. त्याला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तत्त्वतः मान्यता दिली असून लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत याविषयी निर्णय होऊन या रखडलेल्या योजना मार्गी लागतील, असा मला विश्वास आहे.

स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना

सर्वसामान्य गरीब माणसाचे घराचे स्वप्न साकार करण्यासाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये व महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करणे तसेच मुंबई महानगर वगळता मुंबई महानगर क्षेत्रातील इतर महानगरपालिका आणि नगरपालिका मिळून स्वतंत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

उत्तम निवारा

आशिया खंडातील सर्वात मोठी असलेल्या धारावी झोपडपट्टीकरिता व मुंबई शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या कामाठीपुरासारख्या वसाहतीकरिता अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी उपाय योजले असून या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना उत्तम निवारा देण्यासाठी शासनाने निर्धार केला आहे.

गेल्या पाच वर्षांमध्ये बांधकाम क्षेत्रामध्ये अनंत अडचणी निर्माण झाल्या असून या क्षेत्रामध्ये जोम आणि जोश आणणे आवश्यक आहे. या उद्योगावर आधारीत अनेक लघुउद्योग अवलंबून आहेत. त्यामुळे गरिबांच्या घरासोबतच बांधकाम व्यवसायाशी पूरक लघुउद्योगांनाही यामुळे चालना मिळून त्यांची भरभराट होऊ शकेल असा दुहेरी फायदा व्हावा हा शासनाचा मनोदय आहे.

पुनर्वसन सदनिकांचे क्षेत्रफळ

बृहन्मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पुनर्वसन सदनिकांच्या क्षेत्रफळाप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशात

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसित सदनिकांचे क्षेत्रफळ २६९ वरून ३०० चौरसफूट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचा फायदा मुंबईप्रमाणेच ठाणे व मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील झोपडपट्टीधारकांना मिळणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या नियंत्रणाखाली एकाच यंत्रणेकडून परिशिष्ट-२ तयार करणे योग्य राहील असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पात्र झोपडीधारकांची अंतिम यादी सुनिश्चित करण्यामध्ये होत असलेला विलंब टळून पुनर्वसन प्रकल्प नियोजित वेळेमध्ये पूर्ण होण्यास मदत होईल. यापुढे प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये १ हजार चौरस फूट ते ५ हजार चौरसफूट क्षेत्रफळाचे सार्वजनिक आरोग्य केंद्र बांधणे अनिवार्य असेल असा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे मेडिकल हेल्थ कार्ड करण्यात येईल. त्यामुळे गरीब माणसाला त्यांच्याच घराजवळ रुग्णालयाची सोय उपलब्ध होणार आहे. भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर योजनेतील प्रकल्पग्रस्त सदनिका (पीएपी सदनिका) एका महिन्याच्या आत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे विकासकाला अनिवार्य राहील.

प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर दोन वर्षांपर्यंत प्रकल्पग्रस्त सदनिका प्राधिकरणास हस्तांतरित करण्याचे धोरण होते. परंतु या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्त सदनिका लवकर प्राप्त होऊन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता जास्त सदनिका उपलब्ध होतील.

लाखो रहिवाशांना दिलासा

मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतीत राहणाऱ्या लाखो रहिवाशांना इमारत पुनर्विकासाबाबत दिलासा देण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय नुकताच राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या सुधारणांनुसार अर्धवट अवस्थेतील अथवा कुठलेही काम सुरू न केलेले प्रकल्प, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांनी ताब्यात घेतल्यानंतर या प्रकल्पांकरिता आरंभ प्रमाणपत्र (कॉमेन्समेंट सर्टिफिकेट) मिळाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीत भाडेकरू/रहिवाशी यांचे पुनर्रचित गाळे पूर्ण करून देणे म्हाडास बंधनकारक राहील. या निर्णयामुळे सुमारे १४ हजार ५०० उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना फायदा होईल.

मुंबई शहरातील अनेक उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास रखडलेला/बंद पडलेला/वा विकासकांनी अर्धवट सोडलेला आहे. रहिवाशांचे भाडे दिले नाही अथवा ना-हरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्तींचा भंग केला आहे तसेच महानगरपालिकेने कलम ३५४ ची नोटीस देऊनसुद्धा कार्यवाही केली नाही अशी प्रकरणेदेखील आहेत. अशा प्रकरणी कार्यवाहीबाबत म्हाडा अधिनियम, १९७६ मधील कलम २, कलम-७७ आणि कलम ९५ (अ) मध्ये सुधारणा करणे तसेच म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये ७९ (अ) आणि ९१ (अ) या नवीन कलमांचा समावेश करून त्यानुसार हे विधेयक विधानमंडळात सादर करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या सुधारणांनुसार मालक/विकासक तसेच म्हाडा यांच्यातील तक्रारींचे निवारण करण्याकरिता प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येईल.

अशाप्रकारे म्हाडा व एस.आर.ए.च्या कामांना गती देऊन पुढील तीन वर्षांत पुरेशी घरे बांधण्याचा संकल्प गृहनिर्माण विभागाने केलेला आहे. आपण ज्या परिस्थितीतून आज जात आहोत किंवा आपण ज्या मार्गावरून मार्गक्रमण करीत आहोत तो मार्ग खडतर आहे, याची मला निश्चितच जाणीव आहे. परंतु त्या परिस्थितीवर मात करून राज्याला प्रगतिपथावर नेण्याचा आमचा ध्यास आहे, संकल्प आहे. आणि कितीही संकटे आली तरी आम्ही आमचे ध्येय निश्चितपणे गाठणार, यात शंका नाही. गृहनिर्माण विभागाने घेतलेल्या या क्रांतिकारी निर्णयांमुळे गृहनिर्माण क्षेत्रात एका नव्या युगाची मुहूर्तमेढ रोवली जाईल, असा मला विश्वास आहे. कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर जनतेनेही विशेष खबरदारी घ्यावी. मास्क, सॅनिटायझर वापरणे, वारंवार साबणाने हात धुणे अशा गोष्टींची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे मी यानिमित्ताने आवाहन करतो.

पायाभूत सुविधांचे नियोजन

म्हाडाच्या सोडतीमध्ये चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचारी आणि पोलिसांसाठी प्रत्येकी दहा टक्के घरे आरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. म्हाडा वसाहतीचे अभिन्यास मंजुरीकरिता गती देण्याबाबत पावले उचलून म्हाडाने ४५ दिवसांमध्ये विकासकाला अंतिम निर्णय कळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मुंबईमधील म्हाडा'च्या वसाहतींच्या पुनर्विकासास गती प्राप्त होणार असून पुनर्विकासासाठी विकासक पुढे येतील. तसेच जुन्या इमारतींमधील रहिवाशांना मोठ्या आकाराची नवीन घरे उपलब्ध होतील. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील म्हाडा वसाहतीतील समूह विकासाचा प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आहे. या निर्णयामुळे लोकांना परवडणारी घरे उपलब्ध होणार असून सुसज्ज सार्वजनिक सोयीसुविधाही उपलब्ध होतील तसेच पायाभूत सुविधांचे नियोजन करणे सुलभ जाणार आहे.

म्हाडा
MHADA

शब्दांकन : देवेंद्र पाटील,
विभागीय संपर्क अधिकारी

महाराष्ट्र प्रगतिशील, पुरोगामी व अग्रगण्य राज्य आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली कोरोना महामारीचा सामना राज्य करीत असताना, वन विभागाने वन तसेच वन्यजीव संरक्षण व संवर्धनाबाबत आपले काम अव्याहतपणे व जोमाने सुरूच ठेवले आहे.

वनांचे संरक्षण व संवर्धन

संजय राठोड
मंत्री, वने

राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के वन क्षेत्र हवे. तरच पर्यावरणाचा समतोल व संतुलन राखणे शक्य होणार आहे. राज्यात एकूण भौगोलिक क्षेत्र ३.०७ लाख चौरस किलोमीटर क्षेत्र असून ६१ हजार चौरस किलोमीटर भौगोलिक क्षेत्र म्हणजे २०.०४ टक्के क्षेत्र वनाखाली आहे. राज्यात सहा राष्ट्रीय उद्याने, ४९ अभयारण्य व सात संरक्षित राखीव क्षेत्रे आहेत.

वृक्षारोपण

सामूहिक पातळीवर ठोस वृक्षारोपण हा वन विभागाचा सर्वात मोठा व महत्त्वाचा वृक्षलागवडीचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत या वर्षी राज्यात वनीकरणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्यात येत असून या वर्षी पाच कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. या अंतर्गत महत्त्वाचे रस्ते/रेल्वे/कालवे यांच्या दुतर्फा वृक्षलागवड व महत्त्वाच्या रस्त्याच्या दुतर्फा टेकड्यांचे हरितीकरण करण्यात येणार आहे. वृक्षलागवड ही राज्यात एक चळवळ व्हावी व तो लोकांचा कार्यक्रम व्हावा यासाठी या वर्षी 'हरित महाराष्ट्र अभियान' व 'वन महोत्सव' १५ जून ते

वृक्षारोपण करताना वनेमंत्री संजय राठोड, कृषिमंत्री दादाजी भुसे आदी.

महत्त्वाची कामगिरी

- राज्यातील जंगल कामगार सहकारी संस्थांना पेसा व सामूहिक वनहक्क क्षेत्र वगळून बांबू कूप निष्कासनाची परवानगी देण्याबाबतचे धोरण तयार करण्यात आले. जंगल कामगार सहकारी संस्थांना बांबू कूप निष्कासनाची कामे दिल्यामुळे सुमारे २०० जंगल कामगार सहकारी संस्थांमधील आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल तसेच बांबूवर चालणाऱ्या उद्योगधंद्यांनाही त्याचा फायदा होईल.
- आग प्रतिबंधक उपाय योजनेसाठी नवीन ॲप तयार करण्यात आले.
- नागपूर येथील गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयात मृगया चिन्हे जतन करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.
- मेळघाटात स्पायडरच्या ४०० हून अधिक जाती आहेत. त्यांची पर्यावरणातील भूमिका लक्षात घेता संवर्धनाच्या तसेच अभ्यासक, पर्यटक आदींना माहिती व्हावी म्हणून स्पायडर म्युझियमसाठी प्राधान्याने निधी उपलब्ध.
- राज्यात प्रत्येक वनवृत्तात एक याप्रमाणे प्राणी बचाव केंद्र व तात्पुरते प्राणी उपचार केंद्र (ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटर) सुरू करण्यात येणार.
- व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीवांची पुरेशी काळजी घेणे व त्यांना योग्य उपचार उपलब्ध करून देण्यासाठी सहा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची (गट-अ) नव्याने पदे भरण्यासाठी मंजुरी.

- चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांच्या स्थलांतरणाच्या विषयावर एक अभ्यास गट स्थापन.
- 'सफेद चिप्पी' या कांदळवन वृक्षाला महाराष्ट्र राज्य कांदळवन वृक्ष घोषित करण्यास मान्यता देण्यात आली. असा वृक्ष घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.
- राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मेरिटाईम झोन्स ॲक्ट अंतर्गत आंग्रीया पठाराला नियुक्त क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यासंदर्भात केंद्र सरकारकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.
- सेमिनरी हिल, नागपूर येथे वन अमृत उपजीविका प्रकल्पाच्या पहिल्या किरकोळ विक्री केंद्राचे उद्घाटन नुकतेच झाले.
- मानव व बिबट्या सहसंबंध अधिक समजून घेण्यासाठी बिबट्याच्या टेलिमेट्री (दूरमिती) अभ्यासाला पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची नुकतीच मान्यता मिळाली. हा अभ्यास वन विभाग व वाईल्ड लाईफ कन्झर्व्हेशन सोसायटी इंडिया हे संयुक्तपणे करणार आहेत.
- शाळा रोपवाटिका योजनेमार्फत एका शाळेत, एक शाळा रोपवाटिका व एका रोपवाटिकामध्ये १ हजार रोपे निर्माण केली जाणार आहेत. शाळा रोपवाटिका योजनेबाबत ४३ शाळांचे प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आले असून राज्यात १५० शाळा यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.
- इतर व्याघ्र प्रकल्पाच्या धर्तीवर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात देखील ई-सुर्विलन्स ची कामे करणार.

३० सप्टेंबर या कालावधीत प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

कॅम्पा अंतर्गत निधी

२०१९ -२०२० या वर्षात पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरण अर्थात कॅम्पा अंतर्गत कामे करण्यासाठी १८९ कोटी रुपयांच्या वार्षिक नियोजन आराखड्यास केंद्र शासनाने मंजुरी दिली होती. सदर १८९ कोटींपैकी १५१ कोटी रुपये कॅम्पा अंतर्गत कामांसाठी त्वरित वितरित करण्यात आले होते. कॅम्पा अंतर्गत दिल्या जाणाऱ्या निधी अंतर्गत वृक्षलागवड, नैसर्गिक पुनर्निर्मिती, वन अतिक्रमण काढणे व वनांचे संरक्षण, वन संरक्षण साहित्य, आग निरीक्षक, संरक्षित वन क्षेत्रातील गावांचे स्थलांतर व पुनर्वसन, निरीक्षण मनोरे, तपासणी नाके, सोलर पंप व उपकरणे, संरक्षक भिंत बांधणे, उच्च तंत्रज्ञान आधारित रोपवाटिका, संशोधन व क्षमता बांधणी प्रकल्प ही कामे करण्यात येणार आहेत. २०२० -२०२१ या वर्षात पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत पर्यायी वनीकरणासाठी ९० कोटी रुपये, नवीन वन कुरण विकास योजनेसाठी ५० कोटी रुपये, गाभा क्षेत्रातील गावांचे स्थलांतर व पुनर्वसनासाठी २३० कोटी रुपये तर मृद् व जलसंधारण योजनेसाठी ६५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

सायकल बुकिंग केंद्र व होम स्टे प्रकल्प

मेळघाट हे विदर्भातील महत्त्वाचे ठिकाण असून या ठिकाणी पर्यटनाला मोठा वाव आहे. त्या अनुषंगाने तेथे निसर्ग पर्यटन विकासाच्या अनुषंगाने भरीव काम केले जात आहे.

आमझरी येथे साहसी पर्यटनास खूप वाव असून या प्रकल्पाकडे विशेष लक्ष पुरवले जाणार आहे. कोळखास व सिमाडोह ही ऐतिहासिक वारसा असलेली ठिकाणे असून इतिहासात व्याघ्र प्रकल्पविषयक कामकाज येथून झाल्याची नोंद येथे आढळून येते. या ठिकाणांचा विकास प्रकल्प आराखडा तयार करण्यात येत आहे.

गुगामल वन विभागात निसर्गप्रेमी पर्यटकांसाठी सायकल सवारी सुरू करण्यात आली. आमझरी निसर्ग पर्यटन संकुल परिसरात होम स्टे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. वडाळी(अमरावती) स्थित बांबू गार्डनच्या धर्तीवर राज्यात इतर ठिकाणी बांबू गार्डन तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

संस्थांचे बळकटीकरण

चंद्रपूर येथील वन प्रशिक्षण संस्थेचे वन ॲकॅडमीमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. यशदाच्या धर्तीवर तेथे सुविधा देण्याचा मानस आहे. वन ॲकॅडमी परिसरात अत्याधुनिक वणवा व आपत्ती निवारण केंद्र प्रस्तावित केले आहे. चिचपल्ली बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्था येथे बांबूबाबत अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विसापूर येथील बोटॅनिकल गार्डनही राष्ट्रीय वनस्पती संशोधन संस्था लखनऊच्या धर्तीवर तयार केले.

व्याघ्र प्रकल्पात भरीव काम

राज्यात ६ व्याघ्र प्रकल्प असून या सहा व्याघ्र प्रकल्पांतर्गत व्याघ्रसंवर्धन प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले आहे. व्याघ्र प्रकल्पामध्ये कुरण विकासावर भर

देण्यात येणार आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्पांतर्गत राबवण्यात येत असलेल्या यु-ट्यूबवरील ऑनलाइन सफारीला व्यापक प्रसिद्धी देण्यात येत आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये विद्यार्थी पर्यटन वाढीसाठी वन विभागामार्फत सफारी बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

नगर वन उद्यान योजनेचा विस्तार

नगर वन उद्यान ही केंद्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाची महत्त्वाकांक्षी योजना असून ही देशातील २०० शहरांत राबवण्यात येणार आहे. त्यात राज्यातील २६ शहरांचा समावेश आहे. या योजनेसाठी २५ ते १०० हेक्टर क्षेत्रावर शहरात व शहारालगत वन क्षेत्रावर ही योजना राबवण्यात येते. या योजनेत केंद्र सरकारचा हिस्सा ८० टक्के असून राज्याचा हिस्सा २० टक्के राहणार आहे. एका शहर वनउद्यानासाठी कमाल २ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून दिला जाणार असून हा निधी प्रामुख्याने संरक्षक भिंत व वृक्षलागवड यासाठी वापरला जाणार आहे. या योजनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये वन व जंगलाबाबत जागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे. वन विभागाने १५ कोटी रुपयांचा ११ शहर वनउद्यानांचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला आहे. वारजे येथील टेकडीवर ४ हजार झाडे लावून या योजनेचा आरंभ करण्यात करण्यात आला आहे.

अवनत वन क्षेत्राचे वनीकरण

वन विभागाच्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. कंपनी, मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लि. सांताक्रूझ मुंबई यांच्यासोबत त्रिपक्षीय करार संपन्न झाला. या करार अन्वये मोजे जिते ता. पेण जि. रायगड येथील एकूण ३५ हेक्टर क्षेत्र हे वृक्ष लागवडीसाठी व संगोपन करण्यासाठी पुढील सात वर्षासाठी या संस्थांना वापरासाठी देण्यात आले. ही वृक्षलागवड वन विभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली करण्यात येईल. अवनत क्षेत्राचे पुनर्वनीकरणासाठी केंद्र शासनाने सूचना निर्गमित केल्या होत्या. याला अनुसरून राज्यात वन विभाग, औद्योगिक संस्था व अशासकीय संस्था यांच्या त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्याची योजना राबवण्यात येत आहे. यापूर्वी 'दिलासा औद्योगिक संस्था' व 'प्रयास अशासकीय संस्था'

यवतमाळ यांच्या माध्यमातून १० हेक्टर वन क्षेत्राचा त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला.

जैविक वारसा क्षेत्रे

राज्यात जैविक वारसा क्षेत्रे निर्माण करावीत, याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडून वन विभागास सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार गणेशखिंड गार्डन, पुणे येथील ३३.०१ हेक्टर क्षेत्र व लांडोरखोरी जळगाव येथील ४८.०८ हेक्टर क्षेत्र जैविक वारसा क्षेत्र म्हणून घोषित करण्याची अधिसूचना अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. यापूर्वी राज्यात ग्लोरी ऑफ आल्लापल्ली, गडचिरोली हे पहिले जैविक वारसा क्षेत्र घोषित करण्यात आले असून भविष्यात जास्तीत जास्त जैविक वारसा स्थळे राज्यात घोषित करण्यात येणार आहेत.

अशा प्रकारे वन विभागाची दमदार वाटचाल सुरू असून येणाऱ्या काळात निसर्ग पर्यटन धोरण, जैव विविधता संवर्धन, स्थानिक निवासी व आदिवासी समुदाय यांचेसाठी उपजीविका प्रकल्प, वन्यजीव व मानव संघर्ष कमी करणे, वन संरक्षणासाठी नवीन अत्याधुनिक पद्धतीचा वापर करणे ही कामे प्राधान्याने करून राज्याला प्रगतिपथावर नेण्याचा संकल्प वन विभागाने केला आहे. तो पूर्णत्वास नेण्यास वन विभाग कटिबद्ध आहे.

शब्दांकन : देवेंद्र पाटील,
विभागीय संपर्क अधिकारी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यमातून दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून कोरोनाशी दोन हात ही चर्चासत्र मालिका नुकतीच प्रसारित करण्यात आली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शांतिलाल मुथा यांनी कोरोनाविषयक जनसामान्यांना पडणाऱ्या विविध प्रश्नांविषयी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्याशी संवाद साधला. त्याचा संपादित अंश.

संसर्गजन्य आजारामध्ये प्रतिकारशक्ती हा महत्त्वाचा घटक असून प्रत्येकाने आपली रोगप्रतिकारशक्ती चांगली ठेवणे गरजेचे आहे. साधारणपणे ज्यांची प्रतिकारशक्ती कमी आहे, त्यांना कोरोनाची बाधा लवकर होऊ शकते किंवा त्याचे स्वरूप सौम्यचे मध्यम, मध्यमचे गंभीर होऊ शकते. त्यामुळे एका कुटुंबामध्ये एखाद्या व्यक्तीला संसर्ग होतो व इतरांना होत नाही म्हणजे इतरांची प्रतिकारशक्ती सशक्त आहे.

'कोरोनाशी दोन हात' या चर्चासत्र मालिकेत बोलताना आरोग्यमंत्री राजेश टोपे.

कोरोनाशी दोन हात

मृत्यूदर कमी करण्याचे उद्दिष्ट

सध्या महाराष्ट्रात उपचार घेत असलेल्यांमध्ये ८० टक्के हे लक्षणे नसलेले (असिम्पटोमॅटिक) आहेत. १५ टक्के मध्यम स्वरूपाचा प्रादुर्भाव असलेले आणि ५ टक्के गंभीर स्वरूपाचे रुग्ण आहेत. राज्याचा मृत्यूचा दर हा ३.३ टक्क्यांच्या दरम्यान आहे. हा मृत्युदर १ टक्क्यापेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. ज्यांना लक्षणे नाहीत याचा अर्थ असा की, थोडाफार विषाणू संसर्ग त्यांच्या शरीरामध्ये असेल परंतु त्या रुग्णाच्या शरीरातील न्यूट्रिलायजिंग ॲण्टीबॉडीज्ने त्याच्यावर मात करून त्या विषाणूला मारलेही असेल. तो डेथ व्हायरसही असू शकतो. परंतु कोरोना चाचणीच्या (आरटीपीसीआर) माध्यमातून त्याचे अचूक पद्धतीने निदान करू शकतो. तर अशा वेळेस त्याच्यापासून संसर्ग होणारच नाही. परंतु असिम्प्टोमॅटिक मुळे सौम्य स्वरूपाचा संसर्ग होण्याचा संभव असतो मात्र त्याचे प्रमाण जास्त नसते, असे आरोग्यमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केले.

साधारणतः ॲण्टीजेन व आरटीपीसीआर या कोरोना निदान चाचण्या आहेत. तिसरी ॲण्टीबॉडी चाचणीच्या माध्यमातून संसर्ग केव्हा झाला, होऊन गेला का की, आता लगतच्या काळात झाला या बाबी कळतात. एखादा रुग्ण पॉझिटिव्ह आहे की, निगेटिव्ह हे ॲण्टीबॉडी टेस्टमधून समजत नाही. त्यासाठी आरटीपीसीआर चाचणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

प्रतिकारशक्ती चांगली ठेवा

एक जबाबदार नागरिक म्हणून आपल्यापासून इतरांना संसर्ग होता कामा नये याचीही खबरदारी घेतली पाहिजे. जालनामध्ये १०७ वर्षांच्या महिलेने कोरोनावर मात केली आहे, असा दिलासा देतानाच मनाची इच्छाशक्ती व प्रतिकारशक्ती चांगली ठेवावी, असा सल्ला आरोग्यमंत्री श्री. टोपे यांनी दिला आहे. ज्यांना हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब यांसारखे विकार आहेत, त्यांना संसर्ग होण्याचे प्रमाण सामान्य माणसापेक्षा जास्त असते. अशा कोमॉर्बिड अवस्थेतील रुग्णाला कोरोनाचा संसर्ग झाला आणि त्यात तो रुग्ण दगावला तर त्याचा मृत्यू कोरोनामुळे झाल्याची नोंद होते. राज्य शासनाने या संदर्भात पारदर्शकता व प्रामाणिकता याला फार महत्त्व दिले आहे.

प्रत्येकाने पल्स ऑक्सिमीटरद्वारे सातत्याने तपासणी केली पाहिजे. आपले एसपीओटू (म्हणजेच रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण) ९५ टक्क्यांच्या खाली गेले तर निश्चितपणे दवाखान्यात जाऊन दाखल होणे गरजेचे आहे. यामुळे मृत्यूदर कमी होऊ शकतो. नागरिकांनी या सगळ्या बाबींना प्रतिसाद देणे गरजेचे आहे, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी या वेळी केले.

होम क्वारंटाईन

दाटीवाटीच्या वस्तीमध्ये लोकं राहत असतील किंवा एका घरात १०-१५ लोकं राहत असतील तर अशा वेळी आपण त्यांना होम क्वारंटाईन तर करू शकत नाही. त्यांना आपण एका संस्थेमध्ये ठेवतो. ज्याला आपण इन्स्टिट्यूशनल क्वारंटाईन (संस्थात्मक अलगीकरण) म्हणतो. ज्यांच्याकडे मोठा फ्लॅट आहे, बंगला आहे, त्यामध्ये बऱ्याच खोल्या आहेत, घरात सगळे सदस्य वेगवेगळ्या खोल्यांमध्ये राहू शकतात आणि स्वतःला एकमेकांपासून दूर ठेवत असतील तर त्याला आपण होम क्वारंटाईन म्हणतो.

नातेसंबंध जोपासावेत

कोरोनाच्या भीतीमुळे नात्यांवर कसा परिणाम होतो याचे उदाहरण आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी देताना सांगितले की,

आई-मुलाचे नातेसुद्धा कोरोनाच्या भीतीमुळे दुरावल्यासारखे झाले. त्यामुळे आपली नाती तोडू नका, आईशी असलेली नाळ तोडण्याची आपली संस्कृती नाही. कोरोनाची भीती बाळगू नका व कुणालाही वाळीत टाकण्याची मानसिकता ठेऊ नका. शिक्षित व्हावे योग्य ती खबरदारी घ्यावी परंतु नात्यातील, संबंधातील प्रेम-जिव्हाळा कमी होऊ देऊ नका.

लोक भीतीपोटी खूप चुका करतात. एखादा कोरोनाबाधित झाला तर त्यामुळे पॅनिक होण्याची गरज नाही. पनवेलमधील घटनेचे उदाहरण देईल, ज्यामध्ये आई असिम्प्टोमॅटिक होती, ती बरी झाली. ती बरी झाल्यानंतर तिला घरात घ्यायची तिच्या मुलाला भीती वाटायला लागली. त्याला वाटले आईमुळे मला व घरातील इतरांना प्रादुर्भाव होईल. हा आजार बरा होतो मात्र हा आजार झालेल्यांशी वाळीत टाकल्याप्रमाणे वागू नका. नातेसंबंध जपत आजारावर मात करा.

राज्यात आतापर्यंत कोरोनामुक्त झालेल्यांमध्ये किमान ५००० रुग्ण असे आहेत ज्यांचे वय ८० वर्षांपेक्षा जास्त आहे. ९० वर्षे वयापुढील जवळजवळ ६०० लोक बरे झाले आहेत. त्यामुळे कोरोनाची भीती न बाळगता सावधतेने आणि काळजी घेऊन त्याचा सामना करा.

कोरोनाबरोबर जगण्याचा सिद्धांत

कोरोनाबाधित रुग्ण १०-१२ दिवसांमध्ये या आजारातून बाहेर पडू शकतात. ही लक्षणांवर आधारित उपचार पद्धती आहे. त्यात काही मोठी शस्त्रक्रिया वगैरे असे काहीच नाही. सायटोकॉईन स्टॉर्ममध्ये आपले शरीर आपल्याच सेल्सला मारते. सायटोकॉईन स्टॉर्मचे एक कारण कधीकधी काहीशी भीतीसुद्धा असते. त्यामुळे भीती बाळगू नका.

आपल्याला प्रादुर्भाव होऊ नये या गोष्टीचे आपण शिक्षण घ्यावे. आपण काळजी घेऊन काम केले तर काही अडचण येत नाही. भीती न बाळगता, काळजी घेत काम करत राहावे हाच सध्या कोरोनाबरोबर जगण्याचा महत्त्वाचा सिद्धान्त आहे. कोरोना उपचाराबाबत राज्य शासनाने सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून विविध निर्णय घेतले आहेत. कोरोनासोबत जगताना एसएमएस ही त्रिसूत्री महत्त्वाची असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. सध्या आपल्याकडे कोरोनावर प्रतिबंधक लस नाही. लस येईपर्यंत किती महिने लागतील, सांगता येत नाही. लॉकडाऊन करत राहिलो तर आपल्या अर्थव्यवस्थेचे काय होईल? ज्यांचे हातावर पोट आहे त्याचे काय होईल? बिझनेस हाऊसेस, व्यवसाय बंद होतील. ज्येष्ठ उद्योगपती रतनजी टाटा यांनी स्पष्ट सांगितले आहे की, हे वर्ष नफा-नुकसानीचा विचार करायचे नाही. हे वर्ष फक्त जगण्यासाठी आपण जगा. हे करीत असताना आपल्याला एसएमएस (एस म्हणजे सोशल डिस्टन्सिंग, एम म्हणजे मास्क, एस म्हणजे सॅनिटायझर म्हणजेच सॅनिटाईज्ड हॅण्ड्स.) पद्धतीने जगावे लागेल.

शिस्तबद्ध आयुष्य

प्रत्येकाने आपली प्रतिकारशक्ती चांगली ठेवावी. योग्य आहार, पुरेशी झोप आणि व्यायाम या सगळ्या गोष्टी करायला पाहिजेत. जे हंगामी सांसर्गिक आजार असतात जसे डेंग्यू व मलेरिया या सगळ्यांवर आपल्याला मात कारायची असेल तर आपली प्रतिकारशक्ती चांगलीच पाहिजे. आयुष, योग, प्राणायाम, व्यवस्थितपणे आहार घेणे या सगळ्या गोष्टींचे खूप महत्त्व आहे. कोरोना काळात जास्त काळजी घ्यायची असेल तर वाफ घेणे, गरम पाणी पिणे, काढा घेणे यासुद्धा महत्त्वाच्या बाबी आहेत. आपल्याला आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी शिक्षित व्हावेच लागेल. शिस्तबद्ध जीवनशैलीची सवय लावून घ्यावी लागेल. नॉन कम्युनिकेबल डिसीज म्हणजे मधुमेह, रक्तदाब, कर्करोग ज्यांच्यामुळे संसर्ग होत नाही, पण हे झाल्यानंतर आपल्या शरीरात मोठ्या प्रमाणावर अशक्तपणा निर्माण होऊ शकतो. त्यासाठीसुद्धा आपल्याला खाण्यापिण्याच्या सवयी नीट समजून घ्याव्या लागणार आहेत. जिभेवर आणि मनावर ताबा हे सगळे प्राणायाम, योगासनांनी योग्य पद्धतीने शिस्तबद्ध आयुष्य जगूनच करावे लागणार आहे.

शब्दांकन : अजय जाधव,
विभागीय संपर्क अधिकारी

प्लाझ्मा दान हे श्रेष्ठदान

प्लाझ्माचा प्रयोग राज्यात सुरू आहे आणि त्यामध्ये यशही मिळत आहे. साधारणपणे दहापैकी नऊ केसेसमध्ये प्लाझ्मा दिला गेला ते रुग्ण बऱ्यापैकी लवकर बरे झाले असा त्यातला अनुभव आहे. आपल्या शरीरातील रक्तातून पेशी बाजूला काढल्या तर जे पिवळे द्रव्य उरते तो प्लाझ्मा. त्याच्यामध्ये ज्या ॲण्टीबॉडीज असतात, त्या आपल्या शरीराच्या खऱ्या अर्थाने डिफेन्स मॅकॅनिजम असतात. ज्या व्हायरसविरुद्ध लढण्यासाठी उपयुक्त असतात.

जी व्यक्ती १८ ते ६० वयोगटातील असेल, हिमोग्लोबिन (एचबी) १२.५ टक्के असेल, वजन साधारणपणे ५० किलोपेक्षा जास्त असेल, कोमॉर्बीडीटी नसेल म्हणजेच रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, मुत्रपिंड, हृदयविकार नसतील अशा लोकांचा प्लाझ्मा आपल्याला घेता येतो. जे लोक कोरोनाबाधित बरे होऊन २८ दिवस झाले आहेत त्यांना प्लाझ्मा दान करता येतो. रक्तदानाइतकेच प्लाझ्मा दानही श्रेष्ठदान आहे. प्लाझ्मा दान केल्याने काहीही त्रास होत नाही. त्यातून गरजूंचे जीव नक्की वाचू शकतो. महाराष्ट्रामध्ये जे कोरोनातून बरे झालेले पाच लाख लोक आहेत. त्यातील प्लाझ्मा दानासाठी बरेच जण पात्र असू शकतात. या सगळ्या योद्ध्यांनी जास्तीत जास्त पुढाकार घेऊन 'प्लाझ्मा दान' करण्याच्या कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी केले.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर शासन विविध स्तरावर ऑनलाइन, ऑफलाइन बैठका घेऊन सदैव कार्यरत राहून अनेक निर्णय घेत आहे. यातील काही आढावा बैठका आणि मंत्री यांनी दिलेले निर्देश यांची थोडक्यात माहिती..

सदैव कार्यरत

कोरोना उपाययोजनांचा आढावा

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधत कोरोना उपाययोजनांचा आढावा घेतला. महाराष्ट्रात मुंबईसह सर्व जिल्ह्यांमध्ये साथरोग नियंत्रण रुग्णालये सुरू करण्यात येईल. कोरोनाबाधित आणि मृत्यू झालेली एकही केस लपवली नाही. पारदर्शीपणे माहिती दिली. राज्यातील मृत्यू दर कमी करण्याचा प्रयत्न केला जात असून मुंबईतील धारावी, वरळी येथील स्थिती नियंत्रणात आणल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. कोरोनाची दुसरी लाट महाराष्ट्रात येऊ देणार नाही यासाठी प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या वेळी सांगितले.

समन्वय समिती स्थापन

आपत्कालीन परिस्थितीत केंद्र आणि राज्य सरकारच्या यंत्रणेमध्ये चांगला समन्वय असून संकटाशी मुकाबला करताना केंद्र सरकार सर्व राज्यांच्या पाठीशी असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले तसेच बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या सूचना आणि योजनांवर संबंधित केंद्रीय विभागाने विचार करून निर्णय घेण्याची सूचनाही त्यांनी केली. या वेळी महाराष्ट्रात, विशेषत: ५ ऑगस्ट २०२० रोजी मुंबईत झालेल्या अतिवृष्टीची माहिती देताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी इंटर स्टेट फ्लड मॅनेजमेंट सिस्टिम उपयुक्त असली तरी त्यामध्ये केंद्र शासनाचे प्रतिनिधी असावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी व सर्व राज्यांमध्ये समन्वय साधण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रधानमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करावी अशी मागणी केली.

अर्थव्यवस्थेला गती

कोरोनामुळे मंदावलेल्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी नामवंत अर्थतज्ज्ञ, संशोधक यांनी केलेल्या शिफारशींमुळे निश्चितच राज्याच्या विकास दरात वाढ होण्यास मदत होईल, असे सांगून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कालबद्धरीतीने या शिफारशीवर कृती करण्याच्या सूचना दिल्या व तसा आराखडा तयार करावा. महाराष्ट्राचा विकासदर कसा उंचवावा तसेच अर्थव्यवस्थेला कसा वेग द्यावा. या संदर्भात पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या सदस्यांसमवेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे चर्चा केली व अर्थतज्ज्ञांच्या शिफारशी ऐकून घेतल्या.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी समिती

केंद्राने नुकत्याच घोषित केलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व विभागांतील शिक्षण तज्ज्ञांचा आणि अभ्यासकांचा समावेश असलेली समिती नेमून या धोरणाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात व्यवस्थित विचारविनिमय करण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी वर्षा निवासस्थानी नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात आयोजित बैठकीत सांगितले.

'रमाधाम' वृद्धाश्रमाच्या पुनर्विकसित वास्तूचे लोकार्पण

ज्येष्ठांच्या आयुष्यात आनंद फुलवण्यासाठी ३० वर्षांपूर्वी शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे आणि माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुढाकारातून खोपोली परिसरातील उभ्या राहिलेल्या रमाबाई केशव ठाकरे विश्वस्त संस्थेच्या रमाधाम या वृद्धाश्रमाच्या पुनर्विकासानंतर उभ्या राहिलेल्या नव्या सुसज्ज वास्तूचा ऑनलाइन लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते संपन्न झाला. या ऑनलाइन लोकार्पण सोहळ्यात महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई, सामना वृत्तपत्राच्या मुख्य संपादिका रश्मी ठाकरे, डॉ. संजय उपाध्ये हे मान्यवर सहभागी झाले होते.

कृषी संजीवनी प्रकल्प

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. या योजनेंतर्गत सहभागी गावातील ३८०० गावांचा पाण्याचा ताळेबंद तयार करण्यात आला आहे. त्यामुळे ते पीक पद्धतीत बदलासाठी उपयुक्त ठरू शकते. कृषी संजीवनी प्रकल्प योजनेतून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण झाले पाहिजे. स्व.बाळासाहेब ठाकरे स्मार्ट ग्राम प्रकल्पाचीदेखील या प्रकल्पास जोडणी करावी जेणेकरून शेतकरी ते ग्राहक अशी साखळी तयार करता येईल. बाजारपेठ असलेल्या पिकांचे उत्पन्न घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या.

पिकेल ते विकेल

कृषिप्रधान देशात शेती ही आपली संपत्ती आहे. तिचे संवर्धन करण्याची आपली जबाबदारी असून शेतकऱ्याला सन्मान देतानाच कृषिक्षेत्रात संशोधन करणाऱ्या संस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न

होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात 'पिकेल ते विकेल' या धर्तीवर शेती क्षेत्रात काम सुरू असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. केंद्र शासनाने शेती क्षेत्रामध्ये हाती घेतलेल्या सुधारणांबाबत आढावा घेण्यासाठी केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे विविध राज्यातील मुख्यमंत्री, कृषिमंत्री यांच्याशी संवाद साधला.

सामंजस्य करार

मौजे शिरोडा वेळागर (जि. सिंधुदूर्ग) येथील जमीन हस्तांतरण करण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि हॉटेल ताज यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

क्रीडा पुरस्कारार्थींचे अभिनंदन

केंद्रीय युवा कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांचे भारताचे राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या हस्ते राष्ट्रपती भवन येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे वितरण करण्यात आले. यात राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार क्रिकेटपटू रोहित शर्मा, महिला कुस्तीपटू विनेश फोगाट, टेबल टेनिसपटू मनिका बत्रा, पॅरालिम्पिकपटू एम. थंगवेलू, हॉकीपटू रानी रामपाल यांना देण्यात आला.

विविध क्रीडा प्रकारातील पुरस्कारप्राप्त महाराष्ट्रातील खेळाडू असे - अर्जुन पुरस्कार - अजय सावंत (घोडेस्वारी), राहूल आवारे (कुस्ती), सारिका काळे (खो खो), दत्तू भोकनाळ (नौकानयन), मधुरिका पाटकर (टेबल टेनिस), सुयश जाधव (पॅरास्विमिंग) आणि ध्यानचंद पुरस्कार प्रदीप गंधे (बॅडमिंटन), तृप्ती मुरगुंडे (बॅडमिंटन). तर लक्ष्य इन्स्टिट्यूट (पुणे) आणि इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स मॅनेजमेंट (मुंबई) यांना राष्ट्रीय खेल प्रोत्साहन पुरस्कार मिळाला आहे. या सर्वांचे तसेच देशातील अन्य राज्यातील द्रोणाचार्य पुरस्कारप्राप्त प्रशिक्षक, अर्जुन पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार आणि तेनसिंग नॉरगे राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारप्राप्त खेळाडूंचेही मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी अभिनंदन केले आहे.

काजू उद्योगाला दिलासा

अजित पवार
उपमुख्यमंत्री

काजू व्यावसायिकांना चालू आर्थिक वर्षापासून राज्य वस्तु आणि सेवा कराच्या (स्टेट जीएसटी) रकमेची शंभर टक्के प्रतिपूर्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला. त्याचबरोबर काजू व्यावसायिकांची मागील कालावधीतील व्हॅट परताव्याची थकीत रक्कमही परत करण्यात येणार आहे. या निर्णयांमुळे काजू उद्योगाला मोठा दिलासा मिळाला आहे.

वृक्ष संवर्धनाला चालना

देशाच्या स्वातंत्र्यदिनाच्या 'हिरकमहोत्सव'निमित्त राज्यात ७५ विशेष 'रोपवाटिकां'ची निर्मिती करण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी महसूल आणि वन विभागाच्या मालकीच्या जमिनीवर वनराई तयार करण्यात येणार असून शासकीय रोपवाटिकेच्या माध्यमातून 'सह्याद्री देवराई' संस्थेच्या सहकार्याने स्वदेशी प्रजातींच्या झाडांच्या लागवड आणि संवर्धनाला चालना देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

'ग्रामोत्थान' योजना

राज्यातील २५ हजार किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या मोठ्या गावांमध्ये केवळ कर संकलनावर विकासकामे करताना मर्यादा येतात. त्यामुळे अशा मोठ्या गावांच्या विकासासाठी 'नगरोत्थान' योजनेच्या धर्तीवर 'ग्रामोत्थान' योजना तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नियोजन आणि ग्रामविकास विभागाला दिले. या निर्णयामुळे राज्यातील जवळपास ३०० मोठ्या गावांच्या विकासाला चालना मिळणार आहे.

केंद्राने राज्यांना निधी द्यावा

जीएसटीचा हिस्सा आणि थकबाकी राज्यांना वेळेत देणे, राज्याला आर्थिक संकटातून बाहेर काढणे ही जबाबदारी केंद्र सरकारने स्वीकारली असल्यानं ते कर्तव्य पार पाडण्यासाठी केंद्रानेच कमी व्याजदराने कर्ज घेऊन राज्यांना निधी उपलब्ध करावा, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ४१व्या वस्तू व सेवाकर (जीएसटी) परिषदेत व्यक्त केली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या

उपक्रमांचा आढावा

सुभाष देसाई
उद्योगमंत्री

राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यकारी समितीची बैठक मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत राज्य मराठी विकास संस्थेचे विविध प्रकल्प व उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अल्पावधीतच महाविद्यालयीन विद्यार्थी विश्वात आपले आगळेवेगळे स्थान निर्माण करणारी व नाट्यविष्काराच्या माध्यमातून मराठी भाषा व साहित्याचा वेध घेणारी रंगवैखरी ही नाट्याविष्कार स्पर्धा यंदा काही तांत्रिक कारणांमुळे व कोविडच्या पार्श्वभूमीवर आयोजित करणे शक्य झाले नसले तरी यापुढे ही स्पर्धा दरवर्षी नव्या जोमाने आयोजित करण्यात येणार आहे.

अध्यक्षतेखाली आयोजित ४१व्या जीएसटी परिषदेत राज्याच्या वतीने अर्थमंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे परिषदेत सहभागी झाले होते. या परिषदेत त्यांनी राज्याची बाजू दमदारपणे मांडली.

बांधकाम कामगारांना अर्थसाहाय्य

दिलीप वळसे-पाटील
कामगार मंत्री

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रिय (जीवित) बांधकाम कामगारांना आणखी ३ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे. बांधकाम कामगारांच्या खात्यात दुसरा हप्ता मंजूर करण्याबाबत कामगार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील १० लाख बांधकाम कामगारांना मिळणार असून हे अर्थसाहाय्य वाटपावर मंडळामार्फत ३०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

५४२ उमेदवारांना नेमणूक

अनिल देशमुख
गृहमंत्री

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळात प्रशिक्षण झालेल्या ५४२ उमेदवारांना नेमणूक देणार असल्याची माहिती गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली. महाराष्ट्र पोलीस दल भरती प्रक्रियेच्या २०१४ व १६ या वर्षातील पात्र पण निवड न झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाने भरती प्रक्रिया करून त्यांची सुरक्षारक्षक म्हणून निवड केली होती. त्यांचे प्रशिक्षणदेखील पूर्ण करण्यात आले होते. मात्र त्यापैकी ५४२ जणांनी नेमणूक स्वीकारली नाही. या ५४२ पैकी ५५ जणांनी महामंडळाकडे नेमणूक मिळावी याकरिता अर्ज केला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने गृहमंत्री महोदय यांच्यासमवेत पोलीस महासंचालक तथा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांची सविस्तर बैठक नुकतीच संपन्न झाली.

ऑनलाइन महिला मेळावा

हसन मुश्रीफ
ग्रामविकास मंत्री

महिलांनी बचतगटांच्या माध्यमातून तयार केलेले साहित्य व उत्पादनास ॲमेझॉनद्वारे जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याचे काम उमेद अभियानाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. कोरोना काळात ऑनलाइन खरेदीस चालना मिळाली आहे. त्या अनुषंगाने कोरोना संकटामुळे निर्माण झालेली स्थिती ही अर्थार्जनाच्या संधीत परावर्तित करावी, असे आवाहन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातर्फे ऑनलाइन महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात राज्यभरातून जवळपास एक लाख महिला सहभागी झाल्या.

ग्रामपंचायत मालमत्ता करमाफी

राज्यातील आजी आणि माजी सैनिकांना ग्रामपंचायतीच्या मालमत्ता करातून माफी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय ग्रामविकास विभागामार्फत निर्गमित करण्यात आला असून देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या राज्यातील सर्व आजी, माजी सैनिकांसाठी हा निर्णय लागू करण्यात येत आहे. कृषी आणि माजी सैनिक कल्याण मंत्री श्री. दादाजी भुसे यांनी या मागणीसंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

दादाजी भुसे
कृषिमंत्री

रानभाज्या महोत्सवाचा शुभारंभ

कृषिमंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून प्रत्यक्षात साकारलेल्या रानभाज्या महोत्सवाची सुरूवात मंत्रालयात करण्यात आली. औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्यांची विक्री व्यवस्था बळकट करून हा ठेवा सर्वांसाठी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करतानाच रानभाज्यांच्या संवर्धनातून आदिवासी बांधवांची समृद्धी ही संकल्पना कृषी विभागामार्फत अवलंबवण्यात येईल. यासाठी जागतिक आदिवासी दिनानिमित्त ९ ऑगस्ट रोजी राज्यात रानभाज्या महोत्सव आयोजित करण्यात येईल.

सामंजस्य करार

ॲड. अनिल परब
परिवहन मंत्री

परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये एसटी महामंडळ आणि इंडियन ऑईल यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारानुसार भविष्यात राज्यातील एसटी महामंडळाच्या मोकळ्या जागेवर ३० ठिकाणी पेट्रोल-डिझेलपंप आणि ५ ठिकाणी एल.एन.जी.पंप (liquifid Natural Gas) सुरू करण्यात येणार आहे. हे पेट्रोल-डिझेलपंप/एल.एन.जी.पंप इंडियन ऑईलकडून बांधण्यात येणार असून त्याचे संचालन एसटी महामंडळाकडून करण्यात येणार आहे.

स्वच्छ सर्वेक्षण पुरस्कार

नागरी स्वच्छता अभियानातील राष्ट्रीय १२ पुरस्कारांपैकी सर्वाधिक ४ पुरस्कारांसह अन्य १३ असे एकूण १७ पुरस्कार महाराष्ट्राला मिळाले आहेत. मोठ्या राज्यांच्या मानांकनात महाराष्ट्राला दुसरा क्रमांक मिळाला आहे. सलग तिसऱ्या वर्षी देशातील सर्वाधिक पुरस्कार मिळवत महाराष्ट्राने यंदा हॅट्ट्रिक साधली आहे. सलग तीनही वर्षी देशात सर्वाधिक पुरस्कार मिळवत महाराष्ट्र देशात अग्रेसर राहिला आहे, अशी माहिती नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

देशातील सर्वाधिक स्वच्छ शहर श्रेणीमध्ये तृतीय क्रमांकाचा पुरस्कार महाराष्ट्रातील नवी मुंबई शहराला मिळाला आहे. विशेष म्हणजे एक लाखापेक्षा कमी लोकसंख्येच्या स्वच्छ शहर श्रेणीमध्ये तीनही राष्ट्रीय पुरस्कार महाराष्ट्रातील शहरांनी मिळवले आहे. त्यामध्ये प्रथम पुरस्कार कराड, द्वितीय सासवड तर तृतीय क्रमांक लोणावळा शहराने मिळवला आहे. पश्चिम विभाग श्रेणीमधील २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्येच्या श्रेणीमध्ये पन्हाळा शहराला स्वच्छ शहर म्हणून तर शाश्वत स्वच्छता शहर म्हणून जेजुरी तर स्वच्छतासंदर्भात नावीन्यपूर्ण काम करणाऱ्या अकोला शहराला पुरस्कार मिळाला आहे.

एकनाथ शिंदे
नगरविकास मंत्री

२५ ते ५० हजार या दरम्यान लोकसंख्येच्या श्रेणीतील शिर्डीला स्वच्छ शहर म्हणून तर स्वच्छतासंदर्भात नावीन्यपूर्ण काम करणाऱ्या विटा शहराला पुरस्कार मिळाला आहे. शाश्वत स्वच्छता ठेवणाऱ्या श्रेणीमध्ये इंदापूरला पुरस्कार मिळाला आहे. गेल्या वर्षीपेक्षा उत्कृष्ट काम करणाऱ्या वरोरा शहरालादेखील पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. ५० हजार ते एक लाखाच्यादरम्यान लोकसंख्येच्या श्रेणीमध्ये शाश्वत स्वच्छ शहर म्हणून बल्लारपूरचा गौरव करण्यात आला असून नागरिकांनी दिलेल्या उत्कृष्ट प्रतिसाद या श्रेणीत हिंगोली तर गेल्या वर्षीपेक्षा उत्कृष्ट काम करणाऱ्या शेगाव शहराला आणि स्वच्छ शहर म्हणून रत्नागिरीला सन्मानित करण्यात आले आहे. देहू रोड कॅन्टोमेंट परिसराला गेल्या वर्षीपेक्षा उत्कृष्ट काम करणारे शहर या श्रेणीत पुरस्कार मिळाला आहे.

महाराष्ट्र अमृत शहरांच्या स्वच्छ श्रेणीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील १०० अव्वल अमृत शहरांपैकी महाराष्ट्रातील ४३ पैकी ३१ शहरांचा समावेश आहे. राज्यातील ७५ टक्के अमृत शहरे पहिल्या १०० शहरांमध्ये आली आहेत. २५ नॉन अमृत शहरांपैकी २० महाराष्ट्रातील आहेत. कचरामुक्त राष्ट्रीय तारांकित १४१ शहरांमध्ये महाराष्ट्रातील ७७ शहरांचा समावेश आहे. संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त असून राज्यातील २१६ शहरे ओडीएफ प्लस तर ११६ शहरे ओडीएफ प्लस प्लस झाली आहेत.

एसटीची आंतरजिल्हा बससेवा

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदीमुळे एसटीची आंतरराज्य व राज्यांतर्गत सेवा बंद करण्यात आली होती. त्यापैकी राज्यांतर्गत सेवा म्हणजेच आंतरजिल्हा बससेवा २० ऑगस्ट २०२० पासून सुरू झाल्याने राज्यातील लाखो प्रवाशांना दिलासा मिळेल. एसटीची साधी, निमआराम, शिवशाही, शिवनेरी यासर्व प्रकारच्या बससेवा (मूळ तिकीटदरात) टप्प्याटप्प्याने सुरू होत असून त्यापैकी लांब आणि मध्यम पल्ल्याच्या बसेस आगाऊ आरक्षणासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. एसटीच्या प्रवासासाठी ई-पासची आवश्यकता नाही. प्रवासात प्रवाशांनी कोविड-१९च्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

संदिनपानराव भुमरे
रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री

फळबाग लागवड योजना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजनेतील रोपे-कलम यातील अंतर सुधारित करण्यास फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना परवानगी देण्यात आली असल्याची माहिती रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदिपानराव भुमरे यांनी दिली. अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांची प्रलंबित मागणी असल्याने हा निर्णय घेण्यात आला. कलमे-रोपे यामधील अंतर कमी-जास्त करण्यास क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर बदलण्यास परवानगी देण्यात आली आहे.

मृतांच्या कुटुंबीयांना मदत

मालाड मालवणी येथे इमारतीच्या वरचा मजला बाजूच्या घरावर कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख तर अन्य दुर्घटनाबाधितांनादेखील आर्थिक मदतीच्या धनादेशांचे वितरण करण्यात आले. मुंबईतील नागपाडा परिसरातील शुक्लाजी रोडवरील अब्दुल रहमान इमारतीचा काही भाग कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत करण्यात येणार आहे.

लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण

मालाड, मालवणी अंबोजवाडी येथील पारधी समाजातील २३ लाभार्थ्यांना मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख यांच्या हस्ते स्वयंरोजगारासाठी प्रत्येकी २५ हजार रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. जिल्हा वार्षिक योजनेतून पारधी समाज बांधवांना विविध व्यवसाय

अस्लम शेख
वस्त्रोद्योग मंत्री

करण्यासाठी शासनाच्यावतीने अर्थसाहाय्य देण्यात येते. पारधी समाज बांधवांनी स्वयंरोजगार करून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, यासाठी विविध योजना शासनाच्यावतीने राबवण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून पारधी बांधवांना धनादेशांचे वितरण करण्यात आले.

ॲपचे अनावरण

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालविकास मंत्री

महिला व बालविकास आयुक्तालय, अक्षरा संस्था आणि टाटा सामाजिक संस्था संचलित महिला विशेष कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या 'स्टॅण्ड अप अगेन्स्ट व्हायलेंस' या वेब ॲपचे अनावरण महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे केले. 'स्टॅण्ड अप अगेन्स्ट व्हायलेंस' हे वेब ॲप असून https://standupagainstviolence.org/maharashtra-pp/index.html या वेबॲपवर क्लिक करून मोबाइलच्या होमस्क्रीनला जतन करता येईल. या ॲपमध्ये जिल्हावार माहिती संकलित करण्यात आली असून वापरकर्त्या महिलेने आपला जिल्हा निवडल्यानंतर त्यांना तत्काळ मदत करू शकणारे समाजसेवक, संरक्षण अधिकारी, समुपदेशक, वन स्टॉप सेंटर, निवारागृह, महिला विशेष कक्ष यांचे संपर्क क्रमांक मिळणार असून ॲपद्वारेच त्यांना दूरध्वनी करता येईल.

दिव्यांग पुनर्वसन केंद्र

धनंजय मुंडे
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

नवीन शैक्षणिक धोरण व दिव्यांगांच्या आयुष्यावर त्याचा होणारा परिणाम, महाराष्ट्र शासनाचे दिव्यांग धोरण - २०१८ व कृती आराखडा, दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधी व त्याचा विनियोग आदी विषयी विस्तृत चर्चा करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातील दिव्यांग पुनर्वसन केंद्रांच्या बळकटीकरण करण्यासंदर्भात विभागाला सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी निर्देश दिले आहेत. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक धोरण, यासह दिव्यांग हक्क विकास मंचाच्या निमंत्रक खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सुचवल्याप्रमाणे दिव्यांगांच्या प्रश्नाबाबतचा आढावा घेण्यासाठी दर आठवड्याला बैठक आयोजित करणार येईल.

सफाई कामगारांसाठी कार्यासनाची निर्मिती

सफाई कामगारांचे विविध प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी सामाजिक न्याय विभागात स्वतंत्र कार्यासनाची निर्मिती विचाराधीन आहे. सफाई कामगारांबाबतचा लाड-पागे समितीचा अहवाल व सद्य:स्थिती यांचा समन्वय साधून योग्य निर्णय घेतला जाईल.

स्वाधार योजनेचा निधी वितरित

अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा ३५ कोटी रुपयांचा निधी सामाजिक न्याय विभागाकडून वितरित करण्यात आला असून लवकरच लाभार्थी विद्यार्थ्यांच्या संलग्न खात्यात ही रक्कम जमा होणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक योजनांना निर्बंध लागलेले असून राज्याची आर्थिक स्थिती सध्या बिकट आहे, अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या स्वाधार योजनेंतर्गत हक्काच्या निधीला अर्थ खात्याने तातडीने ३५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे.

अभय योजनेला मुदतवाढ

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोरोनाची परिस्थिती लक्षात घेता अभय योजनेची मुदत ३१ डिसेंबर २०२० पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या कोरोना संकटामुळे अडचणीत असलेल्या मुंबईकरांना या निर्णयामुळे दिलासा मिळेल. पालकमंत्री आदित्य ठाकरे यांच्या विनंतीनुसार मुंबई महापालिकेने अभय योजनेला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईकरांना आता ३१ डिसेंबर २०२० पर्यंत या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

आदित्य ठाकरे
पर्यावरण मंत्री

व्होकलिस हेल्थकेअर उपक्रमाचा प्रारंभ

कोरोना विरोधात लढण्यासाठी गोरेगावमधील नेस्को जंबो सुविधा केंद्र येथे व्हॉईस बायोमार्कर्स उपलब्ध करून देण्यासाठी व्होकलिस हेल्थकेअर उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आला. या यंत्रणेद्वारे व्यक्तीच्या किंवा संशयित रुग्णाच्या आवाजावरून त्याची कोरोना चाचणी करणे शक्य होणार आहे. मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, शहर जिल्ह्याचे पालकमंत्री अस्लम शेख, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी याचा प्रारंभ केला.

पुस्तिका प्रकाशन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय प्रकाशित लोकराज्य मासिकाच्या ऑगस्ट महिन्याच्या 'मिशन बिगिन अगेन' या अंकाचे तसेच 'संकटातून नवनिर्मितीकडे' या पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, आमदार दीपक केसरकर, मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, माहिती व जनसंपर्क सचिव तथा महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे, माहिती संचालक सुरेश वांदिले उपस्थित होते. 'संकटातून नवनिर्मितीकडे' या पुस्तिकेमध्ये राज्य शासनाच्या विविध विभागांनी गेल्या आठ महिन्यांमध्ये घेतलेले निर्णय, केलेली विकासकामे व राबवलेले लोकहिताचे उपक्रम याची माहिती दिली आहे.

कोविड-१९ साथीमुळे लॉकडाऊन आणि आता 'मिशन बिगिन अगेन'च्या काळात शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. या काळात शासकीय यंत्रणांनी आपले कर्तव्य चोख बजावले. काही उपाययोजना आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळाची बैठक आवश्यक ठरते, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णयांचा थोडक्यात आढावा.

मंत्रिमंडळात ठरले !

म्हाडा अधिनियमात सुधारणा

मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतीत राहणाऱ्या लाखो रहिवाशांना इमारत पुनर्विकासाबाबत दिलासा देण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या सुधारणांनुसार अर्धवट अवस्थेतील अथवा कुठलेही काम सुरू केलेले नसलेले प्रकल्प महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांनी ताब्यात घेतल्यानंतर या प्रकल्पांकरिता आरंभ प्रमाणपत्र (Commencement Certificate) मिळाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीत भाडेकरू/रहिवाशी यांचे पुनर्रचित गाळे पूर्ण करून देणे म्हाडास बंधनकारक राहील. या निर्णयामुळे सुमारे १४५०० उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना फायदा होईल.

खावटी अनुदान योजना

आर्थिक विवंचनेतील आदिवासींना आधार देणारी खावटी योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. २०१३-१४ पासून ही योजना बंद होती. आता या योजनेत १०० टक्के अनुदान देण्याचे ठरले. यानुसार ही योजना एक वर्षासाठी सुरू ठेवण्यात येईल.

१९७८ पासून ही कर्ज योजना राज्य शासनाने सुरू केली होती. मात्र, २०१३-१४ साली ती बंद करण्यात आली. सध्या कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे आदिवासी कुटुंबांना रोजगार नसल्याने आर्थिक मदत करणे गरजेचे असल्याने हा निर्णय घेण्यात आला. या योजनेत एकूण चार हजार रुपये कुटुंब अनुदान देण्यात येईल. ज्यामध्ये दोन हजार रुपये किमतीच्या वस्तू आणि दोन हजार रुपये रोख रक्कम त्यांच्या बँक खात्यात टाकण्यात येईल. यासाठी ४८६ कोटी रुपये इतक्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली. मनरेगावरील चार लाख, आदिम जमातीच्या २ लाख २६ हजार कुटुंबांना, पारधी जमातीच्या ६४ हजार कुटुंबांना, गरजू, परित्यक्त्या, घटस्फोटित, विधवा, भूमिहीन अशा ३ लाख कुटुंबाना तसेच १ लाख ६५ हजार वैयक्तिक वनहक्क मिळालेल्या अशा ११ लाख ५५ हजार कुटुंबांना याचा फायदा मिळेल.

खावटी अनुदान योजनेत एका कुटुंबास मटकी, चवळी, हरभरा, वाटाणा, उडीदडाळ, तूरडाळ, साखर, शेंगदाणे तेल, गरम मसाला, मिरची पावडर, मीठ, चहापत्ती असा २ हजार रुपयांपर्यंतचा किराणा देण्यात येईल. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली असून अपर मुख्य सचिव (वित्त) हे त्याचे अध्यक्ष असतील तर योजनेच्या विभागीय स्तरावरील अंमलबजावणीसाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास हे अध्यक्ष असतील.

शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती

एसईबीसी आणि ईडब्ल्यूएस आरक्षणामुळे २०१९-२० या शैक्षणिक वर्षात खुल्या प्रवर्गातील काही विद्यार्थ्यांना शासकीय महाविद्यालयांऐवजी खासगी विनाअनुदानित महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला. अशा ११२ बाधित विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ७ कोटी ४९ लाख ३८ हजार ६०० रुपये प्रतिपूर्ती देण्याचे मंत्रिमंडळ बैठकीत ठरले.

मोफत चणाडाळ

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेतील राज्यामधील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थींना जुलै ते नोव्हेंबर २०२० या कालावधीकरिता अख्या चण्याऐवजी प्रतिमहिना प्रत्येक शिधापत्रिकाधारकास एक किलो मोफत चणाडाळ वितरित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यात अख्या चण्याऐवजी डाळ घेण्यास अधिक पसंती असल्याचे निदर्शनास आले असून अनेक लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात विनंती केली आहे. यास्तव हा निर्णय घेण्यात आला. चणाडाळ विक्री करण्याकरिता दुकानदारांना १ रुपया ५० पैसे प्रतिकिलो एवढे मार्जिन देण्यात येईल. या डाळ वितरण योजनेकरिता एकूण ७३ कोटी ३७

लाख इतका वित्तीय भार पडणार आहे.

शेतकरी कर्जमुक्ती योजना

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी १ हजार ५०० कोटी इतका निधी आकस्मिकता निधी अग्रिमातून उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यासाठी आकस्मिकता निधीच्या १५० कोटी रुपये इतक्या कायम मर्यादेत १५०० कोटींची तात्पुरती वाढ करून ती १६५० कोटी रुपये इतकी करण्यासाठी अध्यादेश काढण्यात येईल.

विद्यावेतनात वाढ

राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व तीन दंत महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यानुसार कनिष्ठ निवासी व वरिष्ठ निवासी यांच्या सध्याच्या विद्यावेतनात १० हजार रुपये वाढ याच महिन्यापासून करण्याचे ठरले.

मुचकुंदी योजना

रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील मुचकुंदी लघुपाटबंधारे योजनेच्या २९० कोटी ३० लाख रुपये किंमतीच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे लांजा तालुक्यातील १२ गावांमधील १४०७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाला लाभ मिळणार असून या प्रकल्पाची साठवणूक क्षमता २४.१२ द.ल.घ.मी इतकी आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील आठ महानगरपालिका आणि सात नगरपालिकांसाठी स्वतंत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या प्राधिकरणाचे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे (MMR-SRA) चे मुख्यालय ठाणे येथे राहील.

मुद्रांक शुल्क दर कमी

सध्याचा प्रचलित मुद्रांक शुल्क दर कमी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

अभिहस्तांतरणपत्राच्या दस्तावरील प्रचलित मुद्रांक शुल्काचा दर १ सप्टेंबर, २०२० पासून ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता ३ टक्क्यांनी तर १ जानेवारी, २०२१ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीकरिता २ टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

वाहनांना वाहन करमाफी

कोविड-१९ टाळेबंदीच्या काळात सार्वजनिक वाहतूक बंद असल्याने वाहतूक क्षेत्राला फटका बसला. त्यांना नुकसानभरपाई म्हणून सार्वजनिक आणि माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना वाहन करमाफी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

१ एप्रिल २०२० ते ३० सप्टेंबर २०२० या ६ महिन्यांच्या कालावधीत वाहन कर भरण्यापासून १०० टक्के करमाफी देण्याचा म्हणजे २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी एकूण वार्षिक कराच्या ५० टक्के करमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोविड-१९ आजाराच्या साथीमुळे केंद्रशासनाने २५ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशात टाळेबंदी (लॉकडाऊन) घोषित केली होती. ही टाळेबंदी ३१ मे २०२० पर्यंत सुरू होती. त्यानंतर राज्य शासनाने ३१ मे २०२० च्या आदेशान्वये 'मिशन बिगिन अगेन'अंतर्गत काही प्रमाणात टाळेबंदी खुली केलेली आहे. या टाळेबंदीच्या कालावधीत सार्वजनिक वाहतूक बंद होती. त्यामुळे विविध वाहतूक संघटनांनी नुकसानभरपाई म्हणून शासनाने करमाफी द्यावी, अशी विनंती केली होती. करमाफी ही मालवाहतूक करणारी वाहने, पर्यटक वाहने, खोदकाम करणारी वाहने, खासगी सेवा वाहने, व्यावसायिक कॅम्पर्स वाहने, स्कूल बसेस या वार्षिक कर भरणाऱ्या वाहनांना लागू राहणार आहे. यामुळे राज्य शासनास सुमारे ७०० कोटी एवढा कर कमी मिळणार असल्याने राज्य शासनावर तेवढा आर्थिक भार राहणार आहे.

मच्छीमारांना आर्थिक साहाय्य

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या क्यार व महा या दोन चक्रीवादळामुळे मच्छीमारांना मासेमारी न करता आल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल ६५ कोटी १७ लाख इतके विशेष सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

रापणकार संघाचे सभासद असणाऱ्यांना प्रतिसभासद १० हजार रुपये असे ४ हजार १७१ सभासदांना ४ कोटी १७ लाख, बिगर यांत्रिक नौकाधारकांना प्रत्येकी २० हजार प्रमाणे १ हजार ५६४ नौकाधारकांना ३ कोटी १२ लाख ८० हजार, १-२ सिलेंडर नौकाधारकांना प्रत्येकी २० हजार रुपये प्रमाणे ४ हजार ६४१ जणांना ९ कोटी २८ लाख २० हजार, ३-४ सिलेंडर

मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक

अधिसंख्य पदावर नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तसेच सेवानिवृत्तीविषयक लाभ मंजूर करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या परंतु ज्यांचे अनुसूचित जमातीचे जातप्रमाणपत्र अवैध ठरले आहे, अशा अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेबाबत व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत कायदेशीर सल्ला घेण्याचे या बैठकीत ठरले.

राज्यातील आदिवासीबहुल पालघर, धुळे, नंदुरबार, नाशिक, यवतमाळ, गडचिरोली, रायगड व चंद्रपूर या जिल्ह्यांतील इतर मागासवर्ग व विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या नोकरीतील आरक्षणासंदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली.

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अनुसूचित जमाती प्रवर्गाची होणारी पदभरती व त्या-त्या जिल्ह्यातील इतर मागासवर्ग व विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाची टक्केवारी व संख्या याची सविस्तर आकडेवारी सादर करावी. तसेच राज्यघटनेने त्या-त्या प्रवर्गाला दिलेले आरक्षण कायम राहावे अशी भूमिका या बैठकीत मांडण्यात आली.

मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा अन्न नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या वेळी उपसमितीचे सदस्य आदिवासी विकास मंत्री ॲड. के. सी. पाडवी, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, वन मंत्री संजय राठोड, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे आणि समितीचे सदस्य सचिव तथा सामान्य प्रशासन विभागाचे सचिव किशोरराजे निंबाळकर उपस्थित होते.

नौकाधारकांना प्रत्येकी ३० हजार प्रमाणे १ हजार ५२६ जणांना ४ कोटी ५७ लाख ८० हजार, ६ सिलेंडर नौकाधारकांना प्रत्येकी ३० हजार रुपये प्रमाणे ७ हजार ६७१ जणांना २३ कोटी १ लाख ३० हजार रुपये, लहान मासळी विक्रेता मच्छीमारांना ५० लि. क्षमतेच्या दोन शीतपेट्या पुरवठा प्रत्येकी ३ हजार प्रमाणे ३५ हजार जणांना २१ कोटी रुपये देण्यात येतील. याचा लाभ ५४ हजार ५७३ मच्छीमारांना मिळेल. हा लाभ त्यांच्या थेट बँक खात्यामध्ये (डिबीटी) जमा करण्यात येईल.

कृषी विज्ञान संकूल

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात मौजे काष्टी येथे कृषी विज्ञान संकुलातील देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संकुलात शासकीय कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय आणि कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय स्थापन करण्यात येईल.

२०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून कृषी व्यवसाय व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरू करण्यास तसेच यासाठी शिक्षक तसेच शिक्षकेतर अशा ७६ पदांनादेखील मान्यता देण्यात आली. अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय अभ्यासक्रमदेखील सुरू करण्यात येईल. या सर्वांसाठी ७० कोटी रुपये खर्च येईल.

आरोग्य सेवा संचालकांचे पद

राज्यातील शहरी भागासाठी आरोग्य सेवा संचालकांचे तसेच इतर ६ पदे निर्माण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. शहरी भागासाठी संचालक, आरोग्य सेवा (शहरी), उप संचालक-२ पदे, सहायक संचालक-४ पदे अशी ही नवी यंत्रणा असेल. राज्यातील शहरी भागामध्ये लसीकरण, साथ रोग व इतर आरोग्यविषयक कार्यक्रम अधिक परिणामकारकतेने राबवण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी ही यंत्रणा कार्यरत राहील.

दूधाचे भुकटीत रूपांतर

लॉकडाऊन परिस्थितीत अतिरिक्त दूधाचे भुकटीत रूपांतर करण्याची योजना आता सप्टेंबर आणि ऑक्टोबर या दोन महिन्यांकरिता राबवण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही भुकटी आदिवासी विकास विभागाच्या भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार या योजनेंतर्गत ६ लाख ५१ हजार मुलांना प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १८ ग्रॅम याप्रमाणे ६ लाख ५१ हजार मुलांना आणि प्रतिदिन प्रतिमहिला २५ ग्रॅम याप्रमाणे १ लाख २१ हजार गरोदर, स्तनदा मातांना १ वर्षाकरिता दुग्धव्यवसाय विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचा निर्णयही घेण्यात आला.

आयोगाच्या परीक्षा पुढे

कोविड परिस्थितीमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे अशी माहिती मुख्य सचिवांनी मंत्रिमंडळ बैठकीत दिली. सुधारित वेळापत्रक पुढे जाहीर करण्यात येईल.

महाड दुर्घटना : वारसांना मदत

महाड येथे झालेल्या इमारत दुर्घटनेत १४ जण मृत्युमुखी पडले असून मृतांच्या वारसांना राज्य आपत्ती सहायता निधीतून (एसडीआरएफ) प्रत्येकी ४ लाख रुपये आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून १ लाख असे ५ लाख रुपये मदत देण्यात येणार असल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली.

टीम लोकराज्य

नगर विकास विभाग
महाराष्ट्र शासन

स्वच्छ सर्वेक्षण 2020

“ महाराष्ट्राची हॅटट्रिक ”

सलग तिसऱ्या वर्षी स्वच्छ सर्वेक्षणमध्ये सर्वाधिक बक्षिसांचा मान

देशपातळीवर मोठया राज्यांच्या श्रेणीमध्ये

“सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य”- द्वितीय पुरस्कार

देशपातळीवर महाराष्ट्रातील -

- नॉन अमृत - पहिल्या १०० शहरांमध्ये तब्बल ६० शहरे!
- अमृत - पहिल्या १०० शहरांमध्ये तब्बल ३१ शहरे!
- १४२ कचरामुक्त स्वच्छ शहरांमध्ये सर्वाधिक ७७ शहरे!
- हागणदारीमुक्त (ODF +) शहरांमध्ये २१६ प्रमाणित.
- हागणदारीमुक्त (ODF++) शहरांमध्ये ११६ शहरे प्रमाणित.

अमृत - “स्वच्छ शहर” पुरस्कार
- तृतीय क्रमांक - नवी मुंबई

नॉन अमृत -“स्वच्छ शहर” पुरस्कार
- प्रथम क्रमांक -कराड
- द्वितीय क्रमांक -सासवड
- तृतीय क्रमांक -लोणावळा

संपूर्ण महाराष्ट्राचे मन:पूर्वक अभिनंदन व आभार!

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. महसूल मंत्री

श्री. एकनाथजी शिंदे
मा. मंत्री, नगर विकास

श्री. प्राजक्त तनपुरे
मा. राज्यमंत्री, नगर विकास



R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे